मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ

युगवाणी

जून १९५१

डॉ. के. ल. दप्तरी
आ. रा. देशपांडे
सौ. लक्ष्मीबाई गोखले
राम डोके इ.

भाषणें—

ब्रिजलाल बियाणी
म. म. वा. वि. मिराशी
ग. त्र्यं. माडखोलकर

संघवार्ता वगैरे

विदर्भ साहित्य संघ, नागपूर
दुर्मिळ ग्रंथ संपदा

श्री
विदर्भ साहित्य संघ
विदर्भ विषय सारस्वतीजन्मभू

वर्ष सहावें अंक पांचवा किंमत आठ आणे

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संपादक मंडळ :
सौ. कुसुमावती देशपांडे
पु. य. देशपांडे
हरी नारायण नेने
शरच्चंद्र मुक्तिबोध
कार्यकारी संपादक :
वा. कृ. चोरघडे

★

'युगवाणी' कार्यालय
विदर्भ साहित्य संघ
उत्तर अंबाझरी रोड,
धंतोली, नागपूर १.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

केशवसुत आणि ' तुतारी '

आत्माराम रावजी देशपांडे

केशवसुत हे आधुनिक मराठी काव्याचे जनक होत. त्यांच्या कविता, त्यांच्या समकालीन कवींच्या कवितेहून किती भिन्न होत्या, याची आजहि जाणीव करून घ्यायची असली, तर काव्यरत्नावलीचे जुने ग्रंथ चाळून पहावे. मोगरे. लेंभे, कुंटे, कीर्तिकर हे आपापल्या परीने रसाळ कविता लिहीत होते. मोगरे, लेंभे यांची कविता प्रगल्भ होती, सुसंस्कृत होती, तर कुंटे यांची नाविन्यपूर्णहि होती. परंतु या सर्वांमध्ये कशाची तरी उणीव जाणवते. काव्यरत्नावलीचीं पानें चाळतां चाळतां केशवसुतांची कविता दृष्टीस पडली, म्हणजे कागदी फुलांमध्ये एखादें प्रसन्न, दरवळणारें मोगऱ्याचें फूल सांपडावें, असें वाटतें.

केशवसुतांचें काव्य वाचायला घेतलें की त्याचा प्रथम जाणवणारा विशेष म्हणजे त्याचा जिवंतपणा. उत्कट व्यक्तिगत प्रतीति, हें या जिवंतपणाचें मूळ आहे. त्यांच्या प्रारंभीच्या कांही थोड्या कविता सोडल्या तर त्यांच्या काव्यांत पारंपरिक असें कांही सांपडत नाही. अमुक एक वस्तु किंवा भावना, उदात्त समजली गेली, म्हणून तिच्यावर, किंवा तिच्या विषयीं, कविता रचण्याची खटपट त्यांनी केली नाही. त्यांना स्वतःला उत्कटपणे ज्याविषयीं वाटलें ज्या आठवणींनी त्यांचें हृदय भरून आलें, किंवा ज्या ध्येयकल्पनांनी त्यांचें अंतः-करण उत्स्फूर्त झालें, त्यांतून त्यांचें काव्य स्फुरलें. म्हणूनच 'गोष्टी घराकडिल मी वदतां गड्या रे' यासारख्या अत्यंत साध्या कवितेंतहि प्राण भरला गेला; 'पुष्पाप्रत' 'नैर्ऋत्येकडील वारा' यासारख्या प्रथमदर्शनी वर्णनात्मक वाटतील अशा कवितांमध्ये खोल व्यक्तिनिष्ठ आशय भरला गेला; 'स्फूर्ति' सारख्या कितीतरी कवितांमध्ये काव्यविषयक नवदृष्टीचें तेज फांकलें. काव्याची क्रांतिकारक शक्ति त्यांच्या शब्दाशब्दांत प्रतीत होऊं लागली. त्यांनी म्हटलें —

> "पद्यपंक्तिची तरफ आमुच्या करीं विधीनें दिली असे
> टेकुनि ती जनताशीर्षावरि जग उलथुन या देऊं कसे !"

 या काव्यविषयक नवदृष्टीमुळेच त्यांना सर्व प्रकारच्या कलावंतांतील मूलभूत साम्य

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

जाणवलें. प्रतिभेच्या आविष्काराचें मर्म त्यांना आकळलें. आम्ही कोण ! या प्रश्नाचें त्यांनी आत्मविश्वासाने उत्तर दिलें.

"आम्हाला वगळा—गतप्रभ झणीं होतील तारांगणें.
आम्हाला वगळा—विकेल कवडी मोलापरी हें जिणें".

केशवसुतांचें काव्य त्यांच्या स्वतःच्या जाणिवेंतून स्फुरलें, परंतु ती जाणीव केवळ वैयक्तिक नव्हती. ती व्यापक काव्यविषयक तत्वविचारांपर्यंत विस्तारित झाली. तिने प्रतिभावंतांच्या अंतर्जीवनाला आश्लेषिलें. इतकेंच नव्हे, तिला वस्तुनिष्ठ सामाजिक दृष्टिकोणहि लाभला.

केशवसुतांची कविप्रतिभा व्यक्तिगत प्रतीतींतून स्फुरली असली तरी तिचें क्षेत्र आकुंचित नाही. ती जितकी व्यक्तिनिष्ठ आहे तितकीच समाजाभिमुख आहे. व्यक्तिगत प्रतीतीमुळेच त्यांच्या काव्याच्या सामाजिकतेंत जिवंतपणा आला. केशवसुतावर परपुष्टतेचा आरोप अनेकदां भरण्यांत येतो. त्यांनी कांही इंग्रजी कवितांचें भाषांतर केलें. त्यांच्या काव्यांत आढळणारा दृष्टिकोण, सामाजिक तत्वें इंग्रजी वाङ्मयांतून आपल्याकडे आलीं आहेत, हें खरें. परंतु तो दृष्टिकोण केशवसुतांनी किती आत्मसात केला होता, त्यांच्या व्यक्तित्वाशीं तो किती एकजीव झाला होता, याची साक्ष त्यांचें काव्य वाचून कोणाहि सहृदयाला आल्याशिवाय रहात नाही. त्यांच्या काव्यावरील पाश्चात्य विचारांचा हा संस्कार स्वाभाविक व अपरिहार्य होता. महाराष्ट्रामध्ये इंग्रजी राजवटीचा पाया रुजून तेथे इंग्रजी शिक्षणाला प्रारंभ झाल्यावर महाराष्ट्रीयांच्या जीवनदृष्टींत फार मोठें परिवर्तन घडून आलें. फ्रेंच राज्यक्रांतीच्यावेळीं उदयास आलेल्या व इंग्रजी वाङ्मयांत मुरलेल्या समता, स्वातंत्र्य व बंधुभाव या तत्त्वांचा महाराष्ट्रीय मतांवर खोल परिणाम झाला. व त्यामुळेच मुख्यतः हें परिवर्तन घडून आलें. या परिवर्तनाचाच उद्गार चिपळूणकरांच्या राष्ट्राभिमानी आवेशांत, आगरकर आपट्यांच्या सुधारणाप्रियतेंत, टिळकांच्या स्वराज्यविषयक आकांक्षांत दिसून येतो. केशवसुत पुण्यास न्यू इंग्लिश स्कूलमध्ये टिळक—आगरकरांच्या हाताखालीं शिकले. हरिभाऊ आपट्यांचा व त्यांचा स्नेह होता. एकाच मानसिक वातावरणांत ते वाढले होते. या वातावरणांतील विचारप्रवाह त्यांच्या अंतरंगांत भिनून गेले होते. त्यांच्या व्यक्तित्वाशी हे विचार एकजीव झाले होते. समाजजीवनांतील अन्यायाची, आलस्याची त्यांना तीव्र जाणीव झाली होती. समाजांत माजलेल्या दंभाचा त्यांना उद्वेग वाटे; सनातन्यांच्या स्वार्थी स्थितिनिष्ठेची त्यांना चीड येई. अंधश्रद्धा सोडून स्वच्छ दृष्टीने प्राप्त जीवनाचा विचार करायला शिकलें नाही तर सर्वनाशाची वेळ येईल, सामाजिक अधोगतीला सीमा रहाणार नाही, याची त्यांना तीव्र जाणीव होती. या सामाजिक नवदृष्टीमुळे त्यांना अंत्यजाच्या मुलाविषयी जिव्हाळा वाटला.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

१९५१
जून

"मरा रे तुरी पोर हो म्हारड्याचे !
चला ! खेळ हे मांडले डोंबल्याचे
निघा ! वाट द्या लौकरी ब्राह्मणाते !"

अशा नित्य ऐकूं येणाऱ्या उद्दाम वाणींतला कठोरपणा त्यांना जाणवला; हा माणुसकीचा अपमान त्यांना बोंचला. त्या बाळकाचे निर्व्याज प्रश्न व युगानुयुगें अपमान सहन करून विकल व अंधश्रद्ध बनलेल्या त्याच्या आईचें उत्तर त्यांनी काव्यांत ग्रथित केलें.

"तर्घी बाळ तेंही घराला निघाला
मनीं आपुल्या या करी चिन्तनाला
जरी त्यावरी सावली माझि गेली
तरी काय बाधा असे ठेवलेली ?"
घरी जाऊनी तेंचि माते विचारी;
वदे तेधवां त्यासि माता विचारी:—
"आम्ही नीच बा, आणि ते लोक थोर
तयां पाहतां होइजे नित्य दूर"

अशा दुधारी अनुभूतींतून, वस्तुनिष्ठ पण ध्येयवादी विचारांतून, त्यांच्या कितीतरी कविता स्फुरल्या आहेत. त्यांपैकी 'तुतारी' ही महत्त्वाची व सर्वांच्या परिचयाची झालेली आहे.

ज्याच्या सहाय्याने आपल्या सर्व समाजाला खडबडून जागे करतां येईल अशा ध्वनिमाध्यमाचा ध्यास, " तुतारी " या कवितेंत लागलेला आहे. तें ध्वनि—माध्यम म्हणजे काव्य. " तुतारी ", म्हणजे लाक्षणिक अर्थाने काव्य. जिला प्राणपणाने फुंकून काढलेल्या ध्वनींने सगळीं गगनें भेदून टाकतां येतील अशी तुतारी—म्हणजे कविता—त्यांना अभिप्रेत आहे. ती मिळाली तर अवकाशाच्या ओसाडींतील आजवर मुके राहिलेले पडसाद वाचाळ होतील. असहाय मूक दुःखाला शब्द फुटेल. दडपल्या चिरडल्या गेलेल्या मानवतेचा आक्रोश कवीच्या वाणीच्या वाटे मोकळा होईल. अन्यायाची जाणीव होईल. दंभस्फोट होईल.

या कार्याला सारंगी, सतार, वीणा अलगुज हीं काय कामाचीं ! इथे तुतारीच हवी—जी आम्हाला फाडून खाणाऱ्या रूढी, जुलूम या राक्षसी सन्तानाशी लढण्याला तुम्हां आम्हांला प्रस्फुरित करील, सज्ज करील. केशवसुत म्हणतात, ही वेळ काय मौज करायची आहे ?

अवडंबरलीं ढगें कितीतरि
रविकिरणांचा चूर होतसे
मोहर सगळा गळुन जातसे
कीड पिकांवरि सर्वत्र दिसे !

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

जीवनाकाश काळवंडून आलें आहे. प्रकाशाचा लवलेशहि उरला नाही. नवजीवनाचीं, समृद्धीचीं सर्व चिन्हें—झडून जात आहेत; जीवनविनाशी विकृति, रोगटपणा तेवढा फैलावला आहे. आणि तरिहि आम्ही गाफीलच ! अजूनहि आमचे पुराणमतवादी लोक जुन्याला सोनें म्हणून उराशी कवटाळतात.

अलिकडलें तें सगळे खोटें
म्हणती घरुनी ढेरीं पोटें
धिक्कार अशा मूर्खांलागुनी.

केवळ स्वार्थासाठीं, स्वतःच्या सोयीसाठी जुन्याला चिकटून बसणाऱ्यांचा, केशवसुत कठोर, निःसंकोच शब्दांत धिक्कार करतात. पण म्हणून ते जुन्याचा सर्वस्वीं अधिक्षेप करतात असें नाही. जुन्यांतूनच नव्याचा जन्म होतो याची जाणीव त्यांनी तितक्याच स्पष्टपणें व्यक्त केली आहे. एवढेंच नव्हे, या जुन्या नव्याच्या गाढ संबंधाचें वर्णन करतांना त्यांच्या शब्दांत एक वेगळें मार्दव येतें.

जुन्या नभीं या ताजे तारक
जुन्या भूमिवर नवी टवटवी
जुना समुद्रहि नव रत्नें वी;
जुन्यांतून जी निष्पत्ति नवी—
काय नव्हे ती श्रेयस्कारक !

प्राप्तकाल हा या जुन्यानव्यामधील दुवा आहे—संधिकाल आहे. या कालांत कांहीं कर्तबगारी करून आपलीं नावें चिरंजीव केलीं पाहिजेत.

खांद्यास चला खांदा भिडवुनि !

सद्भावना, सवंगडीभाव ठेवून पूर्वजांना योग्य तो मान द्या, पण अवश्य तेव्हा बाजूलाहि सारा.

परंतु सरका निःशंक पुढतें
निरोप त्याचा ध्यानीं घेऊनि !

कारण आता आपल्याला वस्तुनिष्ठ, शास्त्रशुद्ध दृष्टीने जीवनाकडे पहाण्यास शिकलें पाहिजे.

निसर्ग निर्घृण, त्याला मुर्वत—
अगदी नाही पहा कशाची...
त्याशी भिडुनी, झटुनी झगडत
उठवा अपुले उंच मनोरे,
पुराण पडक्या सदनी का रे
म्याड बसुनिया रडतां पोरें
पुरुषार्थ नव्हे पडणें रखडत !

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पायाखालची धरणी भेदभावांनी, माऊबंदकीने खचत चालली आहे. तिला खंदका-एवढे तडे गेले आहेत. आपल्या स्वतःच्या निःस्वार्थ जीवनाची मरती त्यांत घालून ते बुजवले पाहिजेत. गत शतकांचीं घोर पापें धुवून काढायला आपल्या रुधिराचा वर्षाव केला पाहिजे. धर्म, नीति यांचें खरें स्वरूप नीट समजून घेतलें पाहिजे. समतेची व खऱ्या नीतीची द्दष्टि सगळीकडे फिरवली पाहिजे. हा संग्राम घनघोर आहे, तसाच सनातन आहे. तो नित्य लढावा लागतो.

पूर्वीपासुनि अजुनि सुरासुर
तुंबळ संग्रामाला करिती;
संप्रति दानव फार माजती,
देवांवर झेंडा मिरविती
देवांच्या मदतीस चला तर !

देव–दानव, शिव–अशिव, यांच्या संग्रामाच्या सनातनत्वाची जाणीव स्फटिका-सारख्या स्वच्छ शब्दांत केशवसुतांनी येथे मांडली आहे. जीवनसंघर्ष व जीवनांतील ध्येयवाद या दोन्हींची प्रतीति इथें मूर्तरूपांत अवतरली आहे. इतकी की आजच काय, पुढे कोणत्याहि युगांत, मराठी भाषा अस्तित्वांत असेल तोंवर, आपण त्याच प्रतीतीने म्हणूं—

पूर्वीपासुनि अजुनि सुरासुर
तुंबळ संग्रामाला करिती;
संप्रति दानव फार माजती
देवांवर झेंडा मिरविती

आणि हेंहि तितकेंच खरें आहे की दानवी साम्राज्याला वैतागलेला मानव तितक्याच निकडीने म्हणेल—

देवांच्या मदतीस चला तर !

तीव्र वस्तुनिष्ठा व दुर्दम्य ध्येयवाद यांचा केशवसुतांच्या तुतारी ह्या कवितेंत असा चैतन्यपूर्ण संगम आढळून येतो. या चैतन्याने त्यांची शब्दकला ओजस्वी होते. त्यांची प्रतिमासृष्टि तेजस्वी होते. नवजीवनाचा झराच त्यांच्या प्रतीतींतून उगम पावतो. केशवसुतांच्या प्रतीतिनिष्ठेमध्येच त्यांच्या काव्याचें सामर्थ्य सांठवलेलें आहे.

 नागपूर नभोवाणीच्या सौजन्याने.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नव्या युगाचे पाईक

रामचंद्र सूर्यभान

★

लोकयुगाचें, नव्या युगाचें पाईक आम्ही, आम्ही सारे
चुडा क्रांतीची घेऊनि जाऊं जेथे जेथे अन्याय संचरे
जनतेच्या जीवावर जगलें आणि तियेने जयां जगविलें
परी अपुलें जाल विणुनियां सर्पासम जें अतां उलटलें,
तत्पापांचें रांजण भरुनि ओघळ आता वाहूं लागले.
जन्मेजय राजाचा न्याय माहित त्यांना नाही काय ?
दांत तयांचें आता पाडूं फिरवूं त्यांच्यावरुनि नांगर. ॥१॥

भोळा बघुनि लोकजनार्दन ज्यांनी केलें त्याचें शोषण,
सर्वस्वाची करुनि होळी ज्यांनि भाजली अपुली पोळी,
केलें, वा अनुमोदिले जयांनी कृष्णकृत्य हें, त्यांनी, त्यांनी,
गिळलेलीं माणकें ओकण्या तयार व्हावें आजपासूनी.
सर्व तयांच्याकडून काढूं, चुणुक क्रांतिची तया दाखवूं ॥२॥

धर्माची अन् श्रेष्ठत्वाची मिरासदारी अजुनि राखण्या,
शब्दांचे जंजाल उभवुनी, भोळी जनता पूर्ण फसविण्या,
सुपीक बुद्धि ज्यांची करते बेत असें हें, त्यांनी पुरतें
जाणावें की, काळ बदलला, लोकजनार्दन जागा झाला
अजुनि चालतिल जुनी चाल तर, उतरतिल त्यांचे अस्थीपंजर ॥३॥

पावसाळिंच्या बेडकुळयासम, संधिसाधु जे जन्मा येती,
बेडकुळयासम बडबड करूनी, दिशाभूल लोकांची करती
पावसाळिंच्या बेडकुळयासम, क्षणांत अपुले रंग बदलती
क्रांतिचुडेच्या तीव्र प्रकाशीं, असें पुढारी (?) वेंचून वेंचून
पावसाळिंच्या बेडकुळयासम, तयांस देऊं जिवन्त मरण ॥३॥

सत्ता आणि धर्ममदाने, हांजी हांजीखोरपणाने
मायेचा बाजार निर्मुनी, ज्यांनी भोळया जनां भ्रमविलें
सत्य शोधण्या, न्याय स्थापण्या, अन्यायांचें निर्मूलन करण्या,
आवश्यक तर हासत देऊं, अर्घ्य आमुच्या नव रुधिराचें
लोकयुगाचें, नव्या युगाचें, पाईक आम्ही प्रिय देशाचे ॥५॥

मरणाला जर भितो न आम्ही, मारण्यासहि भिणार नाही
मति मंदांनो, स्वार्थीजनांनो, बांधुनि ठेवा खूणगांठ ही
जगूं इच्छितिल जे जे जीवन त्यांनी अमुची शक्ति ओळखुन
अमुच्या हातीं हात मिळवुनी प्राणपणाने सहाय होउनि
समरस अमुच्या ध्येयीं होतील, वाटेकरी ते यशांत होतील ॥६॥

(नागपूर व मध्यवर्ति विभागांच्या १९५० सालीं झालेल्या संयुक्त क्रीडा-कला-स्पर्धेत शिक्षकांच्या कविता लेखनाच्या स्पर्धेत सर्वोत्तम ठरलेली कविता)

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नंदनवनाच्या परिसरांत ‘ गोवें ’

लेखिका — सौ. लक्ष्मीबाई गोखले

★

प्रिय सौ. वत्सं यास सप्रेम नमस्कार.

तुमचं पत्र पोंचलं बराच राग आलेला दिसतोय् तुम्हाला आम्ही गोव्याला जायचं कळविलं नाही म्हणून, होय ना ? अहो ! आम्ही गेल्या वर्षी पासूनच ठरविला होता बेत. एकंदर दहा-बारा जणांनी जाऊन खूप-खूप मजा करावी असं ठरलं होतं, म्हणून मी मुद्दाम मुंबईला आलें, पण ठरवावं एक नि व्हावं दुसरंच हें नेहमीचंच यावेळींहि घडलं आणि आमच्या उत्साहावर पूर्णपणे पाणी पडलं. त्याचं असं झालं—येणाऱ्या पैकीं प्रत्येकाचे कांही ना कांही कारण निघून एकेक जण आमच्या बारभाईच्या कारस्थानांतून गळूं लागला. शेवटीं आम्ही चौघे जणच राहिलों—आणि गोवें पाहण्याचा दांडगा उत्साह असल्याने आम्ही चौघांनी जायचं ठरवलं नि लागलों तयारीला—

दिनांक २१ जूनला आम्ही सकाळच्या जनता—एक्सप्रेसने बोरीबंदर वरुन आमच्या प्रवासास सुरवात केली. मुंबई ते मडगांव फक्त १२ रुपये २ आणेच भाडें बरं कां ! सकाळीं ७—१० ला आम्ही बोरीबंदर सोडलें आणि ११ वाजतां पुण्यास पोंचलों. गोव्याला जाणारी गाडी—म्हणजे मद्रास सदर्न मराठा रेल्वे हं ! —साडे अकराला येते असं कळलं म्हणून आम्ही ‘दिवाडकरांचे-कडे जाऊन आमचीं जेवणें उरकलीं—आणि गोव्याला जाणाऱ्या गाडीच्या—‘खुद्द गोव्याच्या’ डब्यांत बसलों. बसलों म्हणजे शरीरं, आम्ही डब्यांत ज्या ज्या मार्गांनी जाणं शक्य होतीं त्या त्या मार्गांनी, एकदांची कोंबलीं झालं. खरंच वत्सं इतकी तुफान गर्दी की कांही विचारूं नका. मोहोळाला माशा चिकटतात ना तशी लटकलीं होतीं माणसं हवी तिथं. या गर्दींत जीव कसा गुदमरायला लागला होता ! वाटत होतं जावं झालं परत— नको तें गोवं नि ती निसर्गशोभा. पण लक्ष सारं लागलेलं गोव्याकडे ना ! अखेरीस १२॥ ला सुटणारी गाडी १ वाजून २० मिनिटांनी सुटली आणि बाहेरचा थोडासा गार वारा लागून आमचे जीव जिवांत आले. मग प्रत्येक स्टेशनवर गाडी थांबतांच फळं घ्यायचीं नि मनसोक्त खायचीं—मिळेल तेवढ्या फटींतून बाहेरचं सृष्टिसौंदर्य पाहून घ्यायचं हाच

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आमचा कार्यक्रम. साठ माणसांच्या डब्यांत बसलेल्या आम्हां दीडशे जणांचे तीनशे डोळे बाहेरची शोभा पाहाण्यास कसे आसुसले होते. किती गर्दी ती! बाकावर माणसं—सामानावर माणसं—दारांत माणसं—खिडकीत माणसं—फक्त माणसांवर माणसं नव्हतीं इतकंच. दुपारी ५ ला सातारा— ६ ला कराड— ७ ला किर्लोस्करवाडी नि ८ ला मिरजेला येऊन थडकलों. थोडीशी पुरीभाजी खाऊन घेतली आम्ही इथं, आणि मग रात्रीं ११।। ला बेळगांव नि १।। ला लोंढ्याला येऊन पोंचलों. ही गाडी लोंढ्यापर्यंतच जाणारी असल्याने आमचा डबा तिथून काढून 'गोव्याच्या गाडीला' जोडण्यांत आला. हें सगळं सोयिस्कर होईपर्यंत—रात्रीचे ३।। झाले. पहांटे साडेपांचला आम्ही कॅसल—रॉकच्या भूमीवर पाय ठेवले. इथे एका नव्याच दिव्यांतून जायचें होतें. सर्व डब्यांना कुलपें लावण्यांत आलीं. कारण इथूनच गोव्याची सरहद्द सुरू होते आणि त्यामुळे बाहेरून आलेल्या प्रत्येक प्रवाशाची अगदी कसून तपासणी करून, त्या प्रवाशाच्या ट्रंक—वळकटीवर तपासल्याचें चिन्ह लावल्यावरच त्याची सुटका. या सर्व प्रकाराला तब्बल दोन तास लागतात. तोपर्यंत जीव कसा कंटाळून जातो. बरं यावेळीं थंड हवेंत थोडासा गमागरम चहा घेऊन कंटाळा घालवावा म्हटलं तर तोही नाही मिळत इथे. फक्त कॉफीच—आणि तीसुद्धा गुळाची. दुधाची तहान ताकावर भागवतात ना तशी आम्ही साखरेच्या चहाची इच्छा गुळाच्या कॉफीवर भागवली. नंतर आम्ही ५।। ला कॅसल—रॉक सोडलें नि कोलेम—कुळें येथे ९ वाजतां सकाळीं पोंचलों. कॅसल—रॉक प्रमाणेच इथेहि सामान तपासणें व बिछान्यांना गंधकाची धुरी देण्याचें काम उरकावें लागलें. ११।। तासाने पुन्हा गाडी मार्गाला लागली नि ११ वाजतां आम्ही मडगांवला पोंचलों. या दोन तासाच्या प्रवासांत मनोहर सृष्टिसौंदर्य आणि दूधसागराचे आल्हाददायक दृश्य पाहून कितीतरी बरं वाटलं होतं. तुम्हाला कल्पना नाही यायची त्याची. अतिशय समाधान होतं तो दूधसागर पाहिल्यावर!

ज्या मडगांवला आम्ही पोंचलों तें एक गोव्यांतील गांव आहे हं! गोवा म्हटल्यावर आपणांला नागपूरप्रमाणेच एखादं गांव असेल असं वाटतं. पण तसं नाही हें. तो एक प्रांत आहे— मी ओघाओघाने तुम्हाला या साऱ्या गोव्यांतील मी हिंडून पाहिलेल्या गावांची माहिती देण्याचा प्रयत्न करणारच आहे.

आम्ही मडगांवला कवि कारे यांचेकडे उतरलों होतों. त्यांच्या घरीं गेल्यावर सगळीकडे थंड कारभार दिसला. आमच्या पोटांत तर इकडे कावळ्यांची ओरड चाललेली. आता स्वयंपाक व्हायचा कधी नि आमची आणि अन्नाची गांठ पडायची केव्हा हेंच कोडें आमच्या समोर. पण सुरवातीलाच कारे यांच्या पत्नीने झटपट चहा व आंबे दिले आम्हाला—आणि अर्ध्या पाऊण तासांत जेवण झाल्याचें सांगितल. इतक्या लौकर जेवण तयार कसें झालें या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विचाराने आम्ही चकीतच झालों होतों. यांच्या घरीं यंत्रवित्र आहे की काय अशीही शंका वाटून गेली. पण पानावर बसल्यावर त्याचा चटकन् उलगडा झाला. कारण भात, वरण आणि बटाट्याचे काप हेंच होतं जेवण. पोळी वर्ज. प्रथम पोळी नसल्यावद्दल थोडसं हिरमुसल्यासारखं झालं पण भुकेला कोंडा या न्यायानं आम्हाला त्या जेवणानंसुद्धा फार समाधान झालें.

मडगांव हें गोव्यांतील मोठें आणि व्यापाराचें ठिकाण आहे. बरीचशी वस्ती ब्राम्हणांची आहे. भाषा सोडल्यास दक्षिणी पेहेरावामुळे आपण परक्या ठिकाणीं आल्याचें जाणवतच नाही इथे. स्टेशनवर पुरुषाऐवजीं स्त्रियाच 'हमाल' दिसल्या. संध्याकाळीं समुद्रकिनाऱ्यावर फिरावयास गेलों. हा गांवापासून ५–६ मैल दूर आहे. जाण्या येण्याच्या १॥ तासाचे टॅक्सीवाल्यानं ६ रुपये घेतले. हा समुद्रकिनारा फारच भव्य व विस्तीर्ण आहे. मुंबईच्या जुहूचा किनारा म्हणजे यापुढे काठेवाडी घोड्यासमोर गांवठी तट्टासारखा भासेल. मुंबईच्या समुद्रकिनाऱ्यावरून जातांना वाळू जशी भुसभुशीत वाटते तशी इथे नाही. वाळू मऊ असल्याने चालतांना मजा येते.

समुद्राच्या लाटाहि विशेष पांढऱ्या वाटल्या. हिरवीगार नारळींचीं झाडें त्यांच्या किनाऱ्यालगत असल्याने निर्माण होणारी शोभा खरंच भारी नयन मनोहारी आहे. रस्त्यावरूनहि नारळींची योजना पाहून 'गार्ड ऑफ ऑनरची' आठवण होते. हा समुद्राचा देखावा पाहून झाल्यावर ख्रिश्चन लोकांचें एक चर्च पाहाण्यास गेलों. त्यावेळीं तें बंद असल्याचें आम्हीं तिथे पोंचल्यावर आम्हांस कळलें. पण तियल्या व्यवस्थापकांनी तें उघडून दाखविण्याची व्यवस्था केली. हें चर्च ४०० वर्षांपूर्वी बांधलें गेलें असूनहि अजून सुद्धा उत्तम स्थितींत आढळतें. आंतील स्वच्छता, गांभीर्य, शांतता नि पावित्र्य खरोखरीच स्पृहणीय आहे. आपल्या देवळाहून यांत कलेचा अभाव जरी दिसून आला तरी वरील गुणांनी इथे चार घटका मनःशांतीकरता विसावा घ्यावा अशी कुणासहि इच्छा झाल्याविना राहाणार नाही.

मडगांवचे रस्ते फारच स्वच्छ दिसले. नगरपालिकेची ही दक्षता पाहून तिचें कौतुकच करावेंसें वाटलें. ती रात्र मडगांवलाच काढून सकाळीं चहा घेऊन आम्ही 'नागवेला' मित्रे यांच्या घरीं गेलों. त्यांच्याकडचें दुपारचें जेवण झाल्यावर तिथला एक औषधी झरा पाहण्यास गेलों. आजुबाजूचें सौंदर्य पाहून मन प्रसन्न झालें. नंतर चहा घेऊन फोटो काढण्याचा कार्यक्रम उरकला नि टॅक्सी करून 'वास्कोडी गामा' पहाण्यास गेलों. हें शहर मुद्दाम प्लॅनिंग करून वसवलें असल्याने अतिशय प्रमाणबद्ध वाटतें. घरें नि बागबगीचे यांची रम्य योजना पाहून एकप्रकारचें विशेष समाधान मिळालें.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

शहराची रचना अलिकडची असल्याने व्यवस्थित नगरें कशीं असावींत याचा उत्कृष्ट नमुना दिसून येतो. येथे पेट्रोलचे डबे बनवण्याचा कारखाना आहे. यानंतर आम्ही मार्मगोव्याचें बंदर व इतर दोन किनारे पाहिलें. या दोन्ही किनाऱ्यावर खूप खूप चांगल्या आकाराच्या नि उत्तम नक्षीच्या शिंपा गोळा केल्या नि आम्ही लाँचने पणजीला गेलों. पणजीला जातांना आम्ही ज्या टॅक्सीतून गेलों ती कुठे ठेवली असं वाटत असेल तुम्हाला ? पण तिच्यासह आम्ही गेलों लाँचमधून. आहे की नाही गम्मत ? अगदी लहान मुलासारखं आनंदानं नाचावंसं वाटत होतं. सगळीकडे कसं नावीन्य पसरलं होतं. माणसांप्रमाणे टॅक्सीचंसुद्धा तिकीट काढावं लागलं. नंतर त्याच टॅक्सीतून आम्ही सर्व पणजीभर हिंडून घेतलं. पणजीच्या समुद्राला एकीकडून मांडवी व दुसरीकडून जुआरी नदी मिळते. या दोन्ही नद्यांचें पात्र अति विशाल आहे. नदीचें पाणी म्हणून तोंडांत घालावें तर एकदम खारट. पतीच्या सहवासाने पत्नीचा कसा कायापालट होतो याचें व्यवहारी प्रत्यंतर आलें पाहण्यांत. मूळच्या गोड बिचाऱ्या पण पुढे स्वत्वच नसल्याने सागरमय झालेल्या नुसत्या !

पणजीला रायकरांचेकडे आमचा मुक्काम होता. त्यांच्याकडेहि आमचा यथोचित पाहुणचार झाला. रात्रीच्या जेवणानंतर आम्ही किनाऱ्यावर फिरावयास गेलों. आभाळ ढगांनी भरून आलेलं असल्यानं चंद्राच्या शीतल प्रकाशाला एक प्रकारचं औदासीन्य आलं होतं. अम्हालाहि त्यामुळे थोडसं उदासच वाटत होतं प्रथम पण दीपस्तंभावरून जेव्हा प्रकाशझोत (सर्च लाईट) टाकलेले पाहिले तेव्हा कितीतरी बरं वाटलं. नंतर अगदी गाढ झोप लागली घरीं आल्यावर. दुसरे दिवशीं सकाळीं नवें गोवें हिंडून आलों. तिथे चर्चेस, वाचनालयें, आर्टगॅलरी रुग्णालय व बोटीचे धक्के पाहून समुद्रकिनाऱ्याने भर बारा वाजतां ऐन उन्हांतून घरीं आलों. वरून उन्हाचा त्रास भासत होता पण थंड हवेच्या झुळुकेने त्याचा तीव्रपणा कमी वाटायचा. घरीं दुपारीं मेजवानीचें जेवण झाल्यावर थोडी विश्रांती–नंतर फोटोचा कार्यक्रम उरकून साधारणपणे ३ वाजतां 'दोना पॉवल'–एक फेरी बोट जाण्याचा धक्का पहाण्यास गेलों. इथे जुआरी नदी व समुद्राचा संगम झाला आहे. 'दोना पॉवल' वरून ऐन दुपारीहि समुद्र नि त्याच्या आसपासचा देखावा फारच आकर्षक दिसत होता. भर दुपारीं इतका मोह पडतो या देखाव्याचा तर शरद्पौर्णिमेला ताजमहालाला देखील मान खालीं घालावयास लावील अशी कल्पना चाटून गेली. तिथून मग 'काबचा राजवाडा' (गव्हर्मेंट हाऊस) पहाण्यास गेलों. पण तिथे परवानगी मिळाली नाही. तीच गत ताळगांवच्या मेणवत्त्यांच्या कारखान्याची. नंतर जुनें गोवें पाहिलें. सर्व शहराची पोर्तुगिजांनी केलेली धुळदाण पाहून मन विषण्ण झालें. इथे एक चर्च आहे. तें पूर्वी महादेवाचें देऊळ होतें म्हणतात. या चर्चवर अनेक वेळां 'क्रॉस' चढवण्याचा प्रयत्न झाला म्हणे; पण तिथे तो टिकतच नाही. त्यामुळे कळस असलेलें नावीन्यपूर्ण चर्च पहावयास मिळतें.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

अजूनहि बालामहादेवाचें देऊळ म्हणूनच लोक ओळखतात. या चर्चमध्ये ५००० वर्षां पूर्वींच्या वस्तूंचें 'वस्तुसंग्रहालय' आहे. इतक्या वर्षांपूर्वींच्या खुर्च्या, टेबलें जशीच्या तशींच आहेत अजून. नंतर गेट वे ऑफ इंडिया व सेंट फ्रॅन्सिस जेवि-अरचें चर्च व त्याच्या शवाची पेटी पाहिली. या बाबत एक आख्यायिका आहे तीहि सांगते हं तुम्हालाः--सुरवातीला आलेल्या पोर्तुगीज मिशनऱ्यांपैकीं हिंदूंना बाटविण्यांत प्रसिद्धीस आलेला हा एक श्रेष्ठ पुरुष होता. त्याने धर्मप्रसाराचें काम चांगलें केल्याने त्याला लोक फार मानीत, व म्हणूनच त्याच्या मृत्युनंतर त्यास न पुरतां या पेटींत ठेऊन दिला आहे. त्याचे हें मृत शरीर नेहमीच जिवंत माणसा-सारखें दिसतें म्हणतात. एकदां एका चिकित्सकाने त्याचा हात कापून पाहिला तो काय-त्यांतून रक्ताची धार वाहूं लागली. पण त्यानंतर त्याच्या देहावरची टवटवी कमी झाली. अजूनहि दर बारा वर्षांनी ही पेटी उघडण्याचा मोठा समारंभ होतो असें सांगतात. गम्मत आहे नाही !

नंतर 'आर्च बिशप ऑफ दि इस्ट' यांचा राजवाडा पाहिला. आशिया व पूर्व गोल'र्धांतील सर्व ख्रिश्चनांवर याची सत्ता चालते. हा पण ५०० वर्षां पूर्वींचा असून तेथील फर्निचर व इतर वस्तु आजच घडवल्याप्रमाणे दिसतात. त्यानंतर येथील विश्वविद्यालय-हिंदी वकील श्री. अशोक मेहता यांचें निवासस्थान-नभोवाणी केंद्र या इमारतीं नुसत्या बाहेरूनच पाहून घेतल्या.

ख्रिश्चनांच्या चर्चेस् अंतर्बाह्य प्रेक्षणीय असतात. पांच सहाशें वर्षां-पूर्वींची कला किती प्रमाणांत प्रगतिशील होती हें कळून येतेच नि शिवाय अनेक बऱ्यावाईट गोष्टींचा धावतां इतिहासहि मनःचक्षूसमोरून धावून जातो.

मोटारनेच हें सर्व पाहून माहोल येथें येऊन चहा, खाणें-पिणें उरकून तेथील ' लक्ष्मी --खळनाथ, ' ' देवकी कृष्ण, ' ' शांता दुर्गा,' ' महादेव ' व इतर छोटीं छोटीं देवालयें पाहून घरीं परतलों. रात्रीं जेवणानंतर बराच वेळ शीतल चांदण्यांत मनमुराद गप्पा मारल्या --विनोद केला नि झोंपलों. सकाळीं लवकरच उठून आमचीं आन्हिकें उरकलीं नि मोटारची वाट पहात बसलों. सकाळीं ८ ला येणारी मोटार १२ वाजले तरी न आल्यानं मन कसं बेचैन झालं होतं. अनेक शंका कुशंका येऊं लागल्या मनांत. अखेरीस २ वाजेपर्यंत वाट पाहून 'सर्विस मोटारने' आमचें पहावयाचें राहिलेलें 'साखळीचें दत्तमंदीर' नि इतर स्थळें पहाण्यास निघालों. आतापर्यंत मिळालेली टॅक्सी नि ड्रायव्हर अगदी घरचीच असल्यासारखी वाटल्याने ज्यावेळीं त्या टॅक्सीला अपघात झाल्याचे व ड्रॉयव्हरला किरकोळ जखमांनी इजा पोंचल्याचें ऐकून फारच वाईट वाटलें.

माहोलहून सर्विसने ' नागेशीला ' जाऊन 'नागेशाचें देऊळ, नंतर मंगेशाचें देऊळ नि तेथील दीपस्तंभ पाहिले. देवळें बरीच भव्य-कौशल्यपूर्ण

अनुक्रमणिका
मराठीचा विकासः महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

बांधणीचीं असल्याने मनाला कसं शांत व प्रसन्न वाटलें. नंतर फॉंडें येथे शिंत्रे यांचे घरीं जाऊन पाहुणचार घेतला. फॉंडें हें एक साधारण खेडेगांव आहे. इथे 'सुरंगी' नि 'बकुळीचीं' झाडें फार दिसून येतात. 'सुरंगीच्या' फुलांचा हा मोसम नसल्याने त्यांचा उपभोग घेतां आला नाही. 'बकुळीचा' मात्र सगळीकडे नुसता सडा पडलेला. हीं फुलें इथे इतकीं अमाप आहेत की कुणाचं लक्षहि नसतं त्यांकडे. अति परिचियात अवज्ञा ती अशी !

दुसऱ्या दिवशीं टॅक्सीने मडगांवला गेलों. तिथे पुन्हा श्री. कारे यांचेकडे पाहुणचार घेऊन दिनांक २७ ला सकाळीं ८॥ ला आम्ही मडगांव सोडलें. गोव्याच्या 'खास' डब्यांत आम्ही बसल्याने पुन्हा गर्दीची तीच पुनरावृत्ती नशिबाला आली. यावेळीं गर्दीचं प्रमाण थोडें अधिकच होतं. इकडून परत फिरतांना 'कोलेम' व 'कॅसल रॉक' इथे तपासणीचा लकडा आहेच. विकत घेतलेल्या वस्तूंवरील कराचा बोजा —त्यांची ती तपासणी हें सारं पाहून वाटतं—'नको तें गोव्याला जाणं नि नको तें सृष्टिसौंदर्य पहाणं ! यापेक्षा गोव्याहून अमुक अमुकच वस्तू आणतां येतील अशा आशयाच्या सूचना कां देत नाहींत कुणास ठाऊक ! अशा प्रकारची सूचना प्रवाशाला मिळाल्यावर त्याच्या पाठीमागचा हा तपासणीचा त्रास तरी वाचेल. हो ! एकदा समजलं की अमुक वस्तु आणावयाच्या नाहीत तर कोण जाईल त्या वाटेला ? नाहीतर पहा ना— मी १२ वड्यांचा लव्हेंडर साबूचा डबा खरीदला होता नि त्याकरतां मला १ रु. २ आ. कर भरावा लागला.

एकंदरींत काय की हिंदुस्थानच्या या नंदनवनाचें-गोव्याचें दर्शन घ्यायचें—त्यांतील सृष्टिसौंदर्याचे आकंठ पान करावयाचें म्हणजे नारळाच्या झाडावरचा नारळ काढून खाण्यापैकीच प्रकार आहे. श्रीमंत सुखवस्तु लोकांच्या दृष्टीने ही सफर सहज सुलभ आहे. पण आपल्या मध्यम वर्गाची कुचंबणा भारी. अल्पसुखासाठी अनेक दुःखें सोसावीं लागतात. इतक्या दुःखांतूनहि मनाला फार बरं वाटतं नि त्याचं कारण म्हणजे इथली निसर्ग रम्य, अकृत्रिम अवर्णनीय शोभा. नारळी पोफळींचीं उंच झाडें—फणसांचे फलभरित लवलेले मंडप—टपोऱ्या अननसांचे मोटमोठाले बगीचे—दळभरीत जांभळाचे वृक्ष—हरतऱ्हेच्या फुलांचा सडा शिंपणारी लता नि झाडें हें पाहिलं की मन वेडं होतं. कशा कशाचा उपभोग घ्यायचा हेंच कळेनासं होतं. शब्दानं वर्णन करायच म्हटलं तर तें वर्णनच कृत्रिम होईल. शब्दांची वाण पडेल—बोलतांना वाणी अडखळेल इतकं विलक्षण रम्य स्थळ आहे हें, खरंच बरं ! तुम्ही एकदा काढाच इकडची सफर. जें शब्दांनी लिहितां येणार नाही, तें प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहून तुम्हालासुद्धा माझ्यासारखाच मोह पडेल. हें सगळं लिहितां लिहितां मी तुम्हाला इकडच्या लोकांची—त्यांच्या रीति-रिवाजाची कांहीच कल्पना दिली नाही.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

१९५१
जून

इथले लोक की नाही भारी प्रेमळ, आदरातिथ्यप्रवीण—नि भावडे वाटले. त्यांच्या पाहुणचारांत कांहीचा कृत्रिमपणा नाहीं. सगळं कसं मनापासून करतात. ब्राम्हणांबद्दल इकडे एक निराळाच दृष्टीकोन दिसून आला. सारस्वतांना हे लोक ब्राम्हण म्हणतात—नि आपल्यासारखे पुण्या-मुंबईचे ब्राम्हण म्हणजे इकडे भट. इकडच्या ब्राम्हणांनी मांसाहार घेण्याबाबत विशेष विधि-निषेध नसल्याने आम्ही ज्या ज्या 'ब्राम्हणांच्याकडे' उतरलों होतों तिथे तिथे आम्हाला मांसाहाराचा आग्रह होत असे. पण आम्ही पडलों भट—त्यामुळे त्या चवीला आम्ही पारखे ठरलों खरें. इकडे सकाळीं चहाऐवजी कॉफी घेण्याची पद्धत दिसून आली. कॉफी बरोबर चपाती—भाजी अगर चटणी घेतात लोक. मग १०–११ वाजता तांदुळाची पेज नि नंतर १ वाजतां भात—भाजी—मासळी नि नारळाचे सार यांचं चमचमीत जेवण. दुपारीं आपल्यासारखा इकडे चहाच घेतात, नि रात्रीं पुन्हा पोळीसहीत जेवण. रात्रीं केलेल्या साराला खोबरेलाची फोडणी द्यायची हाच काय तो फरक. तुपाऐवजीं खोबरेलाची इकडे रेलचेल दिसली. अर्थात् कुठल्याही 'बाजारी वनस्पती' पेक्षा हें शुद्ध खोबरेल लाख पटीने बरें असेंच वाटतें. खोबरेल खाण्याचं इतकं वेड आहे की पापड नुसते भाजून कोरडे न खातां त्यांना खोबरेल लावून खाण्याची प्रथा आहे. इतकं तेलकट खाणं नि सारखा तिन्हीत्रिकाल जेवणांत भात असला तरी इकडचे पुरुष नि स्त्रिया अगदी सडपातळ आहेत. लोक खाऊन-पिऊन सुखी असल्याने चोरांची भीति नाहींच जणुं. पुण्या-मुंबईला केव्हांहि रस्त्यावर दिसत असलेल्या बायकांप्रमाणें इकडे बायका हिंडतां फिरतांना मुळींच दिसत नाहीत. 'फिरायला जाण्याचं खाथ' नाही इकडं. आपलं घर, आपला संसार यांतच सुख नि समाधान मानून राहणाऱ्याच बायका दिसल्या साऱ्या. माझी कल्पना होती की इथे मदिरा नि मदिराक्षी यांचा सुकाळ असेल. आपण बाहेरगांवी किती ऐकतो नाही 'गोवेकरणीबद्दल!' पण इकडे तसं कांहीच दिसत नाहीं. मला वाटायचं की चिक्कार मस्त—सौंदर्यवती गोवेकरणी दिसतील ठिक ठिकाणीं—पण प्रत्यक्ष आला अनुभव निराळाच. अखेरीस मला रहावलं नाही नि मी विचारलंच एकदां—तेव्हा मला असं सांगण्यांत आलं की मुंबईच्या शेठ्यांनी त्यांना तिकडे नेऊन ठेवल्याने सध्या त्यांची संख्या घटली आहे. तेव्हा—पुरुषांना एकट्याला इकडे पाठवण्यांत आता कांहीच कारण नाही हं.

मदिरामदिराक्षी पैकीं मदिराक्षीबद्दल लिहिलंच आहे. मदिरा भरपूर आहे. त्याचप्रमाणं आंबे, फणस, काजू, जांभळें यांचीहि वाण नाही. अगदी मस्त चंगळ. इकडचे 'आल्फान्सो आंबे' फार प्रसिद्ध आहेत. आणखी एकप्रकारचे आंबे अगदी आजारी माणसाला दिले तरी चालतात. नांव काय माहित? मानकूर! ८–१० रुपयांत एक शेंकडा मिळतात हे आंबे. मोठ्यांत मोठा फणस १२ आणे तें १ रुपयापर्यन्त मिळतो. १–२ पैशापासून ३–४ आण्यापर्यन्त साधारण बऱ्यापासून उत्तम अननसापर्यन्त अननस मिळतात. या फळांप्रमाणेच

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

परदेशी कापड व चैनीच्या वस्तूसुद्धा पुष्कळ आहेत इकडे. काय काय खायचं नि काय काय खरेदी करायचं हेंच कळत नाही. खाल्लं भरपूर पण कराच्या भीतीनं खरेदी मात्र कांहीच करतां आली नाही.

शक्यतो पाल्हाळ न लावतांच हें वर्णन केलं आतापर्यंत. एकंदर ७५ रुपयांची ही सफर (मध्यम स्थितींतील माणसाची हं)· आहे. संपलं हें मुंबई ते गोवा नि गोवा ते मुंबईपर्यन्त वर्णन. तुमचा काय ग्रह झाला पत्र वाचून तें अवश्य कळवा. कळावें.

तुमची
वहिनी.

तीन कणिका

★

जीवनास उपमा सिंधूची दे कुणी
'बाजार' 'जुगारहि' म्हणिती त्यालागुनी
उपमांचा होईल ग्रंथच तो शोधितां !
फुगतांच क्षणोक्षणि उपमांचें वेष्टन
गुद्मरे परंतु आंत खरें जीवन !

जाहला मानसीं तन्मय प्रेक्षकगण
नायिकानायकीं स्वतांस तें कल्पुन
प्रणयांत धुंदलीं नायक अन् नायिका
ये जणूं उधानच अहा ! प्रीतिसिंधुला
तों......तोंच अचानक खलनायक ठाकला !

म्हणतात कशाला 'प्रेम' मला नच कळे
ना जीव 'कुणास्तव' माझा कधि तळमळे !
मज म्हणेलही कुणि, 'अरसिक बेटा दिसे'
तो मधुप लुटे रसिकसा गंधमाधुरी
यौवनीं सौरभा लुटितों मी ही तरी !!

—उ. रा. गिरी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ
मकर संक्रांत, १९२३

आभार आणि थोडी दुरुस्ती

★

श्रीयुत संपादक "युगवाणी" यांस सा. न. वि. वि.

आपल्या मार्च १९५१ च्या अंकांत श्रीयुत सुरेश डोळके ह्यांनी लिहिलेल्या माझ्या विषयीचा व माझ्या ग्रंथाविषयीचा परिचयात्मक लेख आपण प्रसिद्ध केला आहे. त्या लेखाचे व्यक्तिपरिचय व वाङ्मयपरिचय असे दोन भाग आहेत. व्यक्तिपरिचयांत माझी इतकी स्तुति केली आहे की तीमुळे मला लाजल्यासारखे वाटत आहे. शिवाय ह्या स्तुतीमुळे, ग्रंथपरिचयाची किंमत कमी होण्याचा संभव आहे, कारण त्या स्तुतीमुळे, लेखकाची दृष्टि पूर्वग्रहदूषित आहे असें वाचकांस वाटेल. लेखांत हा दोष असला तरी माझ्या ग्रंथाविषयीं लेखकाने जें लिहिलें त्याबद्दल लेखकाचा आणि तें प्रसिद्ध केल्या-बद्दल आपला मी फार आभारी आहे. ह्याचें कारण त्यापासून माझा कांही फायदा आहे असें नसून त्यापासून भारताचा व जगाचा फायदा होईल असें मला वाटतें हें होय. हे असे हितकारक ग्रंथ मजकडून लिहिले जातील ही कल्पनाही मला नव्हती. मी जरी ग्रंथ पौरुषेयच आहेत असेंच म्हणणारा आहे, तरी त्या ग्रंथांची नवीनता, सत्यता आणि उपयुक्तता पाहून, तुकारामाने "काय म्या पामरें बोलावी उत्तरें परि त्या विश्वंभरें बोलविलें," म्हटलें तसेंच सरस्वतीनेच मजवर प्रसन्न होऊन मजकडून हे ग्रंथ लिहविलें असेंच मला म्हणावेसें वाटतें. अशा ग्रंथांची माहिती लोकांस लेखकाने व आपण करून दिली ह्याबद्दल मी फार आभारी आहे. लेखकाचे आभार मानण्याचें दुसरेंही एक महत्वाचें कारण आहे. लेखकाने माझें संपूर्ण ग्रंथ वाचून त्यांतील सिद्धां-तांचें वर्णन अगदी यथार्थपणे केलें आहे. त्यांत फक्त दोन ठिकाणी नजरचुकीने दोन चुका झाल्या आहेत, पान ९४ वर सहाव्या ओळींत "कृतयुगाच्या" ऐवजी "कलि-युगाच्या" असें पाहिजे आणि पान १०२ वर आठव्या ओळींत "ऑरग्यानोपथी" ह्या ऐवजीं "बायोकेमेस्ट्री" असें पाहिजे. ह्या शिवाय एक किंचित् अधिक महत्वाची चुकी आहे. "धर्मरहस्याच्या" प्रकरणांत "मनुसतर्षी जें ठरवित त्याचा अंतर्भाव 'स्मृतींतच' होत असे. प्राचीन धर्मग्रंथांत गौतम, वसिष्ट, बौधायन, आपस्तंभ इत्यादि स्मृतिग्रंथांचाच भरणा जास्त असावा याचेंही मर्म झालें तरी हेंच होय" असें म्हटलें आहे पण तें चूक आहे, वास्तविक, "मनुसतर्षि जें ठरवित त्याचा अंतर्भाव वेदांमध्यें किंवा मनुस्मृतींतच होत असे. मनुसतर्षि संस्था कार्य करीनाशी झाल्यानंतरच गौतमादि स्मृति अनाधिकारी पुरुषांनीं निर्माण केल्या." ह्या थोड्या चुका असल्या तरी क्षुल्लक आहेत. एकंदरींत ग्रंथांतील सिद्धांताचें वर्णन यथार्थच आहे. व त्याबद्दल मी लेखकाचा फार आभारी आहे.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

माझ्या व ग्रंथांच्या इतिहासांत मात्र फार महत्त्वाच्या चुका झाल्या आहेत व त्यापैकीं कित्येक जाहीर करणें माझें कर्तव्य आहे. "१९०६ सालीं मुंजे अभ्यंकरांच्या नेतृत्त्वाखालीं '१६ सर्कलची स्थापना' करून" असें शब्द योजिले आहेत ह्यावरुन '१६ सर्कलची' स्थापना मी केली असा गैरसमज होईल. वास्तविक ही स्थापना करणारे डॉ. मुंजे व कै. दादासाहेब उधोजि हे होत.

"डी. लिट्चा स्वीकार करतांना भाऊजींनी इंग्रज गव्हर्नरांचा स्पर्श हस्तांदोलनाच्या निमित्ताने कां होईना, पण आपल्या शरीरालाहि होऊं दिला नाहीं, इतकेंच नव्हे तर इंग्रज सरकारकडून वर्षासन घ्यावें लागेल या एकाच जाणीवेने जिवलग स्नेह्यांच्या सतत आग्रहालाहि न जुमानतां भाऊजींनी 'महामहोपाध्याय' या बहुमानाचाही स्वीकार केला नाहीं" हेंही खरें नाहीं. मला 'महामहोपाध्याय' पदवी मिळावी किंवा द्यावी हें कोणाच्या मनांतही आलें नाहीं व मला कोणी त्याविषयीं म्हटलेंही नाहीं. डी. लिट् विषयीं मात्र मला मित्रांनीं फार आग्रह केला व मी मोठ्या नाखुषीने ती स्वीकारली. गव्हर्नराशीं हस्तांदोलन करावें लागेल म्हणूनहि ती स्वीकारण्यास मी नाखुष असलों तरी, ती स्वीकारतांना माझें गव्हर्नरांशीं हस्तांदोलन झालें किंवा नाहीं व झालें नसल्यास कां झालें नाहीं याचें मला यत्किंचितही स्मरण नाहीं. "जगद्‌गुरु श्रीशंकराचार्य यांच्या नाशिक येथील धर्म महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून भाऊजींनी निर्वेतन काम केलें" हें खरें नाहीं. मला तेथें वेतन मिळत असे.

पान ९५ वरील "लोकमान्य टिळकांनीं प्रस्तुत प्रबंध तात्यासाहेब कोल्हटकरांकडून मुद्दाम मागवून वाचला होता" ह्या वाक्यापुढील संपूर्ण प्यारा "महाभारतीय युद्धकाल निर्णयाच्या प्रकरणांत घातला पाहिजे होता. "महाभारतीय युद्धकाल निर्णयाची लेखी प्रत मी लोकमान्यांस डॉ. मुंजे याजबरोबर पुण्यास गेलों असतां दिली. त्याशिवाय माझा कोणताच निबंध किंवा ग्रंथ लोकमान्यांनीं वाचला नाहीं. त्यांच्या मृत्युपूर्वी दीड महिना, "करणकल्पलते" विषयीं वाटाघाट करण्यास मी पुण्यास गेलों असतां मी "धर्मरहस्याची" लेखी प्रत त्यांना वाचण्यास दिली व ती वाचण्याचें त्यांनी निक्षून कबूल केलें होतें पण मृत्यूनें त्यांचा, माझा, "धर्मरहस्या"-चा, व राष्ट्राचाहि घात केला.

किरकोळ चुका खालीं दिल्याप्रमाणें आहेत :—

पान	ओळ	अशुद्ध	शुद्ध
९२		१९१८	१९१२
९२	१६	गति	रीति
९७	२८	ब्रह्म	जनित
९९	२।३	भाऊजींना मुद्दाम पत्रें पाठवून	ह्या ग्रंथावर अभिप्राय प्रसिद्ध करून
१००	३२	लिहून	लिहित असतांनांच
१०१	२५	वा.	ना.
१०१	१९	येथील "१९११ मध्यें" हे शब्द गाळावे	
१०२	२८	जात	ज्ञात

—के. ल. दप्तरी.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

माझी प्रीत

★

विश्वसागरीं विलीन व्हाया होती जी गात
हृदयमंदिरीं बंदिवान कां केलिस मम प्रीत ?

तारकांसवें स्वैर विहरते अनंत आकाशीं
नव तेजाच्या कण कण उधळी जी भूमीवरती
पुष्पांच्या हास्यांत प्रभातीं लपली क्षण एक
हृदय मंदिरीं बंदिवान कां केलिस मम प्रीत ?

वायूच्या लहरींवर बसुनी अनंत हृदयांत
उत्साहाचा कलश घेउनी फिरते दिनरात
वैषम्याला वाहुनि नेते दूर वादळांत
हृदय मंदिरीं बंदिवान कां केलिस मम प्रीत ?

भ्रमरांचे मधु गुंजन आणि कूजन विहगांचे
गुंफित कवनें घेउनि सारे स्वर माधुर्याचे
दंव बिन्दूची मृदुता हसते विशाल नयनांत
हृदय मंदिरीं बंदिवान कां केलिस मम प्रीत ?

संध्येचा प्रासाद रंगला नवविध रंगांनी
चित्रकलेचे पाठ घेइ जी मेघपटांमधुनी
विश्वाच्या विविधतेंत रमली जी स्वच्छंदांत
हृदय मंदिरीं बंदिवान कां केलिस मम प्रीत ?

प्रणयाचा मधु रंग रेखिला तूं मम हृदयांत
आणि भंगली नवविध चित्रें क्षणांत तेव्हांच
प्रणयाच्या उन्मत्त नशेनें करुनी बेहोष
हृदय मंदिरीं बंदिवान कां केलिस मम प्रीत ?

अडवु नको मम जीवन सारें तुझ्याच पात्रांत
दोघे मिळुनी अखंड वाहूं विश्व सागरांत
चल ये गुंफूं भाव-फुलांची माळ अनंतांत
हृदयमंदिरीं बंदिवान कां केलिस मम प्रीत ?

—सौ. माया सरदेसाई

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पुस्तक परीक्षण

जुगार आणि हद्दपार

राम डोके

★

लघुकथा लेखिका म्हणून कांही दिवसापूर्वी बऱ्याच गाजलेल्या मुक्ताबाई–दीक्षितांचें हें पहिलें नाटक. नाटकाचें संविधानक १९४६ सालीं सवतबंदीचा कायदा पंधरा दिवसांवर आला असतांनाचें आहे. एका विशिष्ट कालखंडांत जनतेला जिव्हाळयाचा वाटणारा विषय, भाववाही भाषा, संविधानकांत नाट्यपूर्ण घटनांची योजना, ह्या नाट्यप्रयोग यशस्वी करून दाखविण्यासाठी आवश्यक असणाऱ्या अंगांकडे लेखिकेने विशेष कसोशीने लक्ष पुरविल्याने प्रस्तुत नाटक पुण्या–मुंबईच्या रंगभूमीवर बरेंच गाजलें ह्यांत नवल नाही.

'सपत्नीकाचें लग्न' हा जरी प्रस्तुत नाटकाचा विषय असला तरी हें नाटक लिहिण्याचा लेखिकेचा अंतिम उद्देश केवळ त्या विषयापुरताच मर्यादित नाही. तो त्यापेक्षा बराच व्यापक आहे. त्यांच्या मतें हा सपत्नीविवाहाचा प्रश्न सोडविण्या-साठी सरकारला कायदा करावा लागला, मानवतेच्या भूमिकेवरून तो प्रश्न सुटला नाही. आणि म्हणूनच प्रस्तुत विषयाची निवड करतांना कांही मंडळींना तो जुना, शिळा, अतएव नाटकास अपात्र असाहि वाटण्याची शक्यता आहे, ह्या गोष्टीची पूर्ण कल्पना असूनसुद्धां 'एकाच्या दुःखांतून दुसऱ्याच्या सुखनिर्मितीची आवश्यकता' ह्या त्यांना अंतिम महत्त्वाच्या वाटणाऱ्या विषयाचें सामाजिक व्यवहारांतील एक उदाहरण म्हणूनच त्यांनी हें कथानक निवडलें आहे. स्वतःच्या जीवनांत सुखाचा शोध करण्यासाठी अविरत परिश्रम करणाऱ्या सुसंकृत, सहृदय मानवाला दुसऱ्याच्या दुःखांतून निर्माण झालेलें सुख, खऱ्या अर्थाने सुख वाटणें अशक्य आहे हें व्यापक तत्त्व त्यांना प्रस्तुत नाट्याच्या संविधानकांतून ध्वनित करावयाचें आहे.

एका नव्या मानवतावादी दृष्टिकोणांतून प्रस्तुत नाटकांतील 'सपत्नीविवाहाचा प्रश्न' हाताळण्याचा लेखिकेचा प्रयत्न निःसंशय प्रशंसनीय आहे. उमलत्या यौवनां-तील अधीर नि आंधळया प्रणयानें धुंद झालेली उषा, वसंतरावांसारख्या सपत्नीकाशीं विवाह करण्यास आतुर झालेली असते. त्यांच्या भरीला आपली आई ही वसंतरावांच्या सासऱ्याची-बाबासाहेबांची, पहिली परित्यक्ता पत्नी आहे, हें तिला कळतांच तिच्या मनांत सूडाची भावना बळावते, व ती आपल्या आईचा त्याग करणाऱ्या वडिलांच्या दुसऱ्या बायकोपासून झालेल्या मुलीची म्हणजेच स्वतःच्या सावत्र बहिणीची सवत होण्याचा हेका सोडीत नाही. अशा मानसिक अवस्थेला पोचलेल्या उषेला सपत्नीविवाहापासून परावृत्त करण्यासाठी लेखिकेने हिंदु स्त्रीच्या हळुवार हृदयांत अखंड जागृत असणाऱ्या एका वास्तव भावनेचा मोठ्या कौशल्याने उपयोग करून घेतलेला आहे. दुसऱ्या कुणाचें तरी सुख पायांत पुरून त्यावर आपण आपल्या सौख्याची इमारत उभारीत आहोंत, त्यावर आपण शापित आहोंत कोणाचे तरी तळतळाट आपल्याला भोवताहेत ह्या कल्पनेच्या भूतापासून हिंदु स्त्रीचें हिंदु मन सहसा सुटूं शकत नाही. ह्या कल्पनेपासून सुटूं न शकलेल्या आपल्या दुसऱ्या आईच्या विफल विवाहाची हृदय हलवून सोडणारी कहाणी ऐकून सहृदय उषा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

हेलावून जाते. ते प्रतीतीचे बोल तिच्या संवेदनाक्षम अंतःकरणावर पूर्णपणे बिंबले जातात. व ती शेवटीं म्हणते—'दुसऱ्याच्या दुःखांतून स्वतःची सुखनिर्मिति होऊंच शकत नाही. माझं सुख......माझं सुख......नको मला तें सुख......'

हृदयाची सहज पकड घेणारे कथानक, प्रासादिक नि ओघवती भाषा, त्या विशिष्ट कालखंडांत अतिशय जिव्हाळ्याचा वाटणारा प्रश्न व तो मानवतावादी मार्गाने सोडविण्यासाठी करून घेतलेला हिंदु स्त्रीच्या स्वभावांतील एका अतिशय वास्तव छटेचा उपयोग यामुळे नाटक चांगलेंच रंगलें आहे. लेखिकेच्या भाववाही भाषेंतून विचार व विकार सारख्याच सहजतेनें विहार करतांना आढळतात. पण अशा ह्या बव्हशीं निर्दोष वाटणाऱ्या नाट्यकृतींतही एक ठळक दोष राहून गेलेला आढळतो. तो म्हणजे लेखिकेने प्रस्तुत नाटकांत घातलेली एक नाट्यपूर्ण घटना. 'बाबासाहेबांच्या दुसऱ्या बायकोपासून झालेल्या मुलीची सवत होऊं इच्छिणारी उषा, त्यांची पहिल्या बायकोपासून झालेली मुलगी आहे,' हा नाट्यपूर्ण, पण योगायोगावर आधारलेला एक बराचसा कृत्रिम प्रसंग त्यांनी संविधानकांत घातलेला आहे. प्रस्तुत घटनेचें समर्थन करतांना लेखिका म्हणते की विषयाच्या दृष्टीने जरी कथानकाला या घटनेची जरूर नसली तरी नाट्याच्या दृष्टीने आहे. पण यामुळे एका गोष्टीकडे लेखिकेचें दुर्लक्ष झालेलें आहे. व ती म्हणजे ह्या नाट्यपूर्ण घटनेमुळे नाटकाच्या कथानकाला एक प्रकारची अपवादात्मकता आलेली असून मूळ विषयापेक्षा ह्या नाट्यपूर्ण घटनेंतच वाचकांचें बरेंचसें लक्ष गुंतून राहतें, वास्तविक नाटक वाचीत असतांना जीवनाचा गंभीर विचार करायला लावणाऱ्या प्रतिपाद्य प्रश्नाचा पगडा वाचकांच्या मनावर सतत राहायास हवा. त्यांत मूळ विषयाशी विशेष संलग्न नसणाऱ्या घटनांचा अकारण अडथळा अगदी नको. पण इथे मात्र तो ब्रह्मदेश, तेथून आलेले व मराठीसारख्या भाषेंत बोलणारे ते चैतन्यानंद, ती बाबासाहेबांची ब्रह्मदेशांत आपल्या भावाकडे जाऊन राहिलेली परित्यक्ता पत्नी, तिला तिथे गेल्यावर झालेली मुलगी, बाबासाहेबांच्या इंदिराबाईपासून झालेल्या तरुण, बावदूक, नि जगांत मोकळे-पणाने वावरणाऱ्या वेत्रीला (ह्या रहस्यपूर्ण घटनेला पोषक असल्यामुळे) आपल्याला एक पहिली आईहि होती ह्या गोष्टीचा सुगावाहि नसणें, ह्या गोष्टी लेखिकेने बेलाशक वापरून टाकल्या आहेत. ह्याचा परिणाम असा की 'सपत्नीकाचें लग्न' ह्या प्रश्नाद्वारें 'एकाच्या दुःखांतून दुसऱ्याच्या सुखनिर्मितीची अशक्यता' हें लेखिकेच्या दृष्टीने अंतिम महत्त्वाचें तत्त्व वाचकांच्या मनावर बिंबविण्याचा लेखिकेचा हेतुहि तितकासा सफल झाला नाही. याउलट लेखिकेनें हा नाट्यपूर्ण प्रसंग घालण्याचा मोह आवरला असता व उषा ही एक अगदीं तिऱ्हाईत मुलगी म्हणून जरी नाटकांत ठेवली असती तरी ह्या संविधानकांतील अपवादात्मकता निघून जाऊन प्रतिपाद्य प्रश्नाच्या दृष्टीनें तें अधिक यथार्थ झालें असतें. पण ललितकृतींत एखादी रहस्यपूर्ण घटना घातल्याशिवाय ती परिणामकारक होऊं शकत नाही ह्या कांही वर्षांपूर्वी बळावलेल्या एका लेखकप्रिय (गैर) समजुतीला त्या बळी पडल्या आहेत.

असें जरी असलें तरी, प्रासादिक व भाववाही भाषा, स्वच्छ नि स्वतंत्र विचारसरणी, नाट्यतंत्राचें सूक्ष्म अभ्यसन, मानवतावादी दृष्टिकोणांतून विवाद्य विषयाकडे पाहण्याची लेखिकेची विचारप्रधान भूमिका आणि संपूर्ण नाट्यकृतींत आढळणारा कलात्मक संयम, ह्या भांडवलाच्या भरंवशावर नाट्यक्षेत्रांत उज्ज्वलतर यश संपादन करणें लेखिकेला विशेष कठीण जाणार नाहीं.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

★

'एल्गार' या आपल्या पहिल्याच कादंबरीनें सुजाण मराठी वाचक वर्गाचें लक्ष वेधून घेणाऱ्या श्री. श्री. ना. पेंडसे यांची ही दुसरी कादंबरी. त्यांच्या 'एल्गारनें आपणाला एका वेगळ्याच विश्वाचें दर्शन घडवून दिलें व प्रत्यहीं प्रचंड प्रमाणावर प्रकाशित होणाऱ्या बऱ्याचशा कादंबऱ्यांतून केवळ अभावानें जाणवणाऱ्या कांहीं ठळक वैशिष्ठ्यांची ओळख करुन दिली. कितीतरी वर्षांपासून मराठी कादंबरीच्या एका अल्पसंख्यांक पण डोळस वाचकवर्गाला चुकल्याचुकल्यासारखें वाटत होतें, सुंदर मुखपृष्ठांच्या कादंबऱ्या वाचून त्याचें तोंड पोळलें होतें; मोठ्या नांवाच्या लेखकांचें खोटें दर्शन घेऊन तो वंचित झाला होता. हरीभाऊंच्या कादंबऱ्यांनी मराठी कादंबरीच्या भवितव्याविषयीं त्याच्या मनांत निर्माण झालेल्या कितीतरी अपेक्षा पूर्ण झाल्या नव्हत्या, होत नव्हत्या.

पण अशा या कालखंडांतहि कांही बोटावर मोजण्यासारख्या लेखकांनी ह्या वाचकवर्गाच्या अपेक्षा जगवल्या, वाढवल्या आणि मध्यंतरीच्या काळांत पुसट पुसट होत चाललेली, हरीभाऊंनी पाडलेली मराठी कादंबरीच्या उत्क्रांतीची पाऊलवाट, आपल्या चरणचिन्हांनी सजीव केली. 'एल्गार' नि 'हद्दपार' ह्या कादंबऱ्यांचे लेखक श्री. श्री. ना. पेंडसे हें त्यांच्यापैकींच एक आहेत.

'एल्गार' ह्या कादंबरींतून साखरपेंडी ह्या गांवांतील दोन हिंदु–मुसलमान सुशील मित्रांची प्रेमकथा रेखाटल्यानंतर प्रस्तुत 'हद्दपार' ह्या कादंबरींत पेंडशांनी दुर्गेश्वर येथील एका शाळामास्तराचें जिवंत चरित्रचित्रण केलें आहे. गजबजलेल्या जगापासून दूर कोंकणांतील कोंपऱ्यांत वसलेलें हें दुर्गेश्वर गांव, जिथें अजून शहरी सुधारणांचें वारें पोंचलें नाही, जिथला प्रत्येक माणूस दुसऱ्या प्रत्येक माणसाला ओळखणारा, जिथली कुठलीहि लहानसहान गोष्ट साऱ्या गांवाच्या चर्चेचा विषय होणारी—असें हें दुर्गेश्वर. अशा ह्या खेड्यांत राहून अध्यापनाबरोबर आणखीही अनेक कार्यें करणाऱ्या एका शाळामास्तराची जीवनकथा पेंडशांनीं आपल्या प्रतीतिपूर्ण लेखणीने चितारली आहे. एका सामन्याच्या जीवनांतील असामान्यता, महात्मता त्यांनी अतिशय कुशलतेनें नि संयमानें दाखवून दिलेली आहे. कुठेंहि अतिरंजन नाहीं, अवास्तवता नाहीं, अतिवास्तवता नाहीं नि अनावश्यक अश्रुपातहि नाहीत. सारें अगदी साधें, अगदी सरळ व जिवंत. कोंकणच्या वातावरणांत बरीच वर्षें घालविलेल्या लेखकानें स्वतःच्या प्रतीतीशीं प्रामाणिक राहून अगदी जवळून न्याहाळलेलें मास्तरांचें जीवन रंगविलेलें आहे.

दुर्गेश्वरांतील आपल्या ऐतिहासिक राजेवाड्यांत इनामदारी इतमामानें राहणाऱ्या भाईचें, मास्तरांच्या वडिलांचें व्यक्तिचित्रण ठसठशीत आहे. संपत्ति हळुहळू नाहीशी होत गेलेली व राजेवाड्याच्या रुपाने शिल्लक राहिलेलें राजांचें खानदानी वैभवही कणाकणातून जमीनदोस्त होत चाललेलें. तरीहि आपल्या पराक्रमी पूर्वजांच्या स्मृतीशलाकेंतून स्फूर्ति घेणाऱ्या भाईंच्या स्वभावांतील इनामदारी पीळ अजून कायम आहे. अशा भाईंच्या पोटीं आलेले मास्तर मात्र सुरुवातीपासूनच अगदीं वेगळे आहेत. पूर्वजांच्या पराक्रमाच्या पुंजीवर जगत राहणें, त्यांतच आनंद मानणें ह्यावर मास्तरांची विशेष श्रद्धा नाही व म्हणूनच जुन्या जाणीवांना उराशीं कवटाळून बसणाऱ्या भाईंच्या आशाआकांक्षांना धक्का देण्याचें मास्तरांचें कार्य सुरुवातीपासून सुरू आहे. वाणीपेक्षां करणी जास्त बोलकी असते ह्यावर त्यांचा विशेष विश्वास आहे. किंबहुना

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अबोल मास्तरांच्या बोलक्या कर्तृत्वाचे सूरच ह्या कादंबरीच्या पानापानांतून उमटले आहेत. कुठल्या गोष्टीचा अकारण गाजावाजा नाहीं, जें पटलें तें न बोलता निश्चयानें करीत राहायचें हा त्यांचा बाणा. नोकरी करायची हें ठरल्यावर नामधारी इनामदारीच्या अतिरेकी अभिमानाने अंध झालेल्या त्यांच्या आधीच्या प्रत्येक 'राजां'चें—" मी क्षत्रिय आहे, नोकरी करायला शूद्र नाही, " हें ब्रीद त्यांनी झुगारून दिलें. त्यांतली हास्यास्पदता त्यांना पटली होती. त्यांनी ही रूढ चाकोरी सोडून चाकरी पत्करली, व वडिलांच्या विरोधाला न जुमानतां स्वतःला पसंत पडलेल्या परजातीच्या पण सुस्वरूप नि कामसू मुलीशी विवाह केला; जीवनसंघर्षाला धैर्याने तोंड देत स्वतःला योग्य वाटणाऱ्या मार्गाने पुढे पाऊल टाकलें. शाळेंत काम करीत असतांना त्यांनी आपलें जीवन तिथल्या बाल-विश्वाशीं एकजीव करून टाकलें. त्यांच्या हाताखालून गेलेले विद्यार्थी त्यांना आयुष्यभर विसरूं शकत नाहीत. परमाणु-विज्ञानांतील मूलगामी संशोधन पूर्ण करून मायदेशीं परत आलेला मास्तरांचा एक विद्यार्थी डॉ. लंबोदर जोशी "माझ्या यशाचा पाया माझ्या काजव्याच्या बॅटरीचं कौतुक करणाऱ्या एका गरीब शिक्षकाने घातला आहे " असें गहिंवरून सांगतो. नोकरीचा राजिनामा देऊन मास्तर हद्दपार झाल्यावर शाळेंतील प्रत्येक विद्यार्थी लपत छपत मास्तरांच्या बुरोंडी येथील निवासस्थानाकडे धाव घेतो. अशा रीतीने, संपत्तीच्या साधनें स्वतःचें जीवन सजविण्यांत तरी मास्तरांना कवडीमुद्धां यश लाभूं शकलें नाही तरी आपल्या विद्यार्थ्यांच्या हृदयांत मानाचें नि निष्ठेचें ध्रुवपद मिळवून त्यांना एक वेगळयाच प्रकारचें यश मिळालेलें आहे.

कोंकणांतील एका खेड्यांत राहणाऱ्या एका गरीब मास्तराची ही जीवनकथा, लेखकाने अतिशय सहृयतेने चितारली आहे. ह्या कथेला राजकारणाचा वा कुठल्याही वादाचा वास नाही. लेखकाला मास्तरांच्या जीवनांत जें जें आढळलें, त्यांच्या सहवासांत जें जें जाणवलें त्याचें अगदी यथातथ्य चित्रण त्यांनीं केलेलें आहे. त्यांत कुठेंही परिणामकारकतेसाठी भडक रंग भरलेले नाहीत, वा फॅशन म्हणून ध्येयवाद वा प्रचार चिकटवलेला नाही. व यांतच पेंडशांच्या यशाचें रहस्य आहे. प्रस्तुत कादंबरी वाचतांना एक दोष मात्र विशेष जाणवतो. तो म्हणजे कादंबरीच्यासुरवातीचा भाग मनाची जी पकड घेतो ती पुढे पुढे किंचित् सैल होत जाते, कथानकांत बराचसा तोचतोपणा जाणवूं लागतो. असें जरी असलें तरी स्वप्नाळु ध्येयवाद, वा जीवनविन्मुख पलायनवाद,अवास्तवता, भावविवशता वा असहृदयता,ह्या मध्यंतरीं विशेष पसरलेल्या कुठल्याहि अनिष्ट प्रवृत्तींच्या आहारीं न जातां, वा कुठल्याहि ism चे प्रचारक न होतां स्वतःच्या प्रतीतीशी प्रामाणिक राहून आपल्या कादंबऱ्यांतून त्यांनी जें रसरशीत जीवनदर्शन घडाविलें आहे, त्यामुळे त्यांना कादंबरीक्षेत्रांत एक वैशिष्ट्यपूर्ण स्थान निश्चित मिळालेलें आहे. मराठी कादंबरीच्या उत्क्रांतीचा इतिहास पेंडशांच्या 'एल्गार' नि 'हद्दपार' चा उल्लेख केल्याविना अपूर्णच राहील.

जुगार—लेखिका : मुक्ताबाई दीक्षित;
प्रकाशक—वि. ना. दीक्षित, हंटर नेशनल बुक सर्विस, पुणें ४, मूल्य २॥ रु.
हद्दपार—लेखक : श्री. ना. पेंडसे,
 प्रकाशक—साहित्य सहकार संघ, खाडिलकर रोड, मुंबई, किंमत ३ रुपये.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संघवार्ता

तेरावें अधिवेशन

विदर्भ साहित्य संघाच्या तेराव्या संमेलनाचें अधिवेशन अकोला येथे ता. २८ आणि २९ एप्रिल १९५१ रोजीं यशस्वी रीतीने पार पडलें.

प्रदर्शनाचें उद्घाटन

संमेलनांतर्गत कार्यक्रमांना ता. २८ एप्रिल रोजीं सकाळीं ९ वाजतां इतिहास–संशोधन-साहित्य यांच्या प्रदर्शनाच्या उद्घाटनाने प्रारंभ झाला. प्रदर्शनाचें उद्घाटन म. म. वा. वि. मिराशी यांनीं केलें. अकोला येथील सरकारी मराठी नॉर्मल स्कूलच्या एका प्रशस्त भागांत या प्रदर्शनाची मांडणी केलेली होती. यवतमाळचा शारदाश्रम आणि नागपूरचें मध्यप्रदेश संशोधन मंडळ यांनी या प्रदर्शनाच्या सजावटींत प्रामुख्याने भाग घेतला होता. प्रथम स्वागतमंत्री श्री प्र. ना. खोंड यांनी म. म. मिराशी यांना प्रदर्शनाचें उद्घाटन करण्याची विनंती केल्यावर श्री. ह. ना. नेने आणि डॉ. वि. भि. कोलते यांनी त्यांच्या गौरवपर परिचय भाषणें केलीं. नंतर म. म. मिराशी यांनी आपलें भाषण वाचून दाखवून प्रदर्शनाचे उद्घाटन केल्याचें जाहीर केलें.

कार्यकारी मंडळाची सभा

प्रदर्शनाच्या उद्घाटनानंतर लगेच १०॥ वाजतां वि. सा. संघाच्या कार्यकारी मंडळाची सभा झाली, व त्यानंतर दुपारी १ वाजतां संघाची सर्वसाधारण सभा झाली.

खुलें अधिवेशन

सायंकाळीं ५ वाजतां नॉर्मलस्कूलच्या पटांगणांत घातलेल्या शोभिवंत मंडपांत वि. सा. संघाच्या तेराव्या संमेलनाच्या खुल्या अधिवेशनाला प्रारंभ झाला. प्रथम शारदास्तवन आणि स्वागतगीत झाल्यानंतर संमेलनाचे स्वागताध्यक्ष श्री. ब्रिजलाल वियाणी यांनी आपलें स्वागतपर मराठी भाषण वाचून दाखविलें. त्यानंतर भारत सरकारच्या नभोवाणी खात्याचे मंत्री नामदार रंगराव दिवाकर यांनी उद्घाटक या नात्याने भाषण करून संमेलनाला आणि वि. सा. मंदिराच्या कार्याला सुयश चिंतिलें.

नामदार दिवाकर यांच्या भाषणानंतर स्वागतोपाध्यक्ष श्री. रा. वि. ओक यांनी श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांना संमेलनाचे अध्यक्षपद स्वीकारण्याची विनंती केली. तिला डॉ. मा. गो. देशमुख, डॉ. वि. भि. कोलते, प्रिं. वि. प्र. मोहगांवकर श्री. द. रा. गोमकाळे आणि प्रा. भी. गो. देशपांडे यांनी त्यांच्या गौरवपर भाषणें करून पाठिंबा दिला. नंतर श्री. माडखोलकर यांचा निरनिराळ्या संस्थांतर्फे हार

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

घालून सत्कार करण्यांत आला. संघाच्या चालू वर्षाच्या अध्यक्ष सौ. कुसुमावती देशपांडे यांनाही स्वागताध्यक्ष श्री. वियाणी यांनी हार घालून त्यांचा सत्कार केला.

यानंतर श्री. खोडे यांनी बिहारचें राज्यपाल नामदार डॉ. मा. श्री. अणे, भारतीय संसदेचे सभापती नामदार मावळणकर, नामदार काकासाहेब गाडगीळ, भारतसरकारचे राज्यमंत्री श्री करमरकर, मध्यप्रदेशाचे शिक्षण मंत्री ना. पंडित द्वारकाप्रसाद मिश्र, म. सा. संमेलनाचे नियोजित अध्यक्ष श्री. अ. का. प्रियोळकर, म. सा. परिषदेचे अध्यक्ष राजकवि यशवंत, वि. सा. संघाचे पेट्रन श्रीमंत बापुरावजी देशमुख, भदंत आनंद कौशल्यायन, डॉ. रघुवीर, सौ. लीलावती मुनशी प्रभृति मंडळींचे यशःचिंतनपर संदेश वाचून दाखविले. नंतर श्री माडखोलकर यांनी आपलें अध्यक्षीय भाषण वाचून दाखविले. रात्रीं १० वाजतां प्रा. भवानीशंकर श्रीधर पंडित यांच्या अध्यक्षतेखालीं मराठी कवितेच्या विकासाचें प्रात्यक्षिक आणि कविसंमेलन हे कार्यक्रम झाले.

वैदर्भी रीतीवर चर्चा

ता. २९ रोजीं सकाळीं ९ वाजतां संमेलनांतर्गत कार्यक्रमाला वैदर्भी रीतीवरील चर्चेपासून प्रारंभ झाला. प्रा. ग. त्र्यं. देशपांडे यांच्या अध्यक्षतेखालीं या चर्चा विभागाचा कार्यक्रम झाला. या चर्चेत श्री. वि. ह. निजसुरे, डॉ. मा. गो. देशमुख, प्रा. वि. प्र. मोहगांवकर, प्रा. श्री. भा. वर्णेकर, प्रा. स. गो. सोमलवार, प्रा. भी. गो. देशपांडे प्रभृतींनी या चर्चेत भाग घेतला. त्याचप्रमाणे श्री. प्र. ना. कवठेकर, काव्यतीर्थ, डॉ. रा. चिं. श्रीखंडे, प्रा. दा. ल. अडोणी, प्रो. डॉ. एस. पी. शास्त्री प्रभृतींच्या निबंधांतील मुद्देही वाचून दाखविण्यांत आले. अध्यक्षांनी समारोप केल्यावर ही चर्चा संपली.

विषय नियामक समितीची सभा.

दुपारी २ वाजतां विषय नियामक समितीची सभा होऊन संमेलनांत मांडण्यासाठी आलेल्या ठरावांवर चर्चा होऊन खुल्या अधिवेशनांत मांडावयाचे ठराव निश्चित करण्यांत आले.

खुलें अधिवेशन.

सायंकाळीं ५ वाजतां खुल्या अधिवेशनाला प्रारंभ झाला. प्रथम अध्यक्षांच्या हस्ते श्री. बाळकृष्ण वासनिक यांनी नागपूरच्या सर्वांग विकास मंडळातर्फे प्रकाशित केलेला 'मुजरा' हा काव्यसंग्रह, वि. सा. संघाकडून पुरस्कृत केलेला डॉ. काशिनाथ रामकृष्ण धर्माधिकारीकृत 'भक्तिभाग्य' हा काव्यसंग्रह, प्रा. भ. श्री पंडितकृत 'उन्मेष आणि उद्रेक' हा काव्यसंग्रह वगैरे पुस्तकांचें प्रकाशन करण्यांत आलें. यानंतर विषय नियामक समितीने मंजूर केलेले ठराव, त्यांवर निरनिराळ्या वक्त्यांचीं भाषणें होऊन, मंजूर झाले. नंतर संमेलनाध्यक्ष श्री. माडखोलकर यांनी समारोप केला व संघाच्या चालू वर्षाच्या अध्यक्ष सौ. कुसुमावती देशपांडे यांनी, त्यांच्या विनंती वरून, थोडेसें भाषण करून या वर्षी संघापुढे असलेल्या कार्याचें दिग्दर्शन केलें.

शेवटीं श्री. ह. ना. नेने, श्री. ना. रा. शेंडे, श्री. भी. गो. देशपांडे, आणि श्री. पु. य. देशपांडे यांनी स्वागतमंडळाचे आभार मानले. त्यानंतर स्वागताध्यक्ष श्री. वियाणी यांनी स्वागत मंडळातर्फे पाहुणे आणि प्रतिनिधि यांचे आभार

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मानल्यावर श्री. खोडे यांनी संमेलनाला सहाय्य करणाऱ्या व्यक्ति आणि संस्था यांचे आभार मानले. राष्ट्रगीत होऊन खुलें अधिवेशन समाप्त झालें.

रात्रीं अकोला येथील कलानिकेतन नाट्यमंडळातर्फे 'दूरचे दिवे' या नाटकाचा प्रयोग करण्यांत आला.

का. का. मंडळाची संयुक्त सभा.

ता. २८ रोजीं सकाळीं १०॥ वाजतां वि. सा. संघाच्या कार्यकारी मंडळाची संयुक्त सभा झाली. या सभेला गेल्या वर्षीच्या आणि चालू वर्षीच्या अशा दोन्ही का. का. मंडळाचे सभासद हजर होते. या सभेत 'युगवाणीचे' संपादन, संघाच्या परीक्षा आणि सभासद नोंदणी यासंबंधीं चर्चा झाली. या सभेत मंजूर झालेले ठराव पुढे दिले आहेत—

(१) वि. सा. संघाच्या शाखा आणि संलग्न संस्था यांनीं आपल्या कामाचा वृत्तांत प्रत्येक महिन्याच्या एक तारखेस नागपूर येथील संघाच्या मध्यवर्ती कार्यालयाकडे पाठवावा. सरचिटणिसांनी त्या वृत्तांताचें संपादन करून तो प्रकाशनार्थ 'युगवाणी'कडे पाठवावा व 'युगवाणी'तून तो प्रसिद्ध करण्यांत यावा.

(२) महाकवि भवभूति यांच्या स्मारकासंबंधीं वि. सा. संघाच्या गोंदिया येथील संमेलनांत करण्यांत आलेल्या उपक्रमानुसार तें स्मारक उभारण्याच्या दृष्टीने मध्यप्रदेश सरकारशी विचार विनिमय करण्यांत यावा.

(३) कोणत्याहि महिन्याच्या १५ तारखेपर्यंत ज्या व्यक्ति वि. सा. संघाच्या सभासद होतील त्या व्यक्तींना त्या पुढील महिन्यापासून 'युगवाणी'चें अंक मिळतील. संघाचें वर्ष संपेपर्यंतच सभासदांना अंक मिळतील. मागील अंक शिल्लक असल्यास आणि सभासदाने त्यांची मागणी केल्यास ते त्यांना मिळतील.

नवीन का. का. मंडळाची सभा.

यानंतर लगेच नवीन कार्यकारी मंडळाची सभा सौ. कुसुमावती देशपांडे यांच्या अध्यक्षतेखालीं सुरू झाली.

प्रथम अध्यक्षांनी (१) श्री. बाळासाहेब ढवळे आणि (२) श्री. ए. श्री. पटवर्धन यांची-सभासद म्हणून नियुक्ति केली. त्यानंतर सर्वानुमते पुढील पदाधिकारी निवडण्यांत आले—

उपाध्यक्ष :— श्री. पु. य. देशपांडे
कोषाध्यक्ष :— बाळासाहेब ढवळे
सरचिटणीस :— „ ग. त्र्यं. माडखोलकर
चिटणीस :— रा. पु. सगदेव,
„ प्र. ना. खोडे,
„ ना. क. तांबी.
संपादक, 'युगवाणी'—प्रा. वा. कृ. चोरघडे.
संचालक, परीक्षा समिति—प्रा. वि. भि. कोलते.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मंदिर समितीचे आमंत्रक म्हणून श्री. ग. दि. उर्फ नानासाहेब जोग यांची निवडणूक सर्वानुमतें झाली.

यानंतर पुढील ठराव सर्वानुमतें मंजूर झालाः—

'वि. सा. संघाच्या का. का. मंडळाकडून वि. सा. संघाच्या विदर्भ साहित्य-मंदिराला सरकारी ग्रॅन्ट वगैरे मिळविण्यासाठी सर्व व्यवहार करण्याकरितां म्हणून अध्यक्ष सौ. कुसुमावती देशपांडे आणि सरचिटणीस श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांची (correspondents) कॉरसपॉंडंट्स् म्हणून सर्वानुमतें नेमणूक करण्यांत येत आहे, व त्यांना या संबंधीचे व्यक्तिशः आणि संयुक्त असे सर्व प्रकारचे अधिकार देण्यांत येत आहेत.'

ता. २९ रोजीं रात्रीं संमेलनाचें खुलें अधिवेशन आटोपल्यानंतर का. का. मंडळाची सभा सौ. कुसुमावती देशपांडे यांच्या अध्यक्षतेखालीं भरून पुढील ठराव सर्वानुमतें मंजूर करण्यांत आला :—

'श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या अध्यक्षतेखालीं गेल्या वर्षीच्या का. का. मंडळाने संघाचें कार्य व्यवस्थितपणे पार पाडलें व विशेषतः वि. सा. संघाच्या साहित्य मंदिरासाठी सरकारकडून विनामूल्य जागा मिळवून मंदिराची कोनशिला बसाविण्या-पर्यंत मंदिराच्या कार्याची प्रगति केली याबद्दल हें कार्यकारी मंडळ जुन्या कार्यकारी मंडळास मनःपूर्वक धन्यवाद देत आहे!'

★

कार्यकारी मंडळाची सभा.

वि. सा. संघाच्या कार्यकारी मंडळाची सभा ता. १७ जून १९५१ रोजीं दुपारी ४ वाजतां नागपूर येथे संघाध्यक्ष सौ. कुसुमावती देशपांडे यांच्या अध्यक्षते-खालीं भरली होती. सभेंत पुढील कामकाज सर्वानुमतें झालें :—

(१) कागदाचे वाढते भाव आणि टंचाई लक्षांत घेतां संघाचें मुखपत्र 'युगवाणी' हें यापुढें द्वैमासिक करण्यांत यावें. 'युगवाणी'चीं पृष्ठें ४४ असावींत. 'युगवाणी'चे संपादकमंडळ पुढीलप्रमाणे राहील :—

(१) प्रा. वा. कृ. चोरघडे—कार्यकारी संपादक
(२) सौ. कुसुमावती देशपांडे
(३) श्री. पु. य. देशपांडे
(४) श्री. ह. ना. नेने
(५) श्री. शरच्चंद्र मुक्तिबोध

'युगवाणी'-च्या छपाईसाठी टेंडर्स मागविण्यांत यावींत.

मंदिरसमितीचे आमंत्रक श्री. नानासाहेब जोग यांनी ता. १ मे ते १५ जून-पर्यंतच्या कामाचें इतिवृत्त, आणि आयव्यय वाचून दाखविलें. त्यानंतर मंदिरनिधी-संबंधी पुढील ठराव करण्यांत आले :—

(१) वि. सा. संघाच्या निधींतून मंदिराच्या कामासाठी रु. ९५० चा जो खर्च करण्यांत आला आहे, तो खर्च हें मंदिरसमितीला संघाने दिलेलें कर्ज समजण्यांत यावें; व त्यावर दरसाल दर शेंकडा रु. ३ प्रमाणे व्याज घेण्यांत यावें. यापुढे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मंदिराच्या कामासाठी पैशाची आवश्यकता लागल्यास वरील दराने संघाच्या निधींतून मंदिरसमितीला व्याजाने रकमा देण्यांत याव्यात.

(२) वि. सा. मंदिरासाठी देणग्यांच्या रूपाने गोळा करण्यांत येणारा निधी संघाध्यक्ष सौ. कुसुमावती देशपांडे यांच्या नांवे महाराष्ट्र बँकेंत जमा करण्यांत यावा. या निधीबाबत देवघेवीचे व्यवहार करण्याचा अधिकार त्यांना देण्यांत येत आहे.

[३] वि. सा. संघाचें विश्वस्तपत्र [ट्रस्ट डीड] ज्या वेळीं तयार होईल, त्या वेळीं विदर्भ साहित्यमंदिराला मिळणाऱ्या सर्व देणग्यांची रकम विश्वस्त मंडळाच्या स्वाधीन करण्यांत यावी.

(४) विदर्भ साहित्यमंदिरासाठी विहीर बांधण्याचा संपूर्ण खर्च करण्याकरिता म्हणून वि. सा. संघाचे उपकर्ते नागपूरचे दानशूर रसिक श्रीमंत लक्ष्मण श्रीधर उर्फ बाबूरावजी देशमुख यांनी वि. सा. संघाला रु. २५०० चो उदार देणगी दिली आहे. वि. सा. संघ त्यांच्या या देणगीचा कृतज्ञतापूर्वक स्वीकार करीत आहे. श्रीमंत बाबूरावजी देशमुख यांच्या इच्छेनुसार या विहिरीवर संगमरवरी शिळा बसवून त्यांच्या पत्नी श्रीमंत सौ. सत्यभामाबाई उर्फ माई देशमुख यांचें नांव त्या शिळेवर कोरण्यांत येईल.

(३) वि. सा. संघाने पुरस्कारिलेल्या 'सुमनसंचय' या क्रमिक पुस्तकाचें मुद्रण आणि प्रकाशन यांची व्यवस्था करण्यासाठी सौ. कुसुमावती देशपांडे, श्री. आ. रा. देशपांडे आणि श्री. ह. ना. नेने यांची समिति नेमण्यांत येत असून त्या पुस्तकाच्या प्रकाशनाच्या बाबतींतील सर्व अधिकार या समितीला देण्यांत येत आहेत.

(४) वि. सा. मंदिराच्या कामाची आतापर्यंतची प्रगती लक्षांत घेतां मंदिरसमिति व निधिसमिति यांची संयुक्त सभा बोलावून पुढील कामकाजाची व्यवस्था करणें अवश्य आहे. तरी ता. १ जुलै १९५१ रोजीं या दोन्ही समित्यांची संयुक्त सभा बोलावण्यांत यावी.

सभेच्या शेवटीं संघाध्यक्ष सौ. कुसुमावती देशपांडे यांनी कार्यकारी मंडळाच्या प्रत्येक सभेची कार्यवाही पुढील प्रमाणे राहावी, अशी सूचना केली.

(१) कार्यकारी मंडळाच्या मागील सभेच्या प्रतिवृत्ताचें वाचन. सर्वसाधारण सभेचें [झाली असल्यास] प्रतिवृत्त.

(२) कार्यकारी मंडळाच्या मागील सभेच्या तारखेपासून प्रस्तुत सभेच्या तारखेपर्यंतच्या हिशेबाचें वाचन.

(३) संघाच्या सर्व प्रकारच्या कामाचें प्रतिवृत्त:— (अ) युगवाणी (आ) परीक्षा समिति (इ) मंदिरसमिति. (ई) सहकारी समिति (उ) सर्व शाखा.

(४) विशेष कार्य.

(५) इतर.

या सुचनेनुसार यापुढे कार्यकारी मंडळाच्या सर्व सभांचें काम करण्यांत यावें असें ठरलें.

★

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ

परीक्षा समिति

ऑगस्ट १९५१ परीक्षांचा कार्यक्रम

शनिवार ता. ४ ऑगस्ट ५१ सकाळीं ८ ते ११

साहित्य पारंगत प्रश्नपत्रिका १.

शनिवार ता. ४ ऑगस्ट ५१ दुपारीं ३ ते ६

साहित्य पारंगत पश्नपत्रिका २

साहित्य स्नातक प्रश्नपत्रिका १

रविवार ता. ५ ऑगस्ट ५१ सकाळीं ८ ते ११

साहित्य पारंगत प्रश्नपत्रिका ३

साहित्य स्नातक २

साहित्य परिचित १

साहित्य विनीत

मराठी प्रारंभ

,, प्रवेश (लेखी)

रविवार ता. ५ ऑगस्ट ५१ दुपारीं ३ ते ६

साहित्य पारंगत प्रश्नपत्रिका ४

,, स्नातक ,, ३

,, परिचित ,, २

मराठी प्रवेश (मौखिक)

सोमवार ता. ६ ऑगस्ट ५१ सकाळीं ८ ते ११

साहित्य पारंगत प्रश्नपत्रिका ५.

वि. भि. कोलते
संचालक
परीक्षा समिति.

★

साहित्य पारंगत

प्रश्नपत्रिका १ ली. गद्य (१००)

१. लीळा चरित्र-एकांक. सं. नेने
२. भाऊसाहेबांची बखर.
३. संपूर्ण आगरकर भाग १.
४. सुदाम्याचे पोहे—कोल्हटकर.
५. रणांगण.
६. वायुलहरी—खांडेकर.

प्रश्नपत्रिका २ री-पद्य (१००)

१. नरेंद्रकृत रुक्मिणी स्वयंवर—सं. कोलते.
२. अभंगवाणी—सं. म. गो. मोडक.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

३. सीतास्वयंवर—नागेश.
४, वाग्वैजयंती—गोविंदाग्रज.
५. आराधना—वा. ना. देशपांडे.
६. सुधारक—मा. त्रिं. पटवर्धन.

प्रश्नपत्रिका ३ री–वाङ्मयप्रकार–नाटक (१००)

१. रामराज्यवियोग—किर्लोस्कर.
२. शारदा—देवल.
३. विद्याहरण—खाडिलकर.
४. भावबंधन—गडकरी.
५. सोन्याचा कळस—वरेरकर
६. उद्यांचा संसार—अत्रे.
७. आंधळ्याची शाळा—वर्तक.
८. मतिविकार—कोल्हटकर.

तंत्रविषयक मार्गदर्शनासाठी–'अर्वाचीन मराठी साहित्य' यांतील नाटकावरील प्रकरण.

प्रश्नपत्रिका ४ थी (अ)–व्याकरण (५०)

१. मराठी व्याकरणावरील निबंध—कृष्णशास्त्री चिपळूणकर
२. शास्त्रीय मराठी व्याकरण—मो. के. दामले

(आ) वाङ्मयेतिहास (५०)

१. महाराष्ट्र-सारस्वत भाग १ व २—भावे
२. मराठी भाषेचा व वाङ्मयाचा इतिहास—भिडे
३. अर्वाचीन मराठी साहित्य—सं. नेने
४. अर्वाचीन मराठी काव्य—रा. श्री. जोग

प्रश्नपत्रिका ५ वी–(अ) साहित्यशास्त्र व अलंकार (५०)

१. अभिनव काव्यप्रकाश—रा. श्री. जोग
२. मराठीचें साहित्यशास्त्र—डॉ. मा. गो. देशमुख
३. प्रा. वनहट्टीचें दर्यापूरचें भाषण
४. विचार समीक्षा—वा. ना. देशपांडे

(आ) निबंध (५०)

निबंधासाठी विषय वाङ्मयविषयक प्रचलित प्रश्न व आंदोलनें, साहित्यशास्त्रीय व्यापक सिद्धान्त इ. संबंधाचे असतील. स्थूल दिग्दर्शनासाठी पुढील पुस्तकें निर्दिष्ट केलीं आहेत.

१. नवीं मूल्यें—पु. य. देशपांडे
२. वाङ्मयीन महात्मता—मर्ढेकर
३. साहित्याचा ध्रुवतारा—वाळिंबे.

वि. भि. कोलते,
संचालक,
परीक्षा समिति, वि. सा.संघ.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

स्वागताध्यक्ष

श्री. ब्रिजलाल बियाणी यांचें भाषण

★

माझा जन्म, लालन पालन, आणि विकास हीं सर्व मराठी भाषेच्या क्षेत्रांतच झालेलीं आहेत. माझें शिक्षणहि मराठी भाषेच्या माध्यमांतूनच झालेलें असून, मराठी भाषेच्या मजवरील ऋणाची मला पूर्ण जाणीव आहे. आणि तत्प्रीत्यर्थ माझीं कर्तव्येंहि मी पूर्णपणें ओळखून आहे. मराठी भाषकांचें स्थान, साहित्य आणि राजकारणांत योग्य श्रेणींत आणि आदरपूर्ण असें राहिलें पाहिजे, म्हणून शक्त्यनुसार प्रयत्नहि मी केलेले आहेत व करीत आहे. तथापि माझी मातृभाषा हिन्दी आहे आणि माझ्या सार्वजनिक जीवनांत राष्ट्रभाषा या नात्यानें मी तिचाच आश्रय घेत आलों आहें. या दृष्टीनें मराठी साहित्य संमेलनाच्या क्षेत्रांतील प्रथम सेवकाचें स्थान आणि मान हीं आज मला मिळावींत हीं माझ्या सेवेलाच मिळालेली मान्यता होय असें मी नम्रपणें समजतों. आणि त्या बरोबरच या प्रान्तांतील राष्ट्रभाषा आणि प्रांतभाषा यांच्या समन्वयाचीहि ही मुहूर्तमेढच मी मानतो. या राष्ट्रभाषा आणि प्रांतभाषा यांच्या समन्वयाचा मी पुरस्कर्ता असल्यामुळें, या माझ्या स्थानावरून आपणां सर्वांचें आज स्वागत करतांना मला कांहींसा हर्षहि होणें स्वाभाविकच नाहीं का ?

संकोच आणि हर्ष या दोहोंच्या प्रबळ प्रवाहांत मी आपणांसमोर आपल्या सेवेप्रीत्यर्थ उभा आहे. माझ्या कर्तव्यपालनांत जी कमतरता राहील ती स्वागत-समिति सांभाळून घेईल आणि आपणहि सर्व सन्माननीय पाहुणे माझ्या या सेवेकडे आणि कर्तव्यपालनाकडे उदार दृष्टीनें सहानुभूतिपूर्वक पाहून मला सांभाळून घ्याल या विश्वासानें मला बरेंचसें समाधान आणि उत्साह वाटत आहे.

स्वागतसमिति आणि तिचा प्रथम सेवक या नात्याने माझें मुख्य काम जरी सम्मेलनाचें स्वागत आणि व्यवस्था करण्यापुरतें असलें, तरीहि हें आयोजन कोणत्या भावनेनें आणि उद्देशानें प्रेरित होऊन केलें गेलेलें आहे हें निवेदन करणेंसुद्धां माझें कर्तव्यच आहे. कर्तव्याचे मागें हेतु हा आवश्यकच आहे, आणि प्रत्येक कर्तव्याला उपयुक्ततेच्या तराजूनें तोलणेंहि जरूर आहे. तसेंच, कोणत्याहि शक्तीच्या उपयुक्ततेचा परिणामहि पाहणें आवश्यकच आहे. या दृष्टीनेंच मानवजीवन आणि मानवाचें कार्य चालू ठेवण्याची आवश्यकता आहे. या संमेलनालाहि महान् उद्देश आहे आणि संमेलनाचे कार्यक्षेत्रांत महान् कार्ये करण्याची आवश्यकता आहे. आमच्या या कार्यासहि ध्येय आहे आणि हेतुहि आहे. स्वागत समितीचें हेंहि कर्तव्यच आहे कीं, या कार्यारंभाचें वेळीं, साहित्यक्षेत्रांत कार्य केलेल्या जुन्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकासः महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आणि नव्या प्रमुख साहित्यिकांचें स्मरणपूर्वक स्वागत केलें पाहिजे. आमच्या अकोल्यानें मराठी साहित्याचे क्षेत्रांत आपली सेवा यापूर्वीहि अर्पण केलेली आहे. सुमारें चाळीस वर्षापूर्वीच महाराष्ट्र साहित्यसंमेलनाचें सातवें अधिवेशन अकोला येथें इ० स० १९१२ मध्यें भरवून, अकोल्यानें मराठी साहित्य सेवेच्या कार्यांतलि आपला वाटा उचललेला आहे.

स्थानिक आणि या जिल्ह्यांतलि साहित्यसेवकांचा व त्यांच्या साहित्यसेवेचा साविस्तर उल्लेख येथें करून मी आपला वेळ घेत नाहीं; पण तरीहि, कै. श्री रावबहादुर विष्णु मोरेश्वर महाजनी आणि कै. श्री. नारायणराव खंडेराव फडके यांचें सादर स्मरण करून त्यांना श्रद्धांजली अर्पण केल्याशिवाय मला पुढें जाववत नाहीं.

मानवसमाजाच्या निरनिराळ्या अवस्थांमध्ये साहित्यानें मानवसमाजाची अखंड साथ दिलेली आहे, मानवसमाजास साहित्य हें प्रेरक आणि आनंददायक झालेलें आहे, तसेंच तें परिवर्तनकारकहि ठरलेलें आहे. साहित्य ही मानवसमाजांतील कलाकारांच्या हृदय आणि मास्तिष्कांतील लखलखणारी दिव्य व महान् तेजःपुंज अशी प्रभावशाली प्रकाशमान् ज्योति आहे. साहित्यमंदिरांत मानवसमाजांतील कलाकारांच्या मनाचें सौंदर्य आणि हृदयाचें पावित्र्य यांचें दर्शन घडून येतें. समाजाच्या तत्कालीन आर्थिक आणि इतर अवस्थांचा गंभीर परिणाम साहित्यानिर्मितीवर होत असतो. आणि साहित्यसृजनाचा तसलाच परिणामहि समाजव्यवस्थेवर होणें अटळ असतें. मानवसमाजाच्या इतिहासाने आजवर हीच गोष्ट सिद्ध केलेली आहे. साहित्याला म्हणूनच मानवसमाजाचा आत्मा म्हटलेलें आहे. कोणत्याहि व्यक्तीला अथवा कृतीला अमरत्वाच्या सिंहासनावर अधिष्ठित करण्याचें सामर्थ्य जर या पृथ्वीतलावर कोणामध्ये असेल तर तें एकट्या साहित्यांतच आहे. मानवाची सर्वांत बलवान शक्ति साहित्य ही आहे, त्यांतील विचार ही आहे आणि त्याची भाषा ही आहे. विचार, साहित्याचें जीवन आहे; आत्मा आहे; आणि भाषा, साहित्याचें आवरण होय. मानवसमाजाच्या प्रगतीबरोबरच साहित्यक्षेत्राचा, त्यांतील विषयांचा आणि त्यांच्या कर्तव्यक्षमतेचा व्याप वाढत गेलेला आहे. विभिन्न क्षेत्रांतील चर्चा क्षणभर बाजूला ठेवली तर स्थूल रूपानें आज साहित्याचे दोन विभाग पडूं शकतात. एक स्थायी साहित्य आणि दुसरें अस्थायी साहित्य. यालाच पाहिजे तर आपण सर्वकालीन साहित्य आणि तत्कालीन साहित्य अशीहि नांवें देऊं शकतो.

मानवीजीवनाशीं संबंधित असें स्थायी सिद्धांत, विचारप्रवाह आणि भावना हीं प्रमेयें स्थायी साहित्यांत अनुस्यूत असतात. अस्थायी साहित्यांत मानवसमाजाच्या दैनंदिन गरजा, अडचणी, समस्या आणि त्यांच्या परिस्थितींत होणारे बदल असले विषय सामावलेले असतात. लोकशाहीचे विकासाबरोबरच अस्थायी साहित्याचा व्याप वाढत जातो आणि वृत्तपत्रें, सामयिक पुस्तकमाला, उपन्यास इत्यादि रूपांनीं त्या साहित्याचा प्रवाह वाहूं लागतो. अस्थायी साहित्याचे निर्मात्यावर फारच मोठी जबाबदारी आहे आणि अस्थायी साहित्यनिर्माता हा समाजावर भरपूर परिणामहि करूं शकतो. तत्वज्ञान्यापेक्षां संपादक आणि पुस्तकमालांचे लेखकच अधिक प्रभावशाली दिसून येतात. अस्थायी साहित्याचा व्याप आणि निर्मिति फार मोठ्या प्रमाणावर

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

असतात; पण त्यांचा परिणामहि तात्पुरताच असतो. पण हें कांहींहि असलें तरी, असल्या साहित्याचीहि आज देशाला फार आवश्यकता आहे. अस्थायी साहित्याचे क्षेत्रांत काम करणाऱ्या साहित्यकांवर, देशाच्या भवितव्यनिर्माणाची फार मोठी जबाबदारी आहे. असल्या प्रकारचें सामयिक साहित्य, निर्भयता, निःस्वार्थ आणि मानवता यांनीं ज्या प्रमाणांत संपन्न असेल त्याच प्रमाणांत लोकशाहीचा विकास होत असतो. अस्थायी साहित्यांत जनतेचें प्रतिनिधिकत्व ज्या प्रमाणांत असेल त्याच प्रमाणांत जनकल्याणाचें कार्य त्याचेकडून होऊं शकेल. सत्ता आणि सेवा या दोन्ही क्षेत्रांत जितकें योग्य तारतम्य अस्थायी साहित्याकडून सांभाळलें जाईल त्याच प्रमाणांत जनशक्तीची वृद्धि संभवनीय आहे. मराठी साहित्यांत या प्रकारच्या साहित्याचाहि उचित विकास होणें अत्यावश्यक आहे. मराठी भाषेंतील वृत्तपत्रें, मासिकें आणि नियतकालिकें आणि सामयिक पुस्तकमाला वगैरे, इतर भाषांतील असल्या साहित्याचे बरोबरीच्या दर्जानें गौरवाई ठरावयास पाहिजेत अशी आपणा सर्वांची सदिच्छा व आकांक्षा असणें स्वाभाविकच होय.

स्थायी साहित्यच कोणत्याहि साहित्याचा मूलाधार होय. स्थायी साहित्यावरूनच कोणत्याहि भाषेंतील साहित्याची प्रतिष्ठा ठरली जाते. स्थायी साहित्य हे विचारांचा सागर होय आणि मानवीजीवनांतील स्थायी समस्यांचे निवारण करण्याचें सामर्थ्यहि त्यांतच आहे. स्थायी साहित्य नेहमीं, जीवन आणि विश्व यांची सखोलता आणि गंभीरता मापण्याचें कार्य करीत असतें. मानवसमाजाशी अंतस्थ संपर्क निर्माण करण्याचे महान् कार्यहि स्थायी साहित्यच करूं शकते. स्थायी साहित्याला सीमांची बंधनें नसणेंच न्याय्य आणि योग्य होय. तेंच साहित्य अमर आहे कीं, जें सीमेच्या पार आहे. आमचें साहित्य ज्या प्रमाणांत प्रादेशिक कक्षेस ओलांडून अमर विचारांची निर्मिति करील त्याच प्रमाणांत त्याची महति ठरली जाईल. मराठी भाषेंतील साहित्याचा अनुवाद अन्य भाषांतून व्हावयास पाहिजे. ज्या भाषेनें महान् साहित्यिक निर्माण केलेले आहेत तीच भाषा महान् होय. भाषेचा गौरव शब्दांत नसून तिच्या साहित्यावरच तो अवलंबून आहे.

साहित्यांतील विचारानंतर भाषेचा प्रश्न विचारांत घेणें अनिवार्य आहे. आपल्या देशांत भाषेचा प्रश्न आज अत्यंत महत्वपूर्ण असा होऊन बसलेला आहे. स्वराज्यप्राप्तीनंतर आमच्या राष्ट्रभाषेच्या निर्मितीचें कार्य आमचे समोर आहे. आणि त्याबरोबरच प्रादेशिक भाषांच्या विकासाची जबाबदारीहि आमचेवरच आहे. राष्ट्रभाषा आणि प्रान्तीय भाषा यांचा समन्वय राखण्याचें कार्यहि मोठ्या चातुर्यानें आज आम्हाला करावयाचें आहे. भाषेच्या प्रश्नासंबंधीं विचार करीत असतांना, एक महत्वाची गोष्ट अवश्य लक्षांत ठेवावयास पाहिजे. ती ही कीं, भाषा हें मानवी जीवनाच्या विकासाचें एक साधन आहे; तें साध्य नव्हे. श्रेष्ठ भाषा तिलाच म्हणतां येईल कीं जिच्यांत उपयुक्तता आहे, सुगमता आहे, आणि जिचें अध्ययन करतांना बालकांच्या मनावर अगदी कमींत कमी बोझा पडेल.

हिंदी भाषा या देशाची राष्ट्रभाषा आणि राजभाषा झालेली आहे. राष्ट्रभाषा ही ममत्व आणि उपयुक्तता यांच्या आधारांनींच सर्व देशांत व्याप्ति पावेल; राज्यशक्ति आणि कायदा यांचे बळावर नव्हे. कोणत्याहि प्रांतांतील प्रांतीय भाषेवर

तिनें दडपण येऊं नये. राष्ट्र-भाषेच्या पुरस्कर्त्यांनी प्रांतीय भाषांच्या स्नेह, ममत्व

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आणि स्वाभिमानाकडे लक्ष द्यावयास पाहिजे. तसेंच प्रांतीय भाषेच्या अभिमान्यांनां राष्ट्रभाषेंतील उपयुक्ततेचें जीवनव्यापी तत्व उपेक्षून चालणार नाहीं. राष्ट्रभाषा प्रांतभाषा यांचा समन्वय आणि विकास योग्य रीतीनें व्हावयास पाहिजे. हें कार्य कठीण तर खरेंच; आणि त्यांतहि आमच्या यां मध्यप्रदेशांत हिंदी व मराठी या दोन्हीं भाषांचा व्याप आहे. अशा परिस्थितींत या प्रांतांत या समन्वयाचा प्रयोग अत्यंत कौशल्यानें करावयास पाहिजे हें विसरून चालणार नाहीं.

ज्या प्रांतांतील लोकांची मातृभाषा हीच राजभाषा असेल, तेथील बालकांवर भाषेच्या अध्ययनाचा बोझा कमी पडतो. आणि ज्या प्रांतांतील लोकांची मातृभाषा निराळी असेल, तेथील बालकांवर भाषेच्या अध्ययनाचा बोझा दुप्पट पडतो. त्यांना मातृभाषेचेंहि अध्ययन करावें लागतें आणि राष्ट्रभाषाहि शिकावी लागते. या ठिकाणीं असें म्हटलें असतां अप्रस्तुत होणार नाहीं कीं, जेथील बालकांची मातृभाषा हीच राष्ट्रभाषा आहे त्या बालकांना राजकारण, साहित्य, तसेंच राज्यकार्याचे क्षेत्रांत अधिक सुलभता प्राप्त होते. त्यामुळे त्यांचा जीवनविकासहि अधिक सुगम आणि सुलभ होतो. जेथील बालकांना प्रांतीय भाषेचें ओझेंहि उचलावें लागतें त्यांची देशव्यापी गति किंचित् कुंठित झाल्यासारखी होते. अतएव, प्रांतीय भाषांचे क्षेत्रांत कार्य करणारांना या गोष्टीकडेहि लक्ष द्यावयास पाहिजे कीं, प्रांतीय भाषांचें संरक्षणाबरोबर तेथील जनतेचा देशव्यापी विकास मुळींच अडखळतां कामा नये. भाषाविषयक ममत्व हें बालकांच्या जीवनविकासास बाधक ठरूं नये. या क्षेत्रांत कांहींशा कठोरपणा-नेंहि काम करून घेण्याची आवश्यकता निर्माण होऊं शकते. वर्तमानकालीन कठोर व्यक्ति कित्येकदां भावीकालाचे निर्माते ठरत असतात.

साहित्याचा व्याप आणि भाषेच्या उपयुक्ततेच्या प्रश्नानंतर, साहित्यनिर्मितीच्या आणि साहित्यनिर्मात्यांच्या सोयीचाहि विचार करणें आवश्यक आहे. साहित्यिकांना, आणि त्यांतल्यात्यांत स्थायी व सामाजिक व्यवस्थेच्या प्रतिकूल साहित्य निर्माण करणाऱ्या साहित्यिकांना, नेहमीं अनेक आपत्तींशीं आणि विशेषतः आर्थिक आपत्तीशीं झगडावें लागलें आहे व लागत आहे. निर्मितीसाठीं शक्ति आणि सामर्थ्य यांची आवश्यकता आहे हें जरी अबाधित सत्य असलें तरी पोषक आणि सहाय्यक परिस्थिति ही सामर्थ्यास अनुकूल असल्यामुळें तिचीहि आवश्यकताच असते. साहित्य हें व्यक्तित्वावर अवलंबून असलें तरी, आजच्या युगांत साहित्यिकांचीहि संघटना असणें आवश्यक झालेलें आहे. साहित्यिकांची भारतीय आणि प्रांतिक संघटनाहि असावयास पाहिजे. तद्वारां साहित्यिकांच्या भिन्नभिन्न समस्या विचारांत घेण्याचे आणि त्यांची आर्थिक स्थिति सुधारण्याचें कार्य व्हावयास पाहिजे. साहित्यिकांचे स्वतःचे प्रकाशनविभागहि पाहिजेत आणि त्याच बरोबर आर्थिक व्यवस्थेसाठीं सहकारी संस्थाहि पाहिजेत. साहित्यिकांचें जीवन एकांगी न राहतां, तें जीवनाच्या सर्व क्षेत्रांत क्रियाशील असावयास पाहिजे. जेणेंकरून, साहित्यिकांना आर्थिक क्षेत्रांत दुःखित आणि याचकावस्थेंत राहावें लागणार नाहीं. आजचें आमचें साहित्यिक बहुधां, केवळ सरस्वतीचेच पूजक आहेत, पण लक्ष्मीच्या आराधनेची कलाहि त्यांना अवगत असणें अत्यावश्यक आहे.

या प्रांतांत, मी म्हणतो तसल्या प्रकारची साहित्यिकांच्या सर्वांगीण विकासास सहाय्यक अशी संस्था अथवा संघटना नसली तरी, आनंदाची गोष्ट अशीं कीं,

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

त्या दृष्टीनें आम्हीं विचार करूं लागलों आहोत व महत्त्वाच्या गोष्टीकडे आमचें लक्ष वेधलें गेलें आहे. या प्रांतांत साहित्यिक केन्द्र (Literary Academy) स्थापन होत आहे. आणि विदर्भ साहित्य मंदिराचा पायाहि घातला जात आहे. या संस्थांना विकसित करणें, बलवान बनविणें व साहित्यप्रगतिसाठीं आणि साहित्यिकांच्या प्रश्नांचा विचार करण्यासाठीं त्यांचा उपयोग करणें आमचें कर्तव्य आहे आणि अधिकार आहे. मला अशी आशा आहे कीं, या संस्था या प्रांतांतील उत्कृष्ट आणि उपयुक्त संस्था होतील. त्याबरोबरच, आपल्या प्रांतांतील हिंदी आणि मराठी साहित्यसंमेलनाच्या व साहित्यिकांच्याहि सम्मीलित बैठकी व्हावयास पाहिजेत. त्यायोगें दोन्हीं भाषांच्या क्षेत्रांत समन्वय आणि सामर्थ्य निर्माण करणें सोयीचें होईल.

साहित्यिकांचा आणि त्यांच्या संघटनांचा संबंध, विद्यमान राज्यशक्तीशीं कोणत्या प्रमाणांत असावा हेंहि विचारांत घेणें आवश्यक आहे. देशाच्या शासनसत्तेचें हें कर्तव्य आहे कीं, तिनें साहित्यिकांना सहाय्यक व्हावयास पाहिजे व साहित्यनिर्मितीच्या सोयी करून द्यावयास पाहिजेत. पण हें सगळें होत असतांनाहि एक गोष्ट मात्र कटाक्षानें ध्यानांत ठेवावयास पाहिजे ती ही कीं, साहित्यिक आणि साहित्यसंस्था यांनी शासनसत्तेच्या आधीन होतां कामा नये. साहित्यिक जर शासनसत्ता आणि संपत्ति यांच्या आधीन होईल तर साहित्याची प्रगतिशीलता कुंठित होऊन जाईल आणि साहित्यिकांच्या क्रांतिकारी प्रवृत्तींचा विकास होणार नाहीं. साहित्यिक आणि राज्यसत्ता यांचा समन्वय असावा. साहित्यिक शासनसत्तेचा सहाय्यक असावा पण त्याबरोबरच तो तिचा समालोचकहि असावा. एवढेंच नव्हे तर, आवश्यकतानुसार शासनसत्ता आणि समाजव्यवस्था यांत परिवर्तन घडवून आणण्याची क्षमताहि त्याच्यांत असावी.

अनेकदां असें आढळून येतें कीं, साहित्यिक हा राजकारणापासून आणि समाजाच्या दैनिक समस्यांपासून अलिप्त राहण्याच्या भावनेंतच संतोष मानीत असतो. जुन्या काळांत हें कदाचित् क्षम्य असेल पण, आजच्या बदलत्या युगांत या वृत्तींत आणि भावनेंतहि जरूर बदल व्हावयास पाहिजे. साहित्यिकानें सामाजिक जीवनाशीं व त्यांतील निरनिराळ्या परिस्थितींशीं, निकट संपर्क ठेवावयास पाहिजे; आणि मानवी-जीवनांतील सर्वांत मोठें प्रभावशाली क्षेत्र जें राजकारण, त्यापासूनहि अलिप्त न राहतां त्याशीहि संबंधित असावयास पाहिजे. साहित्यनिर्मितिसाठीं एकान्त आवश्यक आहे, पण सामाजिक प्रश्नांपासून अलिप्त राहणें हें त्यांच्या निर्बलतेचेंच द्योतक होय. समाजाच्या दैनिक जीवनांतील समस्यांशीं जो संबंधित असतो, पण त्याबरोबरच त्याच्या परिणामापासून मात्र जो स्वयं अलिप्त असतो तोच श्रेष्ठ साहित्यिक होय. असा श्रेष्ठ साहित्यिकच सामर्थ्य निर्माण करूं शकतो आणि समाजाच्या शक्तीचा स्रोत बनूं शकतो. जो साहित्यिक, जीवनाच्या कोणत्याहि क्षेत्रांत आपली असहायता अनुभवतो, त्याचें जीवन, त्याच प्रमाणांत अविकसित राहून जातें. प्रत्येक साहित्यिकाचें जीवन, सर्व क्षेत्रांत विकसित व्हावयास पाहिजे आणि समाजांत त्याला आदराचें तसेंच उपयुक्ततेचेंहि स्थान प्राप्त व्हावयास पाहिजे. नेहमीं, सामाजिक परिस्थित्यनुसार जीवनमूल्यांतहि बदल होत असतो; आणि आजच्या या देशाच्या परिस्थितींत आमच्या साहित्यिकांनींहि आपल्या जीवनमूल्यांकडे नवीन दृष्टीनें पाहणें जरूरीचें झालेलें आहे. आमची साहित्यसंमेलनें आणि साहित्य संस्था हीं ह्यावेळीं नवीन

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

जीवनमूल्यांचें अवलोकन आणि निर्मिति करण्यास समर्थ होतील त्याचवेळीं त्यांना सफलता प्राप्त होईल.

भगिनींनो आणि बंधूंनों ! आमच्या आजच्या आयोजनासमोर ज्या प्रश्नांचा विचार करणें क्रमप्राप्त आहे आणि आवश्यकहि आहे, अशा कांहीं प्रश्नांकडे संक्षेपानेंच मी आपलें ध्यान आकृष्ट करण्याचे मोहानें आपला कांहींसा वेळ घेतलेला आहे. या सर्व तत्त्वांना व्यावहारिक रूपांत कशा रीतीनें उतरविलें जावें याचा विचार आपण सर्व मिळून करूंच. अतएव, त्या विस्तारांत शिरणें माझें काम नाहीं. आज सर्व मानवसमाज नाविन्याचे लहरींनीं आप्लावित आहे. महान् परिवर्तनाच्या सीमेवर मानव समाज उभा टाकलेला आहे. जुने सिद्धांत, जुनी जीवनप्रणालि यांच्यावर मोठमोठे आघात होत आहेत. अखिल मानवसमाज जीवनकल्याणाचे निश्चित मार्गाच्या शोधार्थ प्रयत्नशील आहे. साहित्यिकांवरहि अशा आणीबाणीचे वेळीं मोठीच जबाबदारी आहे. विचारक हाच भविष्यकाळाचा द्रष्टा असतो. कित्येक वर्षेपर्यंत गुलाम राहिलेल्या भारतानेहि आपला जीवनाचा करवट बदललेला आहे. अधःपतित अवस्थेतून तो वर आलेला आहे. आणि मानवसमाजाच्या रंगभूमीवर तोहि आपलें अभिनवकार्य करूं इच्छीत आहे. भारताच्या आन्तर्राष्ट्रीय समस्या आहेत, आन्तर्देशीय प्रश्न आहेत, वर्तमान समाजव्यवस्थेचें पुनर्निर्माणकार्य आमच्या समोर आहे आणि कित्येक शतकें शोषित व पीडित अशा जनतेस मानवतेच्या आसनावर अधिष्ठित करून खऱ्या मानवतेच्या सुगंधाचा स्वाद प्रत्येक मनुष्यास प्राप्त करून द्यावयाचा आहे. हे कार्य फार मोठें आहे. विदर्भ–साहित्य–संघाचें कार्यक्षेत्र जरी सीमित आहे, तरी त्याचा दृष्टीकोन असीम असण्याची आवश्यकता आहे. येथील साहित्य सेवकांना मानव–समाजव्यापी विचार-लहरींवर विहार करावयाचा आहे. आणि विश्वव्यापी शीतल लहरींना प्रवाहितहि करावयाचें आहे. साहित्यिक हा प्राचीनतेपासून पोषण प्राप्त करीत असतो, वर्तमानापासून रस ग्रहण करून विकसित होतो, भविष्यकाळासाठीं फल-पुष्पांची निर्मिति करतो. असल्या प्रकारच्या महान्यज्ञासाठीं जमलेल्या आपणां सर्व महानुभावांचें मी पुनः हार्दिक स्वागत करीत आहे. आपल्या स्वागतांतील कमतरता आणि आपल्या सर्वांच्या गैरसोयीबद्दल आपणांस क्षमायाचना करून, आपल्या हृदयांतील उदार भाव–प्रवाहास प्रवाहित करताना मी आपणां सर्वांकडून आशीर्वाद मागूं इच्छितों.

संमेलनाचे उद्घाटनाचे निमित्तानें भारताच्या राजधानींतून, दिल्लीसारख्या विशाल शहरांतून आणि सर्व सुखसोयींनीं सुसज्ज अशा ठिकाणाहून या अकोला शहरीं येऊन, विदर्भाच्या साहित्यिकांना मार्गदर्शन करण्यासाठीं ज्यांनीं अत्यंत कष्ट घेतले, त्या श्री. दिवाकरजींचेंहि मी पुनरपि आपणां सर्वांचे वतीने स्वागत करीत आहे. दिल्लीस त्यांचे समोर कार्याचा फार मोठा व्याप असूनहि, माझ्या प्रार्थनेचा त्यांनी सहृदयतेने स्वीकार केला आणि येथें येऊन या संमेलनाची शोभा आणि उपयुक्तता वाढविली याबद्दल मी व्यक्तिशः सुध्दां त्यांचा अंतःकरणपूर्वक कृतज्ञ आहे, आणि त्यांना निवेदन करतांना मला अत्यंत आनंद होत आहे की, त्यांनी संमेलनाचें आतां उद्घाटन करावें, आपला संदेश द्यावा, आशीर्वाद द्यावा; आणि आमच्या या कार्यांत आपली सहानुभूति, शक्ति व ममता आम्हास प्रदान करावींत.

मी आपणां सर्वांचा अन्तःकरणपूर्वक आभारी आहे.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

इतिहास-संशोधन–साहित्य–प्रदर्शनाचे उद्घाटक

म. म. वा. वि. मिराशी यांचें भाषण

★

स्वागत मंडळानें आजच्या प्रदर्शनोद्घाटनाचें अध्यक्षपद मला दिलें हा माझा व्यक्तिशः मान नसून गेल्या वीस वर्षांत संस्कृत व प्राकृत वाङ्मय, कोरीव लेख, नाणीं इत्यादि साधनांचा अभ्यास करून विदर्भाच्या प्राचीन इतिहासविषयक ज्ञानांत जी मला अल्पस्वल्प भर घालतां आली, ती संमेलनाच्या कागदपत्रीं रुजू झाली याचें तें द्योतक आहे असें मी समजतो.

योगायोगाची गोष्ट ही कीं, मी 'एपिग्राफिया इंडिका' या भारत सरकारच्या सुप्रसिद्ध त्रैमासिकांत संपादून प्रसिद्ध केलेला पहिला कोरीव लेख या अकोला जिल्ह्यांतीलच वार्शी टाकळी येथील होता. हा लेख अत्यंत खराब स्थितींत असल्यामुळें तो प्रकाशनार्ह नाहीं, असें त्या वेळचे गव्हर्मेंट एपिग्राफिस्ट, डॉ. हीरानंद शास्त्री यांनीं पुराणवस्तु संशोधन खात्याच्या डायरेक्टरांस कळविलें होतें. हा त्रुटित लेख संपादन करण्यास कोणी तयार होण्याचा संभव नव्हता म्हणून तो दप्तरीं दाखल करून ठेवावा अशी त्यांनी शिफारस केली होती. पण त्या वेळचे डेप्युटी डायरेक्टर कै. रा. ब काशीनाथपंत दीक्षित यांना तें मत मान्य न होऊन त्यांनी त्या लेखाच्या संपादनाचें काम मजकडे द्यावें असें डॉ हीरानंद शास्त्री यांना सुचाविलें. त्याप्रमाणें त्या लेखाचाच छाप मजकडे आला. 'एपिग्राफिया इंडिका' मध्यें लेख छापला जाण्याकरितां तो अत्यंत निर्दोष व उच्च दर्जाचा असला पाहिजे याची जाणीव मला असल्यानें या लेखाच्या संपादनाकरितां मी अत्यंत परिश्रम घेतले. केवळ छापावरून लेख वाचणें अवघड असल्यामुळें मी तो लेख समक्ष पाहण्याकरितां वीस वर्षांपूर्वी कांही स्नेह्यांसह येथे येऊन वार्शी टाकळीस गेलो होतों. पुढे तो लेख 'एपिग्राफिया इंडिका' मध्यें प्रसिद्ध झाला. या लेखानें माझ्या प्राचीन इतिहासविषयक संशोधनास आरंभ झाला. त्यानंतर रा. ब. दीक्षित यांच्या प्रोत्साहनाने अनेक ताम्रपट, शिलालेख, नाणीं इत्यादि सामग्री प्रसिद्ध करून मला विदर्भाच्या प्राचीन इतिहास-विषयक ज्ञानांत थोडीबहूत भर घालतां आली. पुढें या जिल्ह्यांतच तऱ्हाळा या गांवी सांपडलेला सातवाहन राजांचा नाणकसंचय व वाशीम येथील वाकाटकनृपति द्वितीय विन्ध्यशक्ति याचा ताम्रपट प्रसिद्ध करण्याची संधि मला मिळाल्यानें या जिल्ह्याशी आलेला माझा संबंध दृढतर झाला. अशा या जिल्ह्याच्या मुख्य शहरी हा अध्यक्षपदाचा मान आपण मला देत आहा हा योगयोगही मला कुतूहलजनक वाटतो. असो.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत. १९२३
विदर्भ साहित्य संघ

अकोला हें नगर येथून सहा मैलांवरच्या कान्हेरीच्या अकोलासिंग नामक रजपुतानें आपल्या पत्नीच्या स्मरणार्थ स्थापलें अशी दंतकथा गॅझेटियरमध्यें दिली आहे. पण तिला कांही ग्रंथांतरींचा आधार नाहीं. सुविख्यात धाराधिपति भोज याचा वंशज परमारवंशी राजा देवपाल याचा एक ताम्रपट आपल्या प्रांतांतील पुण्यक्षेत्र ओंकारमांधाता येथें सन १९०५ मध्यें सांपडला होता. त्यांत देवपाल राजानें विक्रम संवत् १२८२ (इ. स. १२२५) मध्यें चंद्रग्रहणप्रसंगीं कांही ब्राम्हणांना एक गांव दिल्याचा उल्लेख आहे. हे ब्राम्हण एकंदर ३२ होते. त्यांचीं नांवें, गोत्र, शाखा व मूलस्थान यांच्या निर्देशासह दिलीं आहेत. हे ब्राम्हण टाकारी, त्रिपुरी, मथुरा, मध्यदेश, हस्तिनापूर, इत्यादि दूरदूरच्या ठिकाणांहून आले होते. त्यामध्यें अकोला-स्थानाविनिर्गत परावसुगोत्री राज गोसलशर्मा नामक ब्राम्हण होता. हें अकोलास्थान म्हणजे आपलें अकोलाच असावें असें वाटतें व तसें मत त्या ताम्रपटाचे संपादक डॉ. कोलहॉर्न यांनीहि व्यक्त केलें आहे. तेव्हा आपलें आकोला नगर निदान इ. स. च्या बाराव्या शतकाइतकें प्राचीन आहे, यांत संशय नाही. त्या वेळीं मात्र तें फारसें प्रसिद्ध असावें असें वाटत नाहीं. कारण इतरत्र कोठें त्याचा उल्लेख आढळत नाही. त्या वेळीं राजधानीचें शहर तेक्कली (येथून बारा मैलांवरचें बार्शी टाकळी) हे होतें. शके १०८८ (इ. स. ११७७) च्या मागें उल्लेखिलेल्या शिलालेखांत हेमाद्रिदेव नामक राजानें तेक्कलीला धार्मिकपणांत वाराणसीची योग्यता आणून दिली असें म्हटलें आहे.

इतिहास व वाङ्मय यांच्या संशोधनाचें कार्य आपल्या या राज्यांत सुमारें सव्वाशें वर्षांपूर्वी प्रथम सुरु झालें. सन १८०७ मध्यें नागपूरकर भोसल्यांचे दरबारीं रेसिडेंट म्हणून नेमला गेलेला रिचर्ड जेन्किन्स् हा मोठा चौकस गृहस्थ होता. तो जवळ जवळ वीस वर्षें नागपुरांत होता. या अवधीत आपल्या राजकीय कामागिरी खेरीज, या प्रांतांतील प्राचीन अवशेषांच्या शोधाकडेही त्यानें लक्ष पुरविलें व त्यानें आपला आश्रित विनायकराव औरंगाबादकर या उत्साही गृहस्थास छत्तिसगडांत पाठवून आरंग, कवर्धा, साहसपुर, अमरकंटक इत्यादि ठिकाणच्या शिलालेखांविषयीं माहिती जमविली व ती कलकत्ता येथील 'एशियाटिक सोसायटी ऑफ बंगाल' या संस्थेस पाठविली. ती माहिती त्या संस्थेचें नियतकालिक 'एशियाटिक रीसर्चेस' याच्या पंधराव्या व्हॉल्यूममध्यें (पृष्ठें ४९९ ते ५१२) छापली आहे. औरंगाबादकरानें जेन्किन्सला केलेला मोडी रिपोर्ट अद्यापि लंडन येथील इंडिया ऑफिस पुस्तकालयांत पहावयास मिळतो. त्यांतील एक उतारा माझ्या विनंतीवरून त्या पुस्तकालयाचे अधिकारी डॉ. रॅंडल यांनी मला कांही वर्षांपूर्वी पाठविला होता. त्यावरून औरंगाबादकरानें छत्तिसगडांतील कित्येक लेख बरेचसे बिनचूक वाचले होते असें मला दिसून आलें. तेव्हां या राज्यांतील प्राचीन कोरीव लेख यशस्वी रीतीनें वाचणारा पहिला संशोधक विनायकराव औरंगाबादकर हा होय, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

जेन्किन्स्साहेबानें शिलालेखांप्रमाणें ताम्रपटांचीही चौकशी चालविली होती. त्याला सांपडलेला या जिल्ह्यांतील पहिला ताम्रपट रायपूर जिल्ह्यांतील सुप्रसिद्ध पवित्र क्षेत्र राजीम येथील राजीवलोचनाच्या देवळांतील होता. या ताम्रपटाच्या वाचनाविषयींची हकीकत मनोरंजक आहे. हा ताम्रपट प्राचीन पेटिकाशीर्षक लिपींत (box-headed

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

Characters) कोरलेला आहे. वाकाटकांचे बहुतेक ताम्रपट यात्र लिपींत कोरलेले आहेत हें आपणांस माहीत आहेच. हा ताम्रपट कलकत्त्यास एशियाटिक सोसायटीकडे पाठविण्यांत आला. पण तेथें तो कोणास वाचतां येईना. शेवटीं कलकत्त्यासच श्रीवर्मसूरि नामक जैन मुनीस असे प्राचीन लेख वाचण्याचा सराव आहे असें समजल्यावरून सोसायटीचे सेक्रेटरी प्रो. हॅरेस हेमन् विल्सन् यांनी त्यास बोलावून तो ताम्रपट वाचण्यास दिला. त्यांनें तो वाचून त्याची देवनागरी लिपींत एक प्रतही केली. पण त्यांनें केलेलें वाचन बरोबर असेल काय याची शंका येऊन प्रो. विल्सननें दोन महिन्यानंतर पुनः त्या जैन मुनीस बोलावून तोच ताम्रपट वाचण्यास दिला व त्यांनेंही क्षणाचाही विलंब न लावतां तो घडाघड पूर्वीप्रमाणेंच वाचून दाखविला. त्यावरून विल्सनसाहेबाची त्या वाचनाच्या खरेपणाविषयीं खात्री झाली. हा मनोरंजक वृत्तांत एशियाटिक रिसर्चेस्च्या पंधराव्या व्हॉल्यूममध्यें दिला आहे.

पेटिकाशीर्षक लिपी ही ब्राह्मी लिपीइतकी प्राचीन नसली तरी तिजहून फार भिन्न नाहीं. ब्राह्मी लिपीचीं सर्व अक्षरें जेम्स प्रिन्सेप यानें प्रथम सन १८३७ मध्यें वाचलीं असें मानण्यांत येतें. या घटनेचा शतसांवत्सरिक उत्सव सन १९३७ मध्यें करण्यांत आला होता. मागें सांगितलेली गोष्ट १८३७ च्या अगोदर बारा वर्षे सन १८२५ मध्यें घडली होती. तेव्हा प्रिन्सेपच्या अगोदर प्राचीन लिपी वाचणारे जैन मुनी या देशांत होते. त्यांना उत्तेजन मिळालें असतें, तर ब्राम्ही लिपीचें कोडें सन १८३७ पूर्वी कित्येक वर्षे उलगडलें असतें असें वाटल्याशिवाय रहात नाहीं.

शिलालेख व ताम्रपट यांप्रमाणें नाणीं ही प्राचीन इतिहासाचीं महत्वाचीं साधनें होत. विदर्भात सांपडलेला प्राचीन नाण्यांचा पहिला संचय सन् १८८८ मध्यें चांदा जिल्ह्याच्या ब्रम्हपुरी तहसिलींत एका गांवीं मिळाला होता. तोही वाचनाकरिता कलकत्त्यास पाठविला होता. त्याचें वाचन डॉ. होर्नल साहेबानें करून तो एशियाटिक सोसायटीच्या प्रतिवृत्तांत सन १८९३ मध्यें प्रसिद्ध केला. हा संचय सातवाहनांच्या नाण्यांचा होता. त्यानंतर सुमारें पंचेचाळीस वर्षांनीं सातवाहन राजांच्याच नाण्यांचा दुसरा संचय अकोला जिल्ह्यांत तऱ्हाळा गावीं सांपडला. यामध्यें दीड हजार नाणीं होतीं. शिवाय यांत पूर्वी अज्ञात असलेल्या अनेक राजांचीं नाणीं असल्यामुळें या नाणकसंचयाला फार महत्व आलें आहे. त्यांतलि महत्वाचीं नाणीं मी 'जर्नल ऑफ न्यूमिस्मॅटिक सोसायटी ऑफ इंडिया' या नियतकालिकाच्या दुसऱ्या व्हॉल्यूममध्यें प्रसिद्ध केलीं आहेत.

याप्रमाणें या राज्यांतील प्राचीन इतिहासाची साधनसामग्री जमविण्यास सुमारें सव्वाशें वर्षांपूर्वी आरंभ झाला. या कालावधींत या प्रांतांत अनेक ताम्रपट, शिलालेख व नाणीं प्रकाशांत येऊन त्यांचा सूक्ष्म अभ्यास झाला आहे. आणि त्यायोगें या राज्याच्या प्राचीन इतिहासाची चौकट निश्चित झाली आहे. गेल्या पंचवीस वर्षांत तर अनेक ताम्रपट, शिलालेख व नाणीं उजेडांत येऊन प्राचीन काळीं या राज्यांत राज्य करणाऱ्या सातवाहन, वाकाटक, राष्ट्रकूट, कलचुरि, परमार व यादव या राजवंशांविषयीं अधिकाधिक माहिती उपलब्ध झाली आहे. अद्यापि प्राचीन इतिहासाचे अनेक कानेकोपरे अंधारांत आहेत. अनेक ठिकाणीं आपणांस चांचपडत जावें लागतें.
 कित्येकदा लौकिक समजुती, वाङ्मयीन उल्लेख, दंतकथा इत्यादिकांचा आधार

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ध्यावा लागतो. कांहीं वेळां हा आधार पुरेसा बळकट नसल्यामुळें ठेंच लागण्याचाही प्रसंग येतो. पण अशाही परिस्थितींत संशोधक आपला मार्ग चिकाटीने आक्रमत आहेत. आपणांजवळ असलेल्या ऐतिहासिक साधनांचे दीप पाजळून त्यांचा मार्ग सुकर करणें आपलें कर्तव्य आहे.

प्राचीन इतिहासाची चौकट आता तयार झाली असें मागें म्हटलें, तें ऐतिहासिक काळाविषयीं होय. प्रागैतिहासिक काळासंबंधी आपल्या या राज्यांत फारसें कोणी लिहिलें नाही. नाही म्हणावयास, कै. डॉ. तु. ज. केदार यांनीं आपल्या बुद्धिमत्तेच्या व कल्पनाशक्तीच्या बळावर वैदिक व सुमेरियन वाङ्मयांचें आलोडन करून त्यावरून कांहीं अनुमानें केलीं आहेत. यांच्या अकालीं निधनानें त्यांचें कार्य अपुरें राहिलें आहे. त्याकरितां त्यांच्यासारख्याच मेहनती व कल्पक संशोधकाची जरुरी आहे.

ऐतिहासिक साधनांच्याप्रमाणें प्राचीन संस्कृत, प्राकृत व देशी भाषांतील हस्तलिखितांचा संग्रह करणें हेंही अत्यंत महत्त्वाचें कार्य आहे. याचा उपक्रम कित्येक वर्षांपूर्वी इतर भारतीय राज्यांत होऊन सध्या मुंबई, मद्रास, कलकत्ता, बनारस इत्यादि ठिकाणीं हस्तलिखित ग्रंथांचे बरेच मोठे संचय झाले आहेत. आपल्या या राज्यांत मात्र या तऱ्हेचें कार्य ५।७ वर्षांपूर्वीपर्यंत सुरूच झालें नव्हतें. यापूर्वी या प्रांतांतील संस्कृत व प्राकृत हस्तलिखितांची यादी करण्याचे दोन प्रयत्न झाले. पहिला डॉ. कीलहॉर्न यांचा. या साहेबाने मुख्यतः चांदा, नागपूर व सागर येथील हस्तलिखितांची माहिती जमवून आपला 'मध्यप्रांतातील संस्कृत हस्तलिखितांचा वर्गीकृत कॅटलॉग' सन १८७४ मध्यें प्रसिद्ध केला त्यांत फक्त १८२३ हस्तलिखितांचा निर्देश होता. त्यानंतर कै. डॉ. रा. ब. हिरालाल यांनीं सन १९२६ मध्यें आपला 'मध्यप्रांत-वऱ्हाड येथील संस्कृत व प्राकृत हस्तलिखितांचा कॅटलॉग' प्रसिद्ध केला. यांत ८१८५ हस्तलिखितांचा अंतर्भाव केला असून शिवाय एका पुरवणींत या अकोला जिल्ह्यांतीलच कारंजा येथील जैन भांडारांतील संस्कृत व प्राकृत हस्तलिखितांचे उतारे दिले आहेत. या कॅटलॉगवरून अपभ्रंश वाङ्मयाविषयीं बरीच माहिती प्रथमच प्रकाशांत आली व त्यायोगें त्या वाङ्मयाच्या अध्ययनास विशेष चालना मिळाली. या प्रमाणें या राज्यांतील हस्तलिखितांची यादी दोनदा प्रकाशित झाली असली, तरी तीं हस्तलिखितें मिळवून संग्रह करण्यांची व्यवस्था केली नसल्यामुळें अनेक हस्तलिखितें काळाच्या भक्ष्यस्थानीं पडलीं आहेत. ३।४ वर्षांपूर्वी हाल नृपतीच्या गाथासप्तशतीच्या काळाविषयीं वाद चालू असताना त्या ग्रंथाच्या हस्तलिखित प्रती मिळवून त्याची नवीन आवृत्ति प्रसिद्ध करावी, असें माझ्या मनांत आलें. कीलहॉर्ननें या ग्रंथाच्या कित्येक हस्तलिखितांचा उल्लेख आपल्या कॅटलॉगमध्यें केला आहे. त्यानें उल्लेखिलेल्या गृहस्थांच्या विद्यमान वंशजांकडे मी कांहीं स्नेह्यांमार्फत त्या हस्तलिखितांविषयीं अनेकदां चौकशी केली. पण मला एकही पोथी मिळाली नाहीं. शिवाय, या दोन्ही कॅटलॉगमधील बरीचशी माहिती परहस्तें जमवून दिली आहे ती, ते ते ग्रंथ समक्ष पाहून पडताळून दिली नाहीं. त्यामुळें कित्येकदां संशोधकाची दिशाभूल होते. तसा एक प्रसंग मजवरही आला होता.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

पांच सहा वर्षांपूर्वी वाकाटक नृपति सर्वसेन याच्या महाराष्ट्री प्राकृतांतील 'हरिविजय' या ग्रंथाविषयीं त्रोटक माहिती संस्कृत व प्राकृत ग्रंथांतील उल्लेखांवरून जमवीत असतां डॉ. हिरालाल यांच्या कॅटलॉगांत 'सर्वसेनकृत हरिविजया'ची नोंद आढळली. तें हस्तलिखित नागपुरास भोसल्यांच्या पोथीसंग्रहांत आहे, असा तेथील उल्लेख पाहून तर दीड हजार वर्षांपूर्वीचें काव्य आपणास सांपडलें, असें वाटून अत्यानंद झाला. महाप्रयासाने भोसल्यांचा पोथीसंग्रह पाहण्याची परवानगी मिळवून मी पोथ्या चाळूं लागलों तों त्या संग्रहांतील हरिविजय वाकाटकनृपतिकृत महाराष्ट्री भाषेतील तन्नामक काव्य नसून तो श्रीधर कविकृत मराठी ग्रंथ आहे असें आढळलें व माझी अत्यंत निराशा झाली. असो.

या हस्तलिखितांचा उपयोग संशोधकांस व्हावयाचा असेल, तर तीं जमवून विद्यापीठासारख्या सार्वजनिक ग्रंथालयांत सुरक्षितपणें ठेवण्याची व्यवस्था करणें अवश्य आहे. या विषयीं मी अनेकदा प्रयत्न केले; पण ते निष्फळ झाले. शेवटीं नागपूर विद्यापीठाचें उपकुलगुरु श्री. वासुदेवरावजी पुराणिक यांनीं हें काम हातीं घेऊन डॉ. य. खु. देशपांडे यांच्या साह्यानें त्याला मूर्त स्वरूप दिलें. आता नागपूर विद्यापीठाच्या पुस्तकालयांत हस्तलिखितांचें एक स्वतंत्र खातें उघडलें असून हस्तलिखितांचा संग्रह करण्याचें व त्यांचें वर्गीकरण करून वर्णन लिहिण्याचें काम चालू आहे. अद्यापि या राज्यांत सर्वत्र हिंडून हस्तलिखितें गोळा करण्याचें अत्यंत महत्त्वाचें काम सुरू झालें नाहीं. या कामाकरीतां एखादा स्वतंत्र व योग्य मनुष्य नेमल्याखेरीज हें होणें दुरापास्त दिसतें.

संस्कृत व प्राकृत हस्तलिखितांप्रमाणें प्राचीन मराठी हस्तलिखितांचाही संग्रह करणें अत्यंत आवश्यक आहे व त्या कार्यास या प्रांतांत पुष्कळ अवकाश आहे. या प्रांतांतच जन्मास येऊन विस्तार पावलेल्या महानुभाव पंथाच्या अनेक ग्रंथांचीं हस्तलिखितें प्रयासानें मिळविणें अशक्य नाहीं. शारदाश्रम संस्थेनें व. कै. बापूसाहेब भवाळकर, प्रि. ह. ना. नेने, डॉ. कोलते, श्री. वामनराव देशपांडे यांनी महाप्रयासानें या पंथाच्या ग्रंथांची हस्तलिखितें जमविलीं आहेत व कांहीं ग्रंथही प्रकाशित केले आहेत पण एकंदर कामाच्या मानानें झालेलें कार्य अत्यल्प आहे. सुदैवाने महानुभावी पंथाचे महंत व अनुयायी यांस संशोधनाचें महत्त्व पटल्यामुळे ते आपले ग्रंथ इतरांस दाखविण्यास व क्वचित् देण्यासही आता तयार असतात. तेव्हा महानुभावीय ग्रंथांचा नमुनेदार संग्रह करण्याचें काम विदर्भ साहित्यसंघानें पुढाकार घेऊन करणें जरूर आहे.

प्राचीन हस्तलिखित ग्रंथांप्रमाणें जुन्या ऐतिहासिक कागदपत्रांचा संग्रह व संशोधन करणें अत्यावश्यक आहे. भारत सरकारनें या कार्याकरिता प्रादेशिक-कमिट्या नियुक्त केल्या आहेत. शिवाय नागपूरच्या सचिवालयांतील इंग्रजी कागदपत्र प्रसिद्ध करण्याकरितां एक योजनाही तयार झाली असून त्यांचा पहिला भागही प्रसिद्ध झाला आहे. या बाबतींत एक सूचना करावीशी वाटते. जुने कागदपत्र जसेच्या तसेच छापल्यानें कार्यभाग होणार नाहीं. प्राचीन कोरीव लेख व नाणीं प्रकाशित करताना संपादकाला प्रस्तावनेंत त्याविषयीं सर्वप्रकारें ऊहापोह करावा लागतो व त्या लेखानें किंवा नाण्यानें आपल्या ऐतिहासिक ज्ञानांत काय भर पडली, हें दाखवावें लागतें. या प्रकारचाच ऊहापोह इंग्रजी व मराठी ऐतिहासिक कागदपत्र

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

प्रकाशित करणाऱ्या संपादकानें केला पाहिजे. तसें न केलें तर या प्रकाशनाचा तादृश उपयोग सामान्य वाचकांस किंवा संशोधकांसही होणें संभवनीय नाहीं.

शिलालेख, ताम्रपट, नाणीं, प्राचीन हस्तलिखित ग्रंथ व जुने कागदपत्र ही सर्व सामग्री दुष्प्राप्य व म्हणून बहुमोल असल्यानें तिचें रक्षण व प्रकाशन करणें हें प्रत्येक भारतवासियाचें पवित्र कर्तव्य आहे; किंबहुना ही सामग्री अखिल राष्ट्राच्या मालकीची आहे असें समजून ज्याच्याजवळ ती असेल त्याने ती एखाद्या सार्वजनिक संस्थेच्या-विद्यापीठ, विदर्भ साहित्यसंघासारख्या संस्था किंवा संशोधन मंडळें यांच्या-स्वाधीन करणें जरूर आहे. खासगी व्यक्तीच्या ताब्यांत ही सामग्री राहिल्यास ती लवकरच नष्ट होते, असा मागचा अनुभव आहे. या सामग्रीच्या आजच्या मालकांना तिचें महत्त्व पटून ते तिचें संरक्षण करीत असले, तरी त्यांचे आगामी वंशज तसें करतीलच याची खात्री नाही; किंबहुना या सामग्रीचें महत्त्व माहीत नसल्यामुळे अनेकदा मूर्ति व शिलालेख यांचा इमारतीच्या बांधकामाकडे उपयोग होतो, ताम्रपट तांबटाकडे घरच्या भांड्याच्या मोडीबरोबर जातात व कागदपत्रें वाण्यास रद्दीच्या भावाने विकली जातात. अनेक शिलालेख, ताम्रपट, नाणीं व कागदपत्र अशा रीतीने नष्ट झाले आहेत व त्यांचें पुनः वाचन किंवा अभ्यास करणें अशक्य झालें आहे.

एखाद्या महत्वाच्या लेखाने ऐतिहासिक संशोधनांत कशी क्रांति घडून येते. याचीं एक दोन उदाहरणें येथें देतो. सुमारें तीस वर्षांपूर्वींपर्यंत आपल्या विदर्भाच्या श्रेष्ठ राजवंश वाकाटक याच्या काळाविषयी निश्चित माहिती नव्हती. डॉ. बुल्हरच्या मतें ते ई. स. च्या पांचव्या शतकांत राज्य करीत होते. तर डॉ. कीलहॉर्न व डॉ. फ्लीट यांच्या मतें ते ई. स. च्या आठव्या शतकापूर्वी होऊन गेले नसावे. वाकाटकांच्या लेखांत कोणत्याहि संवताचा उपयोग न करतां प्राचीन पद्धतीप्रमाणे त्या त्या राजाच्या कारकीर्दीचीं वर्षें उल्लेखिलेलीं असतात. म्हणून त्यांच्या काळाविषयीं निश्चित माहिती मिळत नव्हती. सन १९२० च्या सुमारास पुण्यास बळवंत भाऊ नगरकर नामक तांबटाकडे एक ताम्रपट जुन्या भांड्यांच्या मोडींत आला. तो कै. प्रो. काशिनाथ बापुजी पाठक यांस माहीत झाला. तो मूळचा आपल्या वर्धा जिल्ह्याच्या हिंगणघाट तहसिलींतला होता, हें मी अलीकडे दाखविलें आहे. या ताम्रपटांत वाकाटक राज्ञी प्रभावतीगुप्ता हिने आपली माहेरची वंशावळ दिली आहे. तिजवरून ती सुविख्यात द्वितीय चंद्रगुप्त-विक्रमादित्याची कन्या होती, हें प्रथमच माहीत झालें व त्यावरून वाकाटक राजे हे गुप्तांचे समकालीन असून इ. स. च्या चौथ्या-पांचव्या शतकांत होऊन गेले, हे निश्चित झालें. या ताम्रपटाने वाकाटकांच्या काळाला निश्चितपणा आला. हा ताम्रपट न सांपडता तर कित्येक वर्षे तो काळ निश्चित राहिला असता. दुसरें उदाहरण वाशीमच्या ताम्रपटाचें. पुराणांत वाकाटक वंशाच्या चार शाखा होत्या असें म्हटलें आहे. पण त्याविषयीं निश्चित पुरावा नसल्यामुळे सर्व ज्ञात वाकाटक राजे एकाच शाखेचे मानण्यांत येत. सन १९३९ मध्यें वाशीमला एक ताम्रपट सांपडला. त्यांतील वंशावळीवरुन वाकाटकांच्या निदान दोन शाखा होत्या. एकीची राजधानी आरंभी नन्दिवर्धन व नंतर प्रवरपुर आणि दुसरीची वत्सगुल्म—या जिल्ह्यांतील वाशीम—ही होतीं, असें मला दाखवितां आलें. या ताम्रपटानें अजंठ्याच्या लेण्यांतील वाकाटकांच्या त्रुटित लेखांवरहि नवीन प्रकाश पडला आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सारांश, असे ताम्रपट अथवा कागदपत्र प्रकाशनापूर्वी नष्ट झाल्यास त्यामुळें भारतीय प्राचीन इतिहासाचें अपरिमित नुकसान होतें. म्हणून ज्यांच्या संग्रहीं अशीं ऐतिहासिक साधनें असतील, त्यानी तीं प्रकाशनाकरितां सार्वजनिक संस्थांच्या स्वाधीन करणें अत्यावश्यक आहे.

एका गोष्टीमुळे मात्र मन उद्विग्न होतें. दिवसेंदिवस या प्रांतातील संशोधकांची संख्या कमी कमी होत आहे. गेल्या दहा वर्षांत यादव माधव काळे, बापूसाहेब भवाळकर, दामुअण्णा ओक व डॉ. केदार या अनुभवी संशोधकांना काळानें आपणांतून ओढून नेलें. पण त्यांची जागा घेण्यास तरुण लोक पुढें येत नाहींत. ही परिस्थिती अशी चालू राहिली, तर लौकरच असा काळ येईल कीं या प्रांतात सापडलेली ऐतिहासिक साधनसामग्री—कोरीव लेख, नाणी, कागदपत्र इत्यादि–ही परप्रांतांतील विद्वानांकडे अभ्यासाकरितां पाठवावी लागेल. ही गोष्ट या प्रांताला अत्यंत नामुष्कीची होणार आहे.

स्वतंत्र भारतांतील प्रत्येक प्रांताने संशोधन विषयांत अग्रेसर होण्याची महत्वाकांक्षा बाळगिली पाहिजे. या प्रांतातील तरुणांनी इतर विषयाप्रमाणें इतिहास व साहित्य या विषयांतहि भरीव संशोधन करून आपल्या प्रांताचें नांव उज्ज्वल केलें पाहिजे. संशोधनास विस्तृत वाचन, दीर्घ परिश्रम व चिकाटी हे गुण अवश्य असतात हें खरें, पण त्यापासून मिळणारा आनंदहि अनुपम असतो, हें मी स्वानुभवावरून सांगू शकतो. आमच्या प्राचीन तत्वज्ञांनी सृष्टींतील परम तत्वाचें वर्णन–सत्–चित्–आनंद असें केलें आहे. संशोधनानें सत्याचें म्हणजे परमतत्त्वाच्या स्वरूपाचें ज्ञान होत असल्यानें त्यापासून होणारा आनंद ‘ब्रह्मास्वादसहोदर’ असल्यास नवल काय ? आतां विदर्भ साहित्य संघाच्या या अधिवेशनाच्या प्रसंगी इतिहाससंशोधन व साहित्यशाखा यांचें प्रदर्शन खुलें झालें आहे, मी जाहीर करतों व आपणां सर्वांस तें पाहण्याची विनंती करतों.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

टिपणें

महाराष्ट्र साहित्य संमेलन

महाराष्ट्र-साहित्य-संमेलनाचें चौतिसावें अधिवेशन कारवार येथे मेच्या पहिल्या आठवड्यांत यशस्वी रीतीने पार पडलें. १९४६ सालीं बेळगांव येथे भरलेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या धोरणाला आणि कार्यपद्धतीलाहि एक निश्चित वळण लागलें आहे. तदनुसार हें संमेलन या खेपेस महाराष्ट्राच्या नैऋत्य सीमाग्रावरील कारवार या शहरीं भरलें होतें. या संमेलनाच्या निमित्ताने कारवारच्या 'मराठी वाङ्मय मंडळाने' श्री. आनंदराव नाडकर्णी यांचें 'कारवार' आणि डॉ. वामनराव वाघ यांनी संपादिलेले 'काळी ते गंगावळी' हीं दोन पुस्तकें प्रसिद्ध केलीं आहेत, तीं कारवारचें महाराष्ट्राच्या प्रादेशिक घटनेंतील महत्व आणि त्याने गेली दोन शतकें केलेली मराठी वाङ्मयाची सेवा यांचा उत्तम परिचय करून देतात. संमेलनाचे स्वागताध्यक्ष डॉ. वामनराव वाघ यांच्या भाषणांत महाराष्ट्राच्या या नैऋत्य सीमेवर कानडी भावेने मराठीवर चालविलेल्या आक्रमणाचें जे वर्णन आले आहे, तें विदर्भांतील कार्यकर्त्यांना अनेक दृष्टींनी उद्बोधक वाटेल. संमेलनाध्यक्ष श्री. अ. का. प्रियोळकर यांचें भाषण आजपर्यंतच्या अध्यक्षीय भाषणांहून अगदी निराळ्या प्रकारचे आणि त्यांच्या विशिष्ट व्यासंगाचे निदर्शक असें झालें. विद्वत्ता ओज आणि जिव्हाळा यांचा मिलाफ त्या भाषणांत झालेला असल्यामुळे तें प्रदीर्घ असूनहि रोचक वाटलें. विशेषतः, गोमंतकांतील पाश्चात्य ख्रिस्ती मिशनरींनी निर्माण केलेल्या मराठी वाङ्मयाची जी माहिती त्यांनी आपल्या या भाषणांत कोकणी ही मराठीचीच एक शाखा आहे हा सिद्धांत विशद करतांना, दिली आहे, तिच्या अनुषंगाने जर गोमांतकांतील ख्रिस्ती वाङ्मयाचें संशोधन आणि प्रकाशन झालें तर मराठीचें एक स्वतंत्र समृद्ध दालन खुलें केल्या सारखें होईल. त्याबरोबरच महाराष्ट्रांतील मुस्लिम लेखकांच्या अशोधित आणि अप्रकाशित मराठी वाङ्मयाकडे लोकांचे लक्ष वेधून मराठी मुस्लिम समाजांत महाराष्ट्रीयत्वाची जाणीव उत्पन्न करण्याची जी सूचना त्यांनी केली आहे, तीहि स्वागतार्ह आहे. त्यांच्या भाषणाच्या या दोन विशेषांप्रमाणेच त्यानी सुचविलेली हस्तलिखितांच्या संग्रहांची योजनाहि महाराष्ट्रांतील सर्व साहित्यसंस्थांनी आणि विशेषतः विदर्भ साहित्यसंघाने तातडीने लक्षांत घेणे अवश्य आहे. मध्यप्रदेशांत अनेक स्मृतिशेष राज्यांच्या आणि साम्राज्यांच्या राजधान्या उत्खननाची वाट पहात असून, त्यांच्या आश्रितांच्या आतां अवनत दशेला गेलेल्या घराण्यांतील कागदपत्र, ताम्रपट, नाणी वगैरे ऐतिहासिक साहित्य प्रकाशांत येण्यासाठी साक्षेपी संशोधकांच्या कृपाकटाक्षासाठी आतुर झालेलें आहे. म्हणून, विदर्भ साहित्यसंघाने श्री. प्रियोळकर यांच्या भाषणांतील या योजनेकडे अगत्याने लक्ष देऊन, पूर्वमहाराष्ट्रांत तिच्या अंमलबजावणीसाठी पद्धतशीर प्रयत्न केले पाहिजेत.

या संमेलनांतील आणखी दोन घटना उल्लेखनीय आहेत. त्यांपैकीं पहिली घटना ही कीं, महाराष्ट्र-साहित्य-संमेलनाच्या या अधिवेशनांत, प्रथमच विदर्भ-साहित्य-संघाच्या अकोला येथील संमेलनाने मंजूर केलेले महत्वाचें ठराव बव्हंशी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

जसेच्या तसेच स्वीकारण्यांत आणि संमत करण्यात आले. त्या बरोबरच महाराष्ट्राच्या निरनिराळ्या भागांतील साहित्य संस्थांत सहयोग घडवून आणून, निदान मराठी वाङ्मयापुरती तरी संयुक्त महाराष्ट्राची सिद्धता करण्यासाठी, एक योजना तयार करण्याचेंहि ठरलें. अर्थात् अशी योजना तयार करून महाराष्ट्रांतील सर्व साहित्यसंस्थाना महाराष्ट्र–साहित्य–परिषदेच्या कक्षेत आणावयाचें, म्हणजे परिषदेची आजची घटना अधिक समावेशक आणि प्रातिनिधिक करावी लागेल, हें उघड आहे; व म. म. प्रा. द. वा. पोतदार आणि श्री. श्री. रा. नवरे यांनी त्या दृष्टीने कांही सूचनाहि परिषदेला केल्या आहेत, असें समजतें. विशेषतः हैद्राबाद राज्यांतील मराठवाडा आणि मध्यप्रदेशांतील महाविदर्भ हे महाराष्ट्राचे दोन प्रमुख विभाग आज भिन्न शासन सत्ताखालीं आणि भिन्न परिस्थितींत असल्या-मुळें मराठवाडा–साहित्य–परिषद आणि विदर्भ साहित्य संघ यांचा सहयोग महाराष्ट्र साहित्य–परिषदेशी घडवून आणतांना अनेक व्यवहार्य बाबी ध्यानांत घ्याव्या लागतील, सुदैवाने, महाराष्ट्र–साहित्य–परिषदेच्या नेत्यांना या गोष्टीची जाणीव आहे, व त्यामुळें परिषद आणि महाराष्ट्रांतील इतर साहित्य संस्था यांच्या सह-योगाचा हा प्रश्न समंजसपणाने सोडविला जाईल, अशी आशा वाटते,

संमेलनांतील दुसरी उल्लेखनीय घटना म्हणजे नाट्य आणि ललित वाङ्मय यांवर त्यांत झालेली स्वतंत्र चर्चा ही होय. संमेलनाध्यक्षांच्या भाषणांत जिला साहित्याची मौलिक किंवा तांत्रिक चर्चा म्हणतां येईल असें कांही विवेचन अजिबात आलेलें नव्हतें. ही उणीव या दोन विषयावरील स्वतंत्र चर्चेने बऱ्याच अंशाने भरून आली. पण याहि चर्चेतील वैगुण्यें स्पष्ट सांगितली पाहिजेत. पहिली गोष्ट ही कीं, १९४९ च्या मे मध्यें मुंबई येथें भरलेल्या महाराष्ट्र–साहित्य–संमेलनाच्या अधिवेशनांतील शाखासंमेलनात जशी निरनिराळ्या साहित्यविषयांची पद्धतशीर चर्चा करण्यांत आली तशा प्रकारची कोणतीहि पद्धत प्रस्तुत संमेलनांतील चर्चेला लागू करण्यांत आली नव्हती. या चर्चांचे अध्यक्ष आचार्य अत्रे आणि श्री. माडखोलकर या दोघांचीहि भाषणें प्रासंगिक आणि जुजबी झाली; व चर्चेला निव्वळ वादविवादाचे स्वरुप आलें. म्हणून अशा प्रकारचे चर्चा विभाग ज्यावेळीं संमेलनांत ठेवण्यांत येतात त्यावेळीं अध्यक्ष, वक्ते आणि कार्यपद्धती ही तिन्ही पूर्वनियोजित राहतील व या चर्चेचे व्यवस्थित वृत्तहि घेतलें जाईल, अशी दक्षता संमेलनाच्या चालकांनी यापुढें घ्यावयाला हवी. तथापि, या चर्चेतहि साहित्याविषयीचे कांही मौलिक विचार श्रोत्यांना ऐकावयाला मिळाले, हें त्यांचे सुदैव होय. या साहित्यचर्चा विभागा प्रमाणेच महिलांचाहि स्वतंत्र चर्चाविभाग कु. प्रेमा कंटक यांच्या अध्यक्षतेखालीं झाला. तो तर त्यांतील सुविद्य महिलांच्या असंबद्ध आणि परस्पर विरोधी भाषणांमुळेच श्रोत्यांना रोचक वाटला असावा ! ही महिला विभागाची टूम १९४६ च्या बेळगांव संमेलनापासून सुरूं झालेली दिसते. पण तिचे औचित्य पटत नाही आणि उपयुक्तता अद्याप तरी अनुभवाला आलेली नाही. तथापि अशीं कांहीं वैगुण्ये जमेस धरूनहि, कारवारचें संमेलन हें आपल्या अनेक रुचिर आणि अभिनव विशेषांमुळें संस्मरणीय झालें, हें कोणीहि मान्य करील.

ग. त्र्यं. मा.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वि. सा. संघाचे अकोला-संमेलन

विदर्भ-साहित्य-संघाचें तेरावें संमेलन ता. २९ एप्रिल रोजीं अकोला येथें यशस्वी रीतीने पार पडलें. वार्षिकसंमेलन आणि तेंहि साहित्यिकांचें म्हणजे, 'भाषणें, भाषणें व भाषणें'—अशाच स्वरूपाचें असावयाचें, हें ठरूनच गेल्यासारखें आहे. उद्‌घाटनाचें भाषण, अध्यक्षीय भाषण, एखाद्या विषयावर परिसंवादाच्या रूपाने अथवा अन्यप्रकारें होणारीं विद्वानांची भाषणें, ठरावांवरील भाषणें, आभारप्रदर्शनाचीं भाषणें—इत्यादि भाषणांचें सर्व प्रकार अकोला संमेलनांतहि घडून आले ही गोष्ट मान्य केलीच पाहिजे. अकोला–संमेलनांत अनेकांचीं अनेकविधप्रकारचीं फक्त भाषणेंच झालीं असतीं तर संमेलन म्हणजे 'भाषणें निव्वळ भाषणें,' ही टीका सार्थ ठरली असती. पण केवळ भाषणें ही अकोला संमेलनाची फलश्रुति नव्हे. शब्द आणि अर्थ यांचें साहचर्य म्हणजे साहित्य या व्याख्येनुसार अकोला–संमेलनांतील बहुतांश प्रमुख भाषणें अर्थानुगामी व निर्णयानुगामी अशींच झालीं. एवढेंच नव्हे, तर या संमेलनांत जे निर्णय घेण्यांत आले त्यांच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीलाहि प्रारंभ झाला आहे. अकोला संमेलनाची फलश्रुति या निर्णयांत व त्यांच्या अंमलबजावणींतच साठलेली आहे. आणि म्हणून, केवळ सुश्राव्य भाषणें झाली म्हणून नव्हे, तर प्रमुख भाषणांत ध्वनित केल्या गेलेल्या योजना प्रत्यक्ष कृतींत उतरूं लागल्या आहेत म्हणून, हे संमेलन यशस्वी झालें, असें आम्ही म्हणतों.

साहित्यिक प्रश्नांच्या चर्चेबरोबरच वि. सा. संघाने अलिकडे मध्यप्रदेशांतील मराठी भाषासंवर्धनाचें व संरक्षणाचें जें कार्य हातीं घेतलें आहे त्यामुळेच या संघाच्या कार्याला एक प्रकारचा भरीवपणा प्राप्त होऊं लागला आहे. हिंदी व मराठी अशा दोन भाषा बोलणाऱ्यांचा हा प्रदेश आहे. जे प्रदेश, प्रांत अथवा जीं राज्यें (States) द्विभाषी अथवा बहुभाषी स्वरूपाची होऊन बसलीं आहेत त्यांत राजकीय व आर्थिक प्रश्नांच्या जोडीला, वं या प्रश्नांनाहि एक निराळीच कलाटणी देणारे असे विशिष्ट प्रश्न निर्माण होत असतात. कधीकधी या विशिष्ट प्रश्नांना इतकी तीव्रता प्राप्त होते की, तिच्या प्रभावामुळे इतर सर्वसाधारण महत्वाचे प्रश्नहि अधिक गुंतागुंतीचे व बिकट होऊन बसतात. हें विशिष्ट प्रश्न सोडविण्याचा एक उत्तम मार्ग म्हणजे भाषावार प्रांतरचना तात्बडतोब अमलांत आणणें, हा होय.

मध्यप्रदेशांतील या विशिष्ट प्रश्नांना अनुसरून संमेलनाचे अध्यक्ष श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणांत जे विचार प्रकट केले त्यांत वि. सा. संघाची या प्रश्नांबाबतची भूमिका उत्तम रीतीने प्रतिबिंबित झाली आहे. श्री. माडखोलकरांचें हें भाषण भाषेच्या दृष्टीने जितकें रेखीव तितकेंच विवाद्य मुद्यांच्या विवेचनाच्या दृष्टीने समतोल असें झालें. त्यांत मराठी भाषेचा आभिमान आहे. पण हिंदी अगर इतर कोणत्याहि भाषेचा अनादर नाही. त्यांत मराठी भाषेवर होणाऱ्या अन्यायाची सडेतोड मांडणी आहे पण ज्यांच्याकडून हा अन्याय केला जात आहे त्यांच्यावर विद्वेषाचे फूत्कार नाहींत, तर केवळ त्यांच्या न्यायबुद्धीलाच आवाहन आहे. आणि त्यांत मराठी भाषेवरील अन्याय नाहींसा करण्यासाठी जे उपाय सुचविले आहेत त्यांचें स्वरूप विध्वंसक नसून विधायक असेंच आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

श्री. माडखोलकरांच्या अध्यक्षीय भाषणाचा प्रभाव संमेलनांत झालेल्या चर्चेवर पडणें क्रमप्राप्तच होतें. किंबहुना या प्रांतांतील मराठी भाषेच्या व साहित्यिकांच्या भाषणांनीच हें भाषण प्रभावित झालें होतें, असें म्हटल्यास तें चुकीचें होणार नाही. भाषावार प्रांतरचना प्रत्यक्ष घडवून आणण्याची जबाबदारी मुख्यतः अखंड महाराष्ट्रांतील राजकारणी लोकांवरच आहे. पण त्या साठी आवश्यक असलेली पार्श्वभूमि निर्माण करण्याचें कार्य हें खास साहित्यिकांचेंच आहे. आणि हें कार्य श्री. माडखोलकरांच्या अध्यक्षीय भाषणानें व संमेलनांत घेतल्या गेलेल्या निर्णयांनी उत्तम रीतीने पार पडलें, असें म्हणावयास मुळीच प्रत्यवाय दिसत नाही.

विदर्भ साहित्य मंदिराची उभारणी हें याच कार्याचें एक मूर्त रूप आहे. आणि या दृष्टीने या साहित्यमंदिराच्या उभारणीबाबत जें पूर्ण मतैक्य संमेलनांत दिसून आलें त्यावरून महाविदर्भांतील सुशिक्षित जनता या विभागांत आपल्या मायबोलीची बसरत चाललेली प्रतिष्ठा सावरून धरण्याचा एक सर्वोत्कृष्ट मार्ग म्हणून विदर्भ साहित्य मंदिराची उभारणी घडवून आणण्यासाठी आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठा करतील, अशी आशा या संमेलनाने निर्माण केली आहे. किंबहुना, या प्रदेशांत मराठी भाषा जिवंत राहील की नामशेष होऊन जाईल, हें आतां विदर्भ साहित्य मंदिराची योजना ज्या रीतीने सफल किंवा विफल होईल, त्यावरच अवलंबून आहे, असें म्हटल्यास मुळीच अतिशयोक्ति होणार नाही. विदर्भ साहित्य मंदिराची संकल्पित उभारणी, हा महावैदर्भीय जनतेच्या मातृभाषाभिमानाचा सांप्रत एकमात्र मानबिंदु झालेला आहे.

नवें नेतृत्व

विदर्भ साहित्य मंदिराबाबतचा निर्णय हा वस्तुतः चांद्याच्या संमेलनानें घेतला होता. अकोल्यास त्या निर्णयाचा अधिक जोरदार पुनरुच्चार झाला. चांदा ते अकोला यांच्या दरम्यान सरकारकडून साहित्य मंदिरासाठी जागा मिळविण्यांत आली आणि मंदिराचा कोनशिला समारंभ गृहमंत्री ना. पं. मिश्र यांच्या हस्तें करण्यांत आला. चालू वर्षांत प्रा. सौ. कुसुमावती देशपांडे ह्या संघाध्यक्ष निवडून आल्या आहेत. त्यांच्याकारकीर्दीत मंदिराचा किमान अर्धाभागतरी पूर्ण होईल, असा संकल्प अकोला येथें जाहीर करण्यांत आला. कुसुमावतीबाईंची साहित्यसेवा केवळ महाविदर्भांतच नव्हे तर अखिल महाराष्ट्राने गौरविली आहे. त्यांची साहित्य-कलाभिरुचि अभिजात स्वरूपाची आहे. त्यांच्या निवडणुकी नंतर ठिकठिकाणीं त्यांचे जे सत्कार समारंभ घडून आले व त्यांत त्यांनी जीं भाषणें केली त्यांचे स्वरूप पाहतां मराठी साहित्याच्या चळवळीला नवें तेज व नवा भरीवपणा प्राप्त होईल, असा विश्वास वाटूं लागला आहे. राजकारण निरपेक्ष अशी एक शुद्ध सांस्कृतिक भूमिका देखील समाज जीवनाला नवी स्फूर्ति देऊं शकते, याची जाणीव कुसुमावतीबाईंच्या भाषणांनी निर्माण केली आहे. केवळ सुशिक्षितांचीच नव्हे तर सर्वसामान्य जनतेची साहित्य-कलाभिरुची उच्च दर्जाची होण्यावरच भारतीय संस्कृतीचें भवितव्य अवलंबून आहे. साहित्य-कलाविन्मुख आणि केवळ धर्म वा राजकारण सापेक्ष अशीं सामाजिक आन्दोलनें व्यक्ति-जीवनाला आधुनिकता व प्रगतिशीलता प्राप्त करून देण्यास असमर्थ आहेत. या सत्याचा आविष्कार

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

कुसुमावतीबाईंच्या वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तित्वामुळें प्रभावी रीतीनें होऊं लागला आहे. म्हणून कुसुमावतीबाईंच्या नेतृत्वामुळें वि. सा. संघाला भरीव स्वरुपाची नवीनता व प्रगतिशीलता प्राप्त होईल यांत तिळमात्र शंका नाहीं.

सौ. कुसुमावतीबाई केवळ प्राध्यापक अथवा साहित्यिक नाहीत. आधुनिक भारतीय स्त्रीत्वाचा एक रम्योदात्त आदर्श त्यांच्या प्रज्ञावंत व प्रगल्भ व्यक्तित्वांतून सदैव आविष्कृत होत असतो. त्यांच्या सुमारे पंधरा वर्षांच्या प्राध्यपकीय जीवनाने शेकडों तरुण मुलामुलींना नवीदृष्टी मिळवून दिली आहे. त्यांचा विद्यार्थीवर्ग निरनिराळ्या व्यवसायांत प्रांतभर पसरला आहे. त्यांच्यापैकीं कांहींनी नांव-लौकिकहि मिळविला आहे. स्त्रियांच्या चळवळींत त्यांनी केलेलें कार्य भरीव स्वरुपाचें आहे. सारांश, स्वतंत्र भारताला ज्या नव्या माणसांची, नव्या कर्तृत्वाची व नव्या दृष्टीची आवश्यकता आहे, त्या सर्वांचा पाया कुसुमावतीबाईंच्या आजवरच्या अनेकविध स्वरुपाच्या कार्याने रचला गेला आहे. त्यामुळें केवळ विदर्भ साहित्य मंदिराच्या कार्यालाच नव्हे, तर महाविदर्भाच्या व महाराष्ट्राच्या सांस्कृतिक चळ-वळींना एक नवा उजळा कुसुमावतीबाईंच्या नेतृत्वामुळें प्राप्त होईल, असा आम्हांस भरंवसा वाटतो.

सौ. कुसुमावतीबाईंची कार्यपद्धतिहि मोठी रेखीव आहे. वि. सा. संघाच्या आजवरच्या कार्यपद्धतींत एक प्रकारचा सैलपणा रेंगाळत होता. ही गोष्ट नाकारतां येण्यासारखी नाही. त्याला कांहीं कारणेंहि होतीं. पण वि. सा. संघाने जीं मोठ-मोठी कार्यें आतां हातीं घेतलीं आहेत ती सैल कार्य पद्धतीने पार पडण्यासारखीं नाहींत. या गोष्टींची तीव्र जाणीव कुसुमावतीबाईंनी अधिकारग्रहण घेतल्या बरोबर सर्व कार्यकर्त्यांना आणून दिली. चालू वर्षात संघाच्या कार्यपद्धतींत अधिक रेखीवपणा, कांटेकोरपणा व चोखपणा प्रस्थापित झाल्याचे निश्चितपणें दिसून येईल.

घटना दुरुस्ती

संघाच्या कार्याचा नवा व वाढता व्याप लक्षांत घेतां संघाच्या घटनेंत कांहीं दुरुस्त्या करणें क्रमप्राप्तच होतें. यासाठीं कार्यकारिणीने एक समिती नेमली होती व तिचा अहवाल अकोल्यास सर्व साधारण सभेपुढें ठेवण्यांत आला. घटना दुरुस्ती ही अर्थात एक महत्वाची घटना असते. कोणत्याहि संस्थेचा पाया व कार्यपद्धती घटनेच्या आधारांवरच रचली जात असते. यामुळें या प्रश्नावर बरेंच वादळ माजल्यास तेंहि स्वाभाविकच होतें. वादळ बरेंच माजलेंहि. अकोल्याचे संमेलन या वादळामुळेंहि बरेंच गाजलें. व इतकें की, घटना दुरुस्ती लांबणीवर पडतें की काय व त्यावरील मतभेद विकोपास जातील की काय, अशी भीतिहि काही काळ निर्माण झाली. पण सरतेशेवटीं ज्या सामोपचाराने व सर्वानुमतें महत्वाच्या दुरुस्त्या पास झाल्या तो प्रकार पाहतां संघा-विषयीं सर्व सभासदांत किती आत्मीयतेची व अभिमानाची भावना वास करीत आहे याचें सर्वांना प्रत्यंतर मिळालें. संघाच्या विकासास हें नवें प्रत्यंतर अत्यंत उपकारक ठरेल यांत शंका नाही.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रदर्शन, चर्चा व ठराव

इतिहास-संशोधन-साहित्य यांचें प्रदर्शन हें अकोला संमेलनाचें एक उठावदार वैशिष्ट्य होतें. त्या प्रदर्शनाच्या उद्घाटनाचें म. म. वा. वि. मिराशी यांचें भाषण त्यांच्या अखिल भारतीय कीर्तीला साजेसें झालें.

अकोला संमेलनांत प्रा. ग. त्र्यं. देशपांडे यांच्या अध्यक्षतेखालीं ' वैदर्भी रीती ' या विषयावर चर्चा झाली. विषयाचें रूप पाहतां ही चर्चा रुक्ष व नीरस होईल, असा पुष्कळांचा समज झालेला होता. पण ही चर्चा इतकी रंगली की, ती आणखी कांहीं वेळ चालली असती तर बरें झालें असतें, असें सर्वांना वाटलें. या चर्चेत ज्या विद्वान साहित्यिकांनी भाग घेतला व परिश्रमपूर्वक आपलें निबंध व भाषणे तयार केलीं, त्याबद्दल ते धन्यवादास पात्र आहेत. साहित्यसंमेलनांत साहित्यिक चर्चेपेक्षां अवांतर विषयांनाच विशेष महत्व प्राप्त होतें, असा एक आक्षेप नेहमीं घेण्यांत येतो. या आक्षेपालाहि वैदर्भी रीतिवरील चर्चेने उत्तम उत्तर दिलें. अकोला संमेलनाची ही फलश्रुतिहि भरीवच मानली पाहिजे. 'वैदर्भी रीति'—वरील प्रबंध पुस्तक रूपाने प्रकाशित करण्याचा संकल्प जाहीर झाला आहे. या पुस्तकामुळें मराठी वाङ्मयांत एका भरीव ग्रंथाची भर पडेल यांत शंका नाहीं.

ठरावांवरील भाषणेंहि मुद्देसूद झालीं. विशेषतः डॉ. रघुवीरकृत नव्या परिभाषेबाबतचा ठराव चांगलाच रंगला. ठरावाचे स्वरूप विवाद्य नव्हतें पण त्यावरील कांही भाषणांनी नव्या परिभाषेबाबत जें वादळ उठविलें त्यामुळें एक मूलभूत प्रश्नच निर्माण झाला. इंग्रजीचें अभ्यासक्रमांतून उच्चाटन करावें की न करावें, असें स्वरूप या चर्चेला प्राप्त झालें. ही चर्चा अत्यंत उद्बोधक अशीच झाली.

सरहद्दीवरील मराठी भाषेचे प्रश्न निकालांत काढण्याबाबतहि महत्वाचे ठराव झाले. ते प्रश्न धसास लावण्याचें कार्य एका खास समितीकडे सोपविण्यांत आलें आहे.

आभार प्रदर्शन

अकोल्याच्या साहित्य प्रेमी मंडळींनी हें संमेलन यशस्वी करण्यासाठी जे परिश्रम घेतले त्याबद्दल ते सर्व धन्यवादास पात्र आहेत. विशेषतः श्री. ब्रिजलाल बियाणी व श्री. खोडे यांनी घेतलेले परिश्रम विशेषच उल्लेखनीय आहेत. वि. सा. संघाचें व्यासपीठ हें राजकारणनिरपेक्ष असें आहे. श्री. ब्रिजलाल बियाणी यांचा पिंड राजकारणाचि. अशा परिस्थितींत हें संमेलन राजकीय स्पर्शाने तर रंगलें जाणार नाहीना; अशीहि शंका अनेकांना आली होती. पण तिचें या संमेलनाने निरसन केलें. श्री. बियाणी यांनी शिष्टाचाराच्या सर्व सीमा पाळल्या व संघाच्या राजकारणनिरपेक्ष स्वरूपाला यत्किंचितहि दखल दिली नाही. त्यांच्या या वृत्तिबद्दल संघ त्यांचा ऋणी आहे. अशाच निरपेक्ष भावाने श्री. बियाणी कार्याला पुढेहि भरीव स्वरूपाची मदत करतील, अशी जी आशा अनेकांना वाटू लागली आहे, ती सफल करणें न करणें ही त्यांच्याच स्वाधीनची गोष्ट आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

डांगबाबतचा निर्णय

डांगचें प्रकरण गेलें वर्ष दीडवर्ष बरेंच गाजलें. मध्यंतरीं मुंबई-मंत्रिमंडळाने एक चौकशी-समिति नेमून अधिकृतरीत्या असा निर्णय दिला की भाषादृष्ट्या डांग हा मराठीच मानला पाहिजे. या निर्णयाविरूध्द गुजरातमध्ये बरेंच वादळ उठलें. पण गुजरातचेच एक अव्वल दर्जाचे पुढारी व मुंबईचे गृहमंत्रि श्री. मुरारजी देसाई यांचीहि मान्यता वरील निर्णयाला मिळाल्यामुळें आमच्या गुर्जरबांधवांचा विरोध लटका पडला. अशा रीतीनें एकदा निकालांत निघालेलें हें प्रकरण केंद्रीय व प्रांतीय निवडणुकीं निर्वाचन क्षेत्रें तयार करण्याच्या प्रक्रियेमुळे पुन्हा एकदां उकरलें गेलें. निवडणूक अधिकारी श्री. सेन यांनी जो अहवाल राष्ट्राध्यक्ष डॉ. राजेंद्रप्रसाद यांना सादर केला व त्याच्या आधारावर राष्ट्राध्यक्षाचें आज्ञापत्रक भारतीय संसदेपुढे ठेवण्यांत आलें त्यांत डांगचा विभाग नाशिकऐवजी सुरत जिल्ह्याला निर्वाचनक्षेत्राचा भाग म्हणून जोडण्यांत आला. राष्ट्राध्यक्षांच्या हुकुमांत बदल करण्याचा अधिकार फक्त संसदेलाच आहे. पण एकदा जाहीर झालेला हुकूम बदलवून घेणें हें काम सोपें नव्हतें. पण सुदैवाने तें घडून आलें.

हा हुकूम जाहीर होतांच महाराष्ट्रांत प्रचंड वादळ उठलें. असें एकहि मराठीवृत्त अथवा संस्था नसेल की जिने ह्या हुकमाविरुद्ध आपली तीव्र नापसंती व्यक्त केली नसेल. एवढेच नव्हे तर या प्रश्नाला राजकीय महत्व असल्यामुळे कॉंग्रेसविरोधी सर्व पक्ष महाराष्ट्र-कॉंग्रेस समितिवर इतके तुटून पडले की, डांग जर सुरते ऐवजी परत नासिकला जोडला गेला नाहीतर महाराष्ट्रकॉंग्रेसने आत्मविसर्जन करून हा प्रश्न धसास लावावा, असें म्हणण्यापर्यंत कांहीं टीकाकारांनी मजल मारली.

संयुक्त अथवा अखंड महाराष्ट्राचा प्रश्न लांबणीवर पडल्यामुळे आधीच महाराष्ट्रीय जनतेंचीं मनें प्रक्षोभित झालेलीं होती. त्या प्रक्षोभांत डांगबाबतच्या या नव्या हुकुमामुळे तेलच ओतलें गेलें, असें म्हटल्यास ती मुळीच अतिशयोक्ति होणार नाही.

पार्लमेंटाच्या कक्षेंत या निर्णयाबाबत जी चर्चा होत असे तिने पार्लमेंटचें वातावरण इतकें गरम करून टाकलें की, देशांतील सर्व संसद-सदस्यांत या डांग प्रकरणाने चांगलेंच कुतूहल निर्माण झालें. डांगप्रकरण संसदेंत सर्वतोमुखी होऊन बसलें.

या प्रकरणाला एवढा रंग चढण्याचें कारण महाराष्ट्रातर्फे म. कॉं. प्र. समितिचे अध्यक्ष श्री. भाऊसाहेब हिरे व ना. काकासाहेब गाडगीळ यांनी हें प्रकरण धसास लावण्यासाठी फारच जोरदार प्रयत्न केले. आणि हे प्रयत्न जितके जोरदार होते. तितकाच त्यांचा विरोध ना. श्री. मुनशी यांनी जोरदारपणें केला. केंद्रीय मंत्रिमंडळां-तील दोन मंत्र्यांतच हें असें रण माजल्यामुळे साहजिकपणेंच या प्रकरणास फारच प्रक्षोभक रंग चढला.

डांग हा विभाग महाराष्ट्राचा की गुजरातचा, हा प्रश्न इतिहास, भूगोल यांच्या पुराव्यावर निर्विवादपणें कोणालाहि सोडविता येणें सहज शक्य होतें. पण एकदा प्रांतीय व भाषिक अभिनिवेश एखाद्याला चढला की, केवळ वितंडवादच

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

नव्हे, तर इतिहास व भूगोलहि आपल्या मनासारखा करून टाकण्यापर्यंत त्याची मजल जाते, असा मासलेवाइक अनुभव या वादाने आणून दिला.

'जिथे जिथे गुजराती, तिथे तिथे गुजरात'—अशी गर्जना एकदा कन्हैयालाल मुनशींनी केली होती. या गर्जनेशी सुसंगतच गुर्जरबंधूंचा व विशेषतः श्री. मुनशींचा डांगबाबदचा दावा मजाविला गेला होता.

प्रकरण फारच विकोपास जात आहे हें पाहून पं. जवाहरलालजींनी तें लवादाकडे सोपविण्याची सूचना केली व उभयपक्षी मान्य करण्यांत आली. श्री. डॉ. बक्षी टेकचंद, डॉ. मुकर्जी, व रे जे. डिसोझा अशा तिघांचें लवाद नेमण्यांत आलें. मला या ठिकाणीं हें सांगितलें पाहिजे की, पार्लमेंटांत अशी दहावीस सज्जन व विद्वान माणसें आहेत की, ज्यांच्या निःपक्षपातीपणाबद्दल सर्वांना अत्यंत आदर वाटतो. अशा मंडळी पैकींच हे तीन सद्गृहस्थ आहेत. इतके उत्तम लवाद दिल्याबद्दल पं. नेहरूंना अंतःकरणपूर्वक धन्यवाद अखिल महाराष्ट्राने दिले पाहिजेत.

या लवादासमोर गुजरातची बाजू ना. मुनशींनी मांडली व महाराष्ट्राची बाजू ना. काकासाहेब गाडगीळांनी मांडली. गुजरातच्या अभिनिवेशाने ना. मुनशी सारखा नामांकित कायदे पंडित व राष्ट्रीय पुढारी कोणत्या थरापर्यंत जाऊं शकतो याचें चांगलेंच प्रत्यंतर, त्यांनी लवादासमोर केलेल्या वकीलीमुळे सर्वांना आलें मुनशींची ही आततायी वृत्तीच डांगचा निर्णय महाराष्ट्राच्या बाजूने होण्यास प्रामुख्याने कारणीभूत झाली आहे.

बक्षी टेकचंद समितिच्या या निर्णयामुळे केवळ डांगचाच प्रश्न न्याय्य रीतीने निकालात निघाला, एवढेच नव्हे, तर भाषावार प्रांतरचनेच्या प्रश्नालाहि त्यामुळे अनुकूल वातावरण निर्माण झालें आहे. डांगचा प्रश्न निकालांत निघण्याच्या आधीं व नंतरहि कर्नाटकचे श्री निजलिंगाप्पा, श्री. शंकरराव देव प्रभृति मंडळींचें जें एक शिष्टमंडळ पं. नेहरूंना भेटलें व पं. नेहरूंशी या मंडळाने जी चर्चा केली तिचें स्वरुप पाहतां पं. नेहरू आता भाषावार प्रांतरचनेच्या प्रश्नाकडे बऱ्याच सहानुभूतीच्या दृष्टीने पाहूं लागले आहेत, असें दिसून येतें.

डांगचा प्रश्न ज्या रीतीने निकालांत निघाला त्यावरून एक बोध घेतां येण्या सारखा आहे. असमंजस, असंयमशील व राष्ट्रहितविरोधी भूमिकेचा अवलंब करून व राणाभीमदेवी थाटाच्या गर्जना करून भाषावार प्रांतरचनेचा प्रश्न जे धसास लावूं पाहतात ते भाषावार प्रांतरचनेचे शत्रूच मानले पाहिजेत. भारतीय विधानांत प्रदेशाच्या सीमा बदलवून घेण्याचा जो विधि सांगितला आहे तो ध्यानांत घेऊनच या प्रश्नाचा विचार केला पाहिजे. दुसरी अशी की, राष्ट्राच्या ऐक्याला बाध येईल अशी भाषा व कृति हा प्रश्न धसास लावतांना वर्ज्य मानली पाहिजे. आणि तिसरी गोष्ट अशी की आततायी अधीरपणाची वृत्ति सोडून खंबीरपणाची पण अत्यंत धीराची वृत्ति धारण करून इतिहास, भूगोल व राजकारण यांच्या वास्तवताप्रधान अशा भक्कम आधारा-वर जनमत तयार करून राष्ट्रीय नेत्यांच्या मनांतील या प्रश्नाबाबतच्या आशंका नाहीशा करून टाकण्यांचा सतत नेटाने प्रयत्न करीत राहिलें पाहिजे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

डांगच्या निर्णयापासून हा एवढा बोध जर महाराष्ट्रीय जनता व महाराष्ट्रीय नेते घेतील तर अखंडमहाराष्ट्र प्रांत आकारास आणणें मुळीच अशक्य नाही. आमचा असा विश्वास आहे की येत्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर थोड्याच अवधींत भाषावार प्रांतांचा प्रश्न राष्ट्रहितबुद्धीने व सर्वसंमत रीतीनेच निकालांत निघेल.

पु. य. दे.

GOVT. OF M. P., EDUCATION DEPARTMENT

MEMORANDUM

No. 3351/1051-XIX, dated Nagpur the 6th June 1951.

To,

(1) The Director of Public Instruction, Madhya Pradesh.

(2) Principals of Government Colleges (including Government Engineering School, Nagpur.)

Subject :— Exemption from appearing in the departmental in Marathi to persons passing the "Sahitya Vineet" Examination of the Vidarbha Sahitya Sangh.

The State Government are pleased to exempt those Government servants who pass the "Sahitya Vineet" examination of the Vidarbha Sahitya Sangh, Madhya Pradesh, Nagpur, from taking the Departmental examination in language except the practical test in teaching, prescribed vide Articles 146-49 of the Education Manual.

By order of the Governor,
Madhya Pradesh.

Sd/-

Under Secretary to Government,
Madhya Pradesh,
Education Department.

विदर्भ साहित्य संघाच्या 'विनीत' परीक्षेला मान्यता देणारा सरकारी हुकूम.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

१९५१
जून

'युगवाणी'

विदर्भ साहित्य संघाच्या १९५१ सालच्या कार्यकारी मंडळाच्या हातचा हा पहिला अंक होय. एप्रिलमध्ये अकोला संमेलनाचा खास अंक काढल्यावर मेच्या अंकासाठी पुरेसा कागद उरला नाही व कागदाच्या बाजारांत अधिक वाढलेल्या टंचाईमुळे नवा कागद मिळूं शकला नाही. त्यामुळे मेचा अंक बंद ठेवणें अपरिहार्य झालें, हें युगवाणीच्या वाचकांना कळविण्यांत आलें होतेंच. या अंकासहि अनेक कारणांमुळे अतिशय विलंब होत आहे. युगवाणीचे यंदाचे कार्यकारी संपादक श्री. वामनराव चोरघडे यांना प्रकृतिच्या अस्वास्थ्यामुळे या अंकाकडे लक्ष देतां आलें नाही, हें एक प्रमुख कारण आहे.

ता. १७-६-५१ रोजी भरलेल्या कार्यकारी मंडळाच्या सभेमध्यें 'युगवाणी' विषयीं दोन महत्वाचे निर्णय घेण्यांत आले. पहिला निर्णय कागदाच्या वाढत्या टंचाईमुळे 'युगवाणी' द्वैमासिक करण्याविषयी. या निर्णयामुळे युगवाणीच्या अनेक वाचकांनी असंतोष वाटण्याचा संभव आहे. कार्यकारी मंडळालाहि हा निर्णय अत्यंत खेदानेच घ्यावा लागला. संघाच्या सर्व सभासदांची वर्षभर व प्रत्यक्ष सेवा केवळ 'युगवाणी'च्या द्वारेंच होऊं शकते व म्हणून 'युगवाणी' दर महिन्याला निघणें इष्ट आहे, याची कार्यकारी मंडळाला पूर्ण जाणीव आहे. परंतु कागदाच्या वाढत्या टंचाईमुळे हा निर्णय घेणें अपरिहार्य झालें. मात्र, याबरोबरच युगवाणीचा साहित्यिक मूल्याच्या दृष्टीने विकास करण्याचाहि संकल्प कार्यकारी मंडळाने केला. विदर्भ साहित्य संघाच्या वाढत्या गौरवाबरोबर त्याचें मुखपत्रहि अधिक भरदार निघावे, अनेक साहित्याविषयक व भाषाविषयक प्रश्नांना चालना देण्याचें यथार्थ सामर्थ्य त्यामध्ये यावें, या दृष्टीने कार्यकारी मंडळाने संपादकांच्या सहाय्यासाठी एक मंडळ नेमलें. १९५० च्या कार्यकारी मंडळाने नेमलेल्या एका उपसमितीच्या सूचनेप्रमाणें ही योजना झाली आहे. श्री. पु. य. देशपांडे, श्री. ह. ना. नेने, सौ. कुसुमावती देशपांडे व श्री. शरच्चंद्र मुक्तिबोध यांची या मंडळावर नियुक्ति झाली. या सर्वांच्या सहकार्याने युगवाणीचा सर्वांगीण विकास होईल, असा विश्वास आहे. 'युगवाणी' द्वैमासिक झाल्यामुळें अनेकांना जो विषाद वाटेल त्याचा या योजनेमुळे निरास होईल, अशी खात्री आहे.

वि. सा. संघाचें कार्यालय

कार्यालयीन व्यवस्थेमध्येदेखील यापुढे सुधारणा आढळून येईल, असा भरंवसा आहे. ता. १ जुलैपासून संघाचे कार्यालय तात्पुरत्या कां होईना परंतु स्वतःच्या वास्तूमध्ये जात आहे. आजपर्यंत वेगवेगळ्या कार्यकर्त्यांच्या घरीं विभागलें गेलेलें संघाचें दप्तर आतां केंद्रीय कार्यालयांत सुव्यवस्थित लागलें जाईल. विदर्भसाहित्य मंदिराच्या मुख्य इमारतीच्या बांधकामाला प्रारंभ करण्यास इंम्प्रूव्हमेंट ट्रस्टची परवानगी, मंदिराच्या जागेलगतच्या रस्त्यांच्या आखणीची निश्चिति इत्यादि बऱ्याच विलंबकारक अडचणी येऊं लागल्यामुळें प्रथम विहीर व कार्यालयापुरत्या पत्र्याच्या खोल्या बांधण्याचा निर्णय घेण्यांत आला. विहिरीसाठी लागणारी पूर्ण रक्कम वि. सा. संघाचे आश्रयदाते श्रीमंत बाबूरावजी देशमुख यांनी अत्यंत उदारपणे

 व तत्परतेने दिली आहे. श्री. येरगांवकर, इंजिनियर याच्या साह्याने व मंदिरसमितीचे

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आमंत्रक श्री. नाना जोग यांच्या अविश्रांत कार्यामुळे संचाला व 'युगवाणीला' ता. १ जुलै रोजी हक्काचा आसरा लाभेल. या आनंदामध्ये युगवाणीचे सर्व वाचक सहभागी होतील अशी खात्री आहे.

वि. सा. संघाच्या परीक्षांना मान्यता

विदर्भ साहित्य संघाच्या 'विनीत' परीक्षेला मान्यता देणारा सरकारी हुकूम अन्यत्र छापला आहे. अ-मराठी अधिकाऱ्यांना सरकारी नियमांप्रमाणे मराठीमध्ये एक लेखी व मौखिक परीक्षा द्यावी लागते. वि. सा. संघाची 'विनीत' परीक्षा देणाऱ्या अधिकाऱ्यांना सरकारी परीक्षेतील लेखी विभागाला बसावें लागणार नाही. विनीतच्या परीक्षेच्या तयारीसाठी वि. सा. संघातर्फे नागपूर, उमरावती, जबलपूर सागर, इत्यादि प्रमुख ठिकाणीं वर्गाहि उघडण्याची योजना केली जात आहे. आमचे अ-मराठी प्रांतबंधु या सवलतीचा फायदा घेतील, अशी आशा आहे. विदर्भ साहित्य संघाच्या परीक्षांना मान्यता देण्याचा पायंडा सुरू केल्याबद्दल मध्यप्रदेश शासनाच्या शिक्षण विभागाचे अत्यंत आभार मानावयास पाहिजेत. संघाच्या उच्चश्रेणीच्या परीक्षांना विद्यापीठाकडून मान्यता मिळण्याच्या प्रयत्नालाहि आतां प्रारंभ व्हावयास हवा. साहित्याचा निष्ठापूर्ण अभ्यास करण्यास उच्चश्रेणीच्या परीक्षांचें फार मोठें सहाय्य होतें. विदर्भ साहित्य संघांच्या परीक्षांकडे मराठीप्रेमी लोक आकर्षित होऊं लागतील तर मराठी साहित्याच्या व्यासंगामध्ये एक नवा जोम येईल.

कु. दे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ

अधिवेशन तेरावें, अकोला

अध्यक्ष श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांचें भाषण

ता. २८ एप्रिल १९५१

मित्र हो,

महाराष्ट्रांतील विदर्भ साहित्याच्या या व्यासपीठावरून आपल्याशीं हितगुज करतांना माझें हृदय आज अनेक संमिश्र भावनांनीं भारावलेलें आहे. साहित्याच्या व्यासपीठावर एकाकी अधिरूढ होण्याचा माझ्या आयुष्यांतील हा पहिलाच प्रसंग. दीड वर्षापूर्वीं ज्या वेळीं मी आपल्या निमंत्रणाचा स्वीकार करून हीं जवाबदारी पत्करली, त्या वेळीं हें सवनकर्म आपल्याला एकट्यानेच उरकावे लागेल, अशी कल्पनाहि माझ्या मनाला शिवली नव्हती. त्यामुळें, ज्याच्या संसारांतील सहधर्माची सुषमा लोपून गेलेली आहे आणि ज्याच्या जीवनावर मृत्यूची छाया पडलेली आहे, असा मी—एकाकी आणि अनाश्रमी !——त्या माझ्यासारख्या दैवहताच्या हातून ही जवाबदारी कशी पार पडणार, असा प्रश्न सहजच डोळ्यांपुढें उभा राहिला इतकेंच नव्हे, तर या जवाबदारींतून आपण निवृत्त व्हावें, असेहि विचार माझ्या मनांत पुनःपुन्हा आले. पण त्याबरोबरच, आपण गळा दिलेला हा बहुमान हा माझे गुरु कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांचा वारसा आहे, याचीहि जाणीव माझ्या मनांत सतत जागृत होती. किंबहुना, १९२४ सालच्या जुलैमध्यें मी ज्या वेळीं अगदी अनिकेत, अकिंचन स्थितींत पश्चिम महाराष्ट्रांतून पूर्व महाराष्ट्रांत यावयाला निघालों, त्या वेळीं त्यांनीं जो आदेश मला दिला होता, त्याची स्मृति आणि स्फूर्ति ही हृदयाला सतत जाळणाऱ्या हलाहलासारख्या दुःखापेक्षाहि अधिक प्रबळ, अधिक प्रभावी ठरली; व त्यांच्या आशीर्वादानें माझ्याकडे आलेला हा त्यांच्या कार्याचा वारसा मी, स्वतःच्या कल्पनांनुसार, सांगतेला नेण्याचा निश्चय केला.

भाषिक हितसंबंधांचा प्रश्न का उद्‌भवला ?

या माझ्या कल्पना कोणत्या ? विदर्भ साहित्यसंघ ही मध्यप्रदेशांत अंतर्भूत असलेल्या पूर्व महाराष्ट्रांतील मध्यवर्ती साहित्यसंस्था आहे; व त्या दृष्टीनें या राज्यांतील मराठी जनतेच्या भाषिक हितसंबंधांचें संरक्षण आणि संवर्धन करणें हें या संघाचें मुख्य कर्तव्य आहे. वस्तुतः कोणत्याहि लोकशाही राज्यांत जनतेच्या हितसंबंधांच्या रक्षणाचा प्रश्न हा कधी उद्‌भवतांच कामा नये. पण आपल्या राज्यांत हा प्रश्न उद्‌भवलेला आहे आणि तोहि अगदी निकराने ! त्याची कारणे दोन: एक तर, हे राज्य दुभाषी आहे; व दुसरें त्याहिपेक्षां प्रबळ कारण असें कीं, या राज्यांत मराठीच्या सहवासाला जी हिंदी भाषा आलेली आहे, ती अखिल भारताची राजभाषा आहे. मुंबई किंवा हैद्राबाद या आपल्या शेजारच्या दोन राज्यांत स्वतःचा अखण्ड असा सार्वभौम प्रदेश न लाभलेल्या अभागी मराठी भाषेच्या नशिबीं गुजराती, तेलुगू आणि कानडी या

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

भाषांचें साहचर्य आलेलें असून, हैद्राबाद संस्थानांत तर तेलुगूची लोकसंख्या मराठीच्या जवळजवळ दुप्पट भरेल. पण या भाषा कांही राजभाषा नाहीत. त्यामुळें, त्याहि राज्यांतून जरी सरहद्दींवर गुंतागुंतीचे बिकट प्रश्न निर्माण झालेले असले, तरी त्या भाषा या त्या त्या राज्यांतील केवळ लोकभाषाच असल्याकारणानें, मराठीवर 'राज्य' गाजविण्याची अशी प्रवृत्ति किंवा प्रश्न त्या दोन राज्यांतून उत्पन्न होऊं शकत नाहीं. तथापि, हिंदी ही मध्यप्रदेशांतील बहुसंख्य जनतेची भाषा तर आहेच; पण शिवाय ती भारताची मूर्धाभिषिक्त राजभाषाहि आहे. अर्थात्, संख्या आणि सत्ता या दोहोंचेहि बळ या राज्यांत हिंदी भाषेच्या मागें एकवटून उभें असल्यामुळें, मराठी जनतेच्या भाषिक हितसंबंधांच्या संरक्षणाची समस्या इथें उग्रतेनें उपस्थित झाली आहे.

महाराष्ट्राची हिंदीविषयींची आत्मीयता

वस्तुतः ही समस्या निदान मराठीच्या बाबतींत तरी उद्भूत व्हावयाला नको होती. कारण अखिल भारताची राजभाषा आणि राष्ट्रभाषा ह्मणून हिंदीला शिरोधार्य मानण्याचे दाक्षिण्य आणि दूरदृष्टि जर प्रथम कोणी दाखविली असेल, तर ती महाराष्ट्रानेंच होय. हिंदी ही भारताची राष्ट्रभाषा आणि नागरी ही राष्ट्रलिपि झाली पाहिजे, अशी घोषणा काशीनगरींत पं. मदनमोहन मालवीय आणि लो. बाळ गंगाधर टिळक या दोघा महान् नेत्यांनीं पंचेचाळीस वर्षांपूर्वी केली. ती त्यांची घोषणा हा अभिजात भारतीय संस्कृति आणि राष्ट्रीयता यांच्या निर्माणकार्यांतील पहिला उपक्रम होता. मी 'अभिजात' हें विशेषण मुद्दामच योजिलें आहे. कारण, राष्ट्रसभेच्या स्थापनेपासून भारतीय संस्कृति आणि राष्ट्रीयता यांच्या ज्या कल्पना त्या काळच्या राजकीय नेत्यांकडून प्रसृत करण्यांत आल्या होत्या, त्या कल्पनांचा उगम आणि अधिष्ठान ब्रिटिश संस्कृति आणि परंपरा हें होतें; भारतीय संस्कृति आणि परंपरा हें नव्हे. भारताची नवी संस्कृति आणि राष्ट्रीयता ही त्याच्या प्राचीन परंपरेंतूनच स्वयमेव विकसित झाली पाहिजे आणि युगधर्मानुसार ती धारण करणार असलेलें नवें स्वरूपहि त्या परंपरेला सुसंगत असेंच असले पाहिजे, हा राष्ट्रधर्माचा नवा सिद्धांत ज्या द्रष्टयांनीं विसाव्या शतकाच्या प्रारंभीं प्रवर्तित केला, त्यांत लो. टिळक हे अग्रगण्य होत. भारतीय अस्मितेचे हें अभिजात, अभिनव दर्शन महाराष्ट्रानें प्रणामपुरस्सर स्वीकारलें आणि स्वातंत्र्योन्मुख भारताची राष्ट्रभाषा ह्मणून हिंदी ही त्यानें वंदनीय मानली. हिंदीविषयीच्या महाराष्ट्राच्या या आदरगर्भ आत्मीयतेमध्यें गेल्या अर्धशतकांत कोणत्याहि परिस्थितींत अतर पडलेलें नाहीं.

आधीं भारत, नंतर महाराष्ट्र

कारण, या त्याच्या आत्मीयतेमागे आठ शतकांची उदार परंपरा, आठशें वर्षांच्या इतिहासाची विशाल पार्श्वभूमि आहे. मराठी संस्कृतीचा इतिहास असें सांगतो कीं, या महाराष्ट्रभूमींतील कवींनी आणि संतांनी, वीरांनी आणि मुत्सद्यांनी अखिल भारत हे आपलें कार्यक्षेत्र मानले, आसेतुहिमाचल संचार केला व मराठीप्रमाणेंच हिंदींतूनहि आपले विचार प्रकट आणि प्रसृत केले. नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास, मोरोपंत प्रभृति बहुतेक प्रमुख मराठी कवींनी हिंदींतून रचना केलेली आढळते; व नामदेवरायांची मराठी आणि हिंदी कवनें तर शीखांच्या धर्मग्रंथांतहि समाविष्ट झालेलीं आहेत. महानुभाव कवींनी जशी मराठी भाषा पेशावरपर्यंत नेऊन पोंच-

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विलों, तशीच हिंदी पंढरपूरपर्यंत आणून भिडविली. आधुनिक काळांतहि कै. प. माधवरावजी सप्रे यांच्यापासून तों प. बाबुरावजी पराडकर यांच्यापर्यंत शेकडों महाराष्ट्रीय लेखकांनी हिंदीची इतक्या निष्ठेने आणि निरतिशय सेवा केलेली आहे कीं, ते त्यांचें ऋण हिंदी वाङमयाचे नेतेहि कृतज्ञतेने मान्य करतात. राष्ट्रभाषा म्हणून हिंदीचा पुरस्कार करण्याचा जो आदेश लोकमान्यांनी मराठी जनतेला दिला, त्याचेहि अनुसरण महाराष्ट्रांतील ग्रंथकार आणि पत्रकार गेली पन्नास वर्षे दक्षतेने करीत आलेले आहेत. हिंदीचा प्रचार हे महाराष्ट्रीयांनी राष्ट्रीय संस्कृतीच्या निर्माणकार्यांतील एक महत्त्वाचे अंग मानलेलें असल्यामुळें, या बाबतींत वृत्तिभेद किंवा पक्षभेद कधींहि आड आलेले नाहीत, हें विशेष होय. आचार्य काकासाहेब कालेलकर आणि आचार्य विनोबाजी भावे हे जितक्या तळमळीनें हिंदीचा पुरस्कार करतात. तितक्याच तळमळीनें वीर सावरकर आणि श्रीमान् गोळवलकरगुरुजी हेहि करितात. महाराष्ट्रानें आपल्या जीवनात हिंदीला प्रथमपासूनच जें हें मानाचें स्थान दिलेले आहे, तसे तें इतर कोणत्याहि प्रांतानें दिले असेल, असें मला वाटत नाहीं. कारण, आधी भारत आणि नंतर महाराष्ट्र, अशीच गेल्या हजार वर्षांची महाराष्ट्रीयांची सांस्कृतिक आणि राजकीय धारणा आहे. त्यामुळे, महाराष्ट्रीयांचा महाराष्ट्राविषयीचा अभिमान जसा भारताविषयीच्या निष्ठेने मर्यादित झालेला आहे. तसेंच त्यांचें मराठीविषयीचे प्रेम हिंदीविषयीच्या आत्मीयतेनें मर्यादित झालेले आहे. राजभाषा या नात्यानें इंग्रजीच्या जागीं हिंदीची प्रतिष्ठापना व्हांवी, या कल्पनेचा जो पुरस्कार गेली पन्नास वर्षे मराठी जनता इतक्या जिव्हाळ्यानें करीत आलेली आहे, तो खरोखरी याच कारणामुळें.

कसोटीला उतरले नाहींत

पण, महाराष्ट्राच्या हिंदी भाषेविषयींच्या या आत्मीयतेचें चीज हिंदीभाषीयांनीं अद्याप तरी केलेले नाहीं, असे मला मोठ्या दुःखाने म्हणावे लागते. आपला मध्यप्रदेश हे असें द्विभाषी राज्य आहे कीं, ज्या राज्यांतील सत्ताधारी बहुसंख्य हिंदीभाषीयांना मराठीच्या बाबतींत समतेच्या आणि सौहार्दाच्या धोरणाचा अवलंब करून भारतीय भाषांतील परस्परसंबंधांचा एक उदार आदर्श निर्माण करता आला असता. कारण या राज्यांत राजभाषा जी हिंदी तिची सहचरी म्हणून नांदण्याचें सद्भाग्य मराठीला प्राप्त झालेले आहे. त्या दृष्टीनें मध्यप्रदेश हा इतर भारतीय भाषांच्या बाबतींतील हिंदीभाषीयांच्या वृत्तीचा आणि व्यवहाराचा निकष ठरणार आहे. पण, या कसोटीला आपले हिंदीभाषी बांधव उतरले आहेत, असें आज तरी म्हणता येत नाहीं. राज्यकारभार घ्या, शिक्षणखाते घ्या किंवा विद्यापीठें घ्या, यांपैकीं कुठेहि मराठीला, या राज्यांतील पाऊणकोट जनतेची मातृभाषा म्हणून, न्यायानें वागविले जात नाहीं, असेंच दिसून येईल. मध्यप्रदेश सरकारनें ‘ जनपद ’ हा ज्या वेळीं राज्यकारभाराचा पायाभूत घटक म्हणून निर्माण केला, त्या वेळीं मराठीला तिचें न्याय्य स्थान प्रादेशिक घटनेंत आणि राज्यकारभारांत देण्याची उत्कृष्ट संधि सरकारला अनायासे लाभली होती. ज्या जनपदांत मराठी लोक बहुसंख्य आहेत, त्यांचा कारभार आणि शिक्षणक्रम मराठी भाषेतूनच चालावा, अशी व्यवस्था करणें त्यांना सहज शक्य होते. पण, मराठी जनपदांतील सदस्यांची नेमणूक करतांना ते मराठीभाषी आहेत कीं नाहीं, हे पाहण्याची सुद्धा दक्षता जिथें घेण्यांत आलेली नाहीं, तिथें मराठी जनपदांचा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सर्व कारभार मराठींतूनच चालावा, अशी व्यवस्था कोण लावून देणार ? आज बालाघाट, छिंदवाडा, बैतूल आणि नेमाड या महाकोसलमधील चार जिल्ह्यांत बैहर, धाराशिवणी, सौंसर, मूलतापी, भैंसदेही आणि बऱ्हाणपूर या सहा मराठी तहसिली कोंबल्या गेलेल्या आहेत. त्या तहसिली नजीकच्या सलग मराठी प्रदेशाला जोडण्याची सुवर्णसंधि जनपदांच्या निर्मितीच्या वेळीं आलेली होती. पण अद्याप तरी हिंदी विभागांतील हे मराठी जनपद मराठी विभागांत अंतर्भूत करण्याची सुबुद्धि कांहीं आमच्या सरकारला होत नाहीं.

राजभाषा अधिनियम

मराठीला न्याय देण्याची अशाच प्रकारची जी दुसरी सुवर्णसंधि विधानसभेला 'राजभाषा अधिनियम' सादर करताना आली होती, तीहि आमच्या सरकारनें अनवधानानें गमावली, असें म्हणणें प्राप्त आहे. सरकारवर अनवधानाचा आरोप करावा, असेंच खरोखरी या कायद्याच्या बाबतींत त्यांचें वर्तन झालेलें दिसतें. भारतीय राज्यघटनेच्या ज्या सतराव्या विभागांत राजभाषेसंबंधीचे भारत सरकारचें अनुशासन विस्तारानें ग्रथित केलेले आहे, त्या विभागाच्या तिसऱ्या अनुच्छेदांतील ३४८ व्या कलमात (१) सुप्रीम कोर्ट आणि (२) हायकोर्टें यांचे सर्व कामकाज, (३) विधानसभांतील सर्व विधेयकें आणि (४) अधिनियम (५) अध्यक्षांचे आणि राज्यपालांचे अध्यादेश व (६) राज्यसरकारच्या सर्व आज्ञा, नियम, नियमनें आणि उपविधानें ही सारी इंग्रजींत रहावीत, असा निस्संदिग्ध आदेश दिलेला आहे. त्याचप्रमाणे, भारत सरकारशी करावयाच्या सर्व अधिकृत पत्रव्यवहाराची भाषाहि इंग्रजीच राहील, असें याच विभागाच्या पहिल्या अनुच्छेदांतील ३४३ व्या कलमांत स्पष्ट निर्देशिलेले आहे इतकेंच नव्हे, तर ३४८ व्या कलमाच्या तिसऱ्या पोटकलमांत असा स्वच्छ आदेश दिलेला आहे कीं, एकाद्या राज्यसरकारनें जरी इंग्रजीशिवाय दुसरी कोणतीहि भाषा आज्ञा, अधिनियम, विधेयकें वगैरेंच्या बाबतींत वापरण्याचें ठरविलें, तरीसुद्धां राज्यपालाच्या हुकुमानुसार प्रकाशित झालेले त्यांचें इंग्रजी भाषांतर हेंच अधिकृत संहिता म्हणून प्रमाण मानले जाईल. अशा स्थितींत, राजभाषा अधिनियमाच्या तिसऱ्या कलमांत हिंदी आणि मराठी या सर्व कामासाठीं या राज्याच्या राजभाषा राहतील असें विधान केल्यावर, मग चवथ्या कलमांत आज्ञा, अध्यादेश, अधिनियम विधेयके, संशोधनें, नियम वगैरेसाठीं मात्र हिंदी हीच वापरण्याची भाषा राहील, असें जें विसंगत विधान केलें आहे, तें कशासाठीं ? भारतीय राज्यघटनेच्या सतराव्या विभागांतील ३४३ आणि ३४८ या अनुच्छेदांनुसार, नाही तरी, हिंदी ही कोणत्याच राज्य सरकारची कोणत्याच महत्वाच्या सरकारी कामासाठीं आज अधिकृत प्रमाण भाषा राहू शकत नाही, हें उघड आहे. मग मध्यप्रदेश राजभाषा अधिनियमाच्या चवथ्या कलमांत मराठीला जें गौण स्थान देण्यांत आलें आहे, त्याचें कारण काय ? शिक्षणमंत्री ना. पं. द्वारकाप्रसाद मिश्र यांनी या अधिनियमाच्या बाबतींत विधानसभागृहांत आणि विदर्भ साहित्यमंदिराच्या कोनशिला-समारंभाच्या वेळीं दिलेलीं आश्वासनें लक्षांत घेतां, मी तरी मराठीला गौण स्थान देण्यांत घडलेला हा अन्याय केवळ अनवधानाचा प्रकार आहे, असेंच समजतो. तथापि, अनवधानानें केलेला का असेना, अन्याय हा केव्हाहि अन्यायच होय; व त्याचें निराकरण तत्काळ झालेंच पाहिजे. तें निराकरण राजभाषा अधिनियमाच्या चवथ्या कलमांत मराठीला हिंदीच्या बरोबरीनें स्थान दिल्यानेंच होऊं शकेल.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नागपूर विद्यापीठाचें हिंदीकरण

राजभाषा अधिनियमांत मराठीला झालेला अन्याय हा अनवधानानें झाला, असे तरी म्हणता येईल. पण, सागर विद्यापीठाच्या स्थापनेच्या वेळीं नागपूर विद्यापीठाची क्षेत्रमर्यादा निश्चित करतांना काय किंवा त्याच्या आजच्या कारभारांत काय, जे अन्यायाचे प्रकार झाले आणि सध्यांहि होत आहेत, त्यांचा पद्धतशीरपणा लक्षांत घेतां, या सगळ्या प्रकारांच्या मागें एक विशिष्ट मनोवृत्ति, धोरण आणि उद्देश आहे, असें कां म्हणूं नये? सागर विद्यापीठाच्या विधेयकांत क्षेत्रमर्यादा निश्चित करतांना बालाघाट, छिंदवाडा, नेमाड आणि बैतूल या चार जिल्ह्यांतील मराठी तहसिली त्याच्या कक्षेंतून वगळावयाला हव्या होत्या; व राज्य सरकारनें तशी न्यायबुद्धि दाखविली असती, तर हिंदी आणि मराठी या दोन्ही भाषांना समदृष्टीनें वागविण्यासंबंधीच्या त्यांच्या घोषणेचे साक्षात् प्रत्यंतर मराठी जनतेला आलें असतें. पण, त्या विधेयकावर विधानसभेंत झालेल्या चर्चेंत मराठी तहसिलींवर आक्रमण करणाऱ्या त्यांतील अतिव्याप्त कलमांवर टीका होऊन सुद्धां, राज्यसरकारनें त्या विधेयकांत अवश्य त्या सुधारणा केल्या नाहीत, या प्रकाराला काय म्हणावें? सागर विद्यापीठाच्या स्थापनेमुळें हिंदीला स्वतःचे स्वतंत्र विद्यापीठ मध्यप्रदेशांत प्राप्त झालें, याबद्दल आम्हाला आनंदच आहे. पण तो आनंद निर्भेळ मात्र नाहीं. कारण, हिंदीला अशा रीतीनें स्वतंत्र विद्यापीठ मिळाल्यानंतरहि, नागपूर विद्यापीठांत हिंदीचे वर्चस्व वाढविण्याचा जो प्रयत्न बुद्धिपुरस्सर सतत चालू आहे, तो पाहून मन विषण्ण होतें. हिंदी ही भारताची राजभाषा असल्यामुळें तिच्या अध्ययनाची व्यवस्था भारतांतील प्रत्येक विद्यापीठानें करावी, हें ओघालाच आलें; व त्या दृष्टीनें नागपूर विद्यापीठांत हिंदीच्या अभ्यासासाठीं आवश्यक तेवढी योजना जर करण्यांत आली, तर ती योग्यच म्हणावी लागेल. पण, नागपूर विद्यापीठाचें हर एक बाबतींत हिंदीकरण करण्याचे जे खटाटोप आज चालू आहेत, त्यांत शिक्षणाची मूलतत्वें, लोकशाहीचा व्यवहार आणि न्यायबुद्धि या तिहींनाहि हरताळ फासला जात आहे, असेंच खरोखरी म्हटलें पाहिजे. नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरुपासून तो त्यांतील एकाद्या खात्याच्या प्रमुखापर्यंत साऱ्या अधिकारपदांवर मराठीतर व्यक्तींची नेमकी वर्णी लागावी, हा प्रकार विद्यापीठ आणि राज्यसरकार या दोहोंनाहि लाजिरवाणा नाहीं काय? पण, नागपूर विद्यापीठांत चालू असलेल्या या अन्यायांची जाणीव आमच्या सरकारला यत्किंचितहि असल्याचें दिसत नाहीं. हिंदी ही भारताची राजभाषा असली, तरी तिचें प्रभुत्व आणि प्रसार या दोहोंनाहि त्या त्या प्रदेशांतील मातृभाषांच्या विकासाची, व्यासंगाची आणि व्यवहाराची मर्यादा आहे, या म. गांधी यांनीं पुरस्कारिलेल्या न्याय्य तत्वाचा विसर राज्यकर्त्यांना केव्हांहि पडतां कामा नये. नाही तर या लोकशाहीच्या युगांत भाषिक स्पर्धा आणि संघर्ष हीं दोन्ही अटळ आहेत.

निरीक्षकसमिति नेमण्याची सूचना

ही स्पर्धा आणि हा संघर्ष यांची तीव्रता कमी करण्याचा एक तात्पुरता व्यवहार्य उपाय मला सुचतो; व मध्यप्रदेश सरकारचें मराठीच्या बाबतींतील धोरण अनुदार हेतूंनीं प्रेरित झालेलें नाहीं अशी माझी समजूत असल्यामुळेंच खरोखरी, तो उपाय आमच्या सरकारच्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

निदर्शनाला आणून देण्याचं धाडस मी करित आहे. विशेषतः, ना. पं. द्वारकाप्रसाद मिश्र यांनीं ता. १४ एप्रिल १९५१ रोजीं 'मध्यप्रदेश साहित्य परिषदे'च्या स्थापनेच्या वेळीं हिंदी आणि मराठी यांचा व्यवहार समान म्हणजे निम्मेनिम असावा असा जो आदेश दिला व नंतर ता. १५ एप्रिल १९५१ रोजीं विदर्भ साहित्यमंदिराची कोनशिला बसवितांना मराठीला कोणत्याहि प्रकारचा अन्याय करण्याची सरकारची इच्छा नाहीं असें जें आश्वासन दिलें, तो आदेश आणि तें आश्वासन अमलांत आणण्याच्या दृष्टीनें तर मला ही सूचना करणें, हें माझें कर्तव्यच वाटतें. ही सुचना अशी कीं, राज्यकारभार, शिक्षण खातें आणि विद्यापीठें यांत मराठीला जो अन्याय होत असल्याच्या तक्रारी दिवसेंदिवस सारख्या वाढत आहेत व ज्या अन्यायांच्या जाणिवेनें या राज्याच्या दोन विभागांतील वैमनस्यहि अधिकाधिक विकोपाला जात चाललें आहे, त्या अन्यायांची चौकशी आणि निरसन करण्यासाठीं सरकारनें मध्यप्रदेश विधानसभा, हिंदी साहित्य संमेलन आणि विदर्भ साहित्यसंघ यांच्या सदस्यांची एक 'निरीक्षक समिति'(Vigilance Committee) नेमावी या समितीनें, राज्यांतील दोन्ही विभागांत समता आणि सौहार्द रहाण्याच्या दृष्टीनें, एकंदर कारभारावर नजर ठेवावी, आपल्याकडे येणाऱ्या तक्रारींचा शोध घ्यावा आणि कोणालाहि कुठेंहि आक्रमण करण्याची संधि मिळूं देऊं नये. अशा प्रकारची 'निरीक्षकसमिती' जर नेमली गेली, तर आज सरकारच्या धोरणाविषयीं जो अविश्वास मराठी जनतेच्या मनांत उद्भूत झाला आहे, तो नाहींसा होईल; व प्रांताचा राज्यकारभार आणि राज्यकारण हीं दोन्हीहि दूषित करणारें हिंदी–मराठी वादाचें विषबीज हळुहळू कायमचें नष्ट होऊन जाईल. भाषावार प्रांतरचना होईपर्यंत, राज्यकारभाराची ऋजुता आणि जनतेची त्याविषयींची सदिच्छा या दोन्हीहि कायम राहण्यासाठीं, अशा प्रकारच्या निःपक्षपाती निरीक्षणाची आवश्यकता मला तरी अतिशय वाटते. खरोखरी, या भाषिक संघर्षाचा विचार मी ज्या ज्या वेळीं करितो, त्या त्या वेळीं माझ्या मनाला दुःखानें आणि शरमेनें पराकाष्ठेच्या वेदना होतात. ब्रिटिश सरकारच्या अमदानींत इंग्रजीच्या मराठीवरील आक्रमणासंबंधी जशा प्रकारच्या तक्रारी आम्ही करीत होतो, तशाच प्रकारच्या तक्रारी आज आपल्याच रक्ताच्या राजकर्त्यांविरुद्ध करण्याचा प्रसंग आमच्यावर यावा, यापरती लाजिरवाणी उद्वेगजनक घटना दुसरी कोणती असूं शकेल? भारतांतील भिन्नभाषी समाज परस्परांशीं सौजन्याने आणि दाक्षिण्यानें वागूं शकत नाहींत, असा जो निष्कर्ष या सगळ्या निवेदनांतून निघतो, तो आपल्या राष्ट्रीय ऐक्याच्या आदर्शाला किती कमीपणा आणणारा आहे! पण, किती कां दुर्दैवी असेना, ही वस्तुस्थिति आहे; व तिचा विचार खरोखरी मूलगामी दृष्टीनेंच भारत सरकारनें करावयाला हवा.

'मध्यप्रदेश साहित्यपरिषद'

या भाषिक संघर्षाला आळा घालण्याच्या हेतूनें, हिंदी आणि मराठी या दोन्ही भाषांच्या लेखकांना एकत्र आणून, त्यांच्यांत सौहार्द उत्पन्न करण्याचा जो उपक्रम ना. पं. द्वारकाप्रसाद मिश्र यांनी 'मध्यप्रदेश साहित्यपरिषदे'च्या रूपाने केला आहे, त्याचे विदर्भ साहित्यसंघातर्फे मी मनःपूर्वक स्वागत करितो. स्वतः भारत सरकार हेंहि 'नॅशनल कल्चरल ट्रस्ट'च्या विद्यमानें 'अखिल भारतीय साहित्यपरिषद'

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

स्थापन करण्याच्या उद्योगांत सध्या आहे. या त्यांच्या उद्योगाचें मर्म स्पष्ट आहे. भारतीय राज्यघटनेंत हिंदी ही जरी राजभाषा मानलेली असली, तरी तिच्या बरोबर तेरा प्रादेशिक भाषांनाहि मान्यता देण्यांत आलेली आहे. अर्थात् हिंदी आणि या तेरा मान्य प्रादेशिक भाषा यांचे संबंध परस्परपोषक रहावेत, या तेरा भाषानी राजभाषा आपल्या सहकार्याने समृध्द करावी व या सर्व भाषांच्या समन्वयाने प्रादेशिक भाषांतील साहित्यालाहि हळू हळू भारतीय स्वरूप प्राप्त व्हावें, अशी कांहीं तरी योजना भारत सरकारलां करणें भागच होतें. अखिल भारताची जी अभिनव राष्ट्रीय अस्मिता आणि संस्कृति आतां आपल्याला, युगधर्मानुसार, निर्माण करावयाची आहे, ती परंपरापुनीत तर असली पाहिजेच; पण भारताच्या सर्व पृथगात्म घटकांचेंहि वैशिष्ट्य तिच्यांत प्रतिबिंबित होऊन ती भारतांतील सर्व समाज आणि राष्ट्रकें यांची प्रातिनिधिक झाली पाहिजे. त्या दृष्टीने चार कोटि रुपयांचा 'नॅशनल कल्चरल ट्रस्ट' स्थापन करून त्याच्या नेतृत्वाखाली साहित्य, नाट्य-संगीत आणि कला यांच्या तीन निरानराळ्या अॅकॅडमीज काढण्याचा भारत सरकारचा संकल्प निस्संशय समुचित आहे. या अॅकेडमीज जर भारतीय संस्कृति, इतिहास आणि परंपरा यांचा अनुषंग ठेवून दक्षतेने चालविल्या गेल्या, तर नव्या युगधर्माला अनुरूप असें भारताच्या अस्मितेचे पुनरुज्जीवन करण्याचे महान् कार्य त्यांच्या हातून खात्रीने होईल. या भारतीय अॅकॅडमीजच्या शाखा प्रादेशिक अॅकॅडमीजच्या रूपाने प्रांतोप्रांतीं निघणे अवश्य आहे; व म्हणून पं. मिश्र यांनी जगदलपूर येथे हिंदी साहित्यसंमेलनाचे उद्घाटन करताना 'मध्यप्रदेश अॅकॅडमी'च्या उपक्रमाचे जें सूतोवाच केले, तें अगदी समयोचित होतें. ता. १४ एप्रिल १९५१ रोजीं या अॅकॅडमीच्या स्थापनेची पूर्व तयारी करण्यासाठीं नागपूर येथे सचिवालयांत पं. मिश्र यांच्या अध्यक्षतेखाली हिंदी साहित्यसंमेलन आणि विदर्भ साहित्यसंघ यांच्या प्रतिनिधींची जो संयुक्त प्रास्ताविक सभा झाली, तींत 'मध्यप्रदेश साहित्यपरिषदे'ची रूपरेषा निश्चित होऊन पुढील कामासाठीं दोन समित्याहि नेमण्यात आल्या. या 'साहित्यपरिषदे'त हिंदी साहित्यसंमेलन आणि विदर्भ साहित्यसंघ यांचें प्रातिनिधित्व सर्व बाबतींत 'फिफ्टी फिफ्टी' म्हणजे समसमान असावें, असें जें तत्त्व पं. मिश्र यांनी घालून दिलें, त्याबद्दल त्यांना धन्यवाद दिले पाहिजेत; व राज्यकारभारांत जर या तत्वाची अमलबजावणी करण्यांत आली, तर मध्यप्रदेशांत भाषिक समन्वयाचा आदर्श उत्पन्न करून अखिल भारताला उदाहरण घालून देण्याची जी पंडितजींची आकांक्षा आहे, ती सफल झाल्याविना राहणार नाहीं. भारत सरकारच्या अदूरदर्शी वृत्तीमुळें भाषावार प्रांतरचना लौकर होण्याची आशा आता बहुतेक नष्ट झाल्यासारखीच आहे. म्हणून, मध्यप्रदेशासारख्या संमिश्र प्रांतांतील सरकारांनी आपल्या राज्यांतील भिन्नभाषी लोकसमाजांत सौहार्द निर्माण करण्यासाठीं उदार धोरणाचा अवलंब करण्यांतच त्यांच्या शासननैपुण्याची कसोटी आहे.

भाषावार प्रांतरचना हाच उपाय

तथापि, अशा प्रकारच्या कोणत्याच तात्पुरत्या उपायांनी प्रादेशिक लोकसमाज आणि भारतीय घटनेने मान्य केलेल्या त्यांच्या भाषा यांच्या विकासाचा मूलभूत प्रश्न सुटणार नाही, हे आपण लक्षांत ठेवलें पाहिजे. केवळ मराठीचाच नव्हे, तर दक्षिण भारतांतील गुजराती, कानडी, तेलुगु,

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तमिळ, मल्याळी वगैरे भाषांचा जो कोंड-मारा आज नर्मदेखालच्या निरनिराळ्या संमिश्र राज्यांतून सारखा चालू आहे, तो समूळ नष्ट करण्याचा निर्णायक उपाय खरोखरी एकच दिसतो. तो उपाय म्हणजे भाषावार प्रांतरचना हा होय. भाषावार प्रांतरचनेचे तत्व राष्ट्रसभेनें प्रथमपासूनच पुरस्कारिलेलें असून, गेली तीस वर्षें आपल्या स्वतःच्या कारभारांत तिनें तें अमलांतहि आणलेलें आहे. इतकेंच नव्हे, तर पारतंत्र्याचें 'धर्मसंकट' नष्ट झाल्यावर भाषावार प्रांतरचनेची योजना हातीं घेण्यांत येईल आणि ती लवकर हातीं घेण्यांतच स्वराज्याचे साफल्य आहे, अशी घोषणा स्वतः महात्माजींनीच अनेकदां केलेली आहे. कारण, भाषावार प्रांतरचनेच्या मागें लोकशाहीचे जें महान् मूलभूत तत्व आहे, त्याची त्यांना पूर्ण जाणीव होती. भाषावार प्रांतरचना म्हणजे लोकांच्या भाषेंत लोकांचा राज्यकारभार. त्या दृष्टीनें भाषावार प्रांतरचना हा खरोखरी लोकशाहीचा पायाच आहे. पण, दुर्दैव असें कीं, आंध्र, कर्नाटक, महाराष्ट्र, गुजरात, केरळ वगैरे दाक्षिणात्य प्रांताकडून भाषावार प्रांतरचनेची मागणी सारखी निकरानें होत असतांनाहि, स्वतःला लोकशाहीचें कैवारी म्हणविणाऱ्या भारत सरकारला ती पूर्ण करण्याची सुबुद्धि अद्याप होत नाहीं. भाषावार प्रांतरचना हा कांहीं केवळ राज्यकारभाराचाच प्रश्न नाहीं; तर ती ती भाषा बोलणाऱ्या जनतेच्या आत्माविष्काराची आणि आत्मविकासाची ती जीवनसमस्या आहे. कारण, कोणत्याहि लोकसमाजाची प्रकृति, संस्कृति आणि नियति ही त्या समाजाच्या मातृभाषेंतूनच पूर्णतेनें प्रकट होत असते. भरतखंड हें अनादि कालापासून निरनिराळे पृथगात्म लोकसमाज आणि राष्ट्रकें यांच्या समवायानें बनलेलें अनेकसंध राष्ट्र आहे; व त्यांच्या या पृथगात्मतेचा उच्छेद न करता, तिच्या परिपोषाला योग्य वाव देऊनच, अखिल भारताचा उत्कर्ष साधावयाचा, अशीच भारतीयांची परंपरापुनीत राज्यनीति आहे. राजसूय, अश्वमेध आणि विश्वजित् हे यज्ञ या राज्यनीतीच्या निरनिराळ्या प्रणालींचे निदर्शक असून, "उत्खातप्रतिरोपिताः" आणि "नमयामास नृपाननुद्धरन्" या आपल्या उक्तींत कविकुलगुरूनें या नीतीचें मर्म सुंदरतेनें विशद केलेलें आहे. म्हणून, भारतीय संघराज्याला जर स्थैर्य आणि दाढर्य यावयाला हवें असेल, तर भाषावार प्रांतरचना तावडतोब करून भरतखंडांतील भिन्नभाषी राष्ट्रकांना आत्मविकासाची संधि देणें अवश्य आहे. महाराष्ट्र जनतेची संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेची मागणी ही, या सर्व दृष्टींनी, अत्यंत न्याय्य आणि अगदीं समयोचित होती.

महाराष्ट्राच्या भिन्न भागांतील साहित्यसंस्था

पण, अखिल महाराष्ट्राच्या एकीकरणाचे आपलें हें विशाल स्वप्न सफल होण्याचा संभव ज्या अर्थी सध्यां दुरावलेला दिसतो, त्या अर्थी या बिकट परिस्थितींत महाराष्ट्राची अस्मिता आणि साहित्य यांचें संरक्षण करण्याचा एकच मार्ग शिल्लक उरतो. तो ह्मणजे मुंबई, मध्यप्रदेश, हैद्राबाद आणि गोमंतक या चार निरनिराळ्या राज्यांत विभागल्या गेलेल्या खंडित महाराष्ट्राच्या शकलांचें संरक्षण आणि संवर्धन अत्यंत दक्षतेनें करणे. देवांचा सेनानी कार्तिकेय याच्या जन्मासंबंधीं पुराणांत अशी एक कल्पना आहे कीं, तो गर्भावस्थेंत विछिन्न होऊन गंगेच्या प्रवाहांत पडला असतां, कृत्तिकांनीं त्याचें धारण केले आणि त्या महापराक्रमी कुमाराला जन्म देऊन देवकार्याची सांगता केली. खंडित महाराष्ट्राच्या आजच्या शकलांतूनच उद्याचा एकसंध बलशाली महाराष्ट्र

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आविर्भूत होईल, या श्रद्धेनें आपण त्याच्या निरनिराळ्या भिन्नभाषी राज्यांत कुचंबत पडलेल्या शकलांची जोपासना केली पाहिजे. नाहीं तर तीं शकलें त्या त्या राज्यांतील प्रबळ भाषिकांचें भक्ष्य झाल्याविना राहणार नाहींत. मध्यप्रदेशांत ही जबाबदारी अर्थातच विदर्भ साहित्य-संघाकडे येते. महाराष्ट्र साहित्यपरिषद ही अखिल महाराष्ट्राची मध्यवर्ती साहित्यसंस्था आहे; व या राज्यांतील मराठी साहित्यिक आणि जनता यांची तिच्याविषयीं प्रथमपासूनच आदरयुक्त सहकार्याची भावना असून, प्रादेशिक संमेलनांच्या सहकारितेची जी नवी योजना अलिकडे परिषदेनें तयार केली आहे, तिलाहि आपल्या संघानें समति दिली आहे. पण, महाराष्ट्र साहित्यपरिषद ही मध्यवर्ती मान्य संस्था असली, तरी महाराष्ट्राचे निरनिराळे भाग जोंपर्यंत निरनिराळ्या शासनांखालीं विभागले गेलेले आहेत, तोंपर्यंत त्या त्या भागांतील मराठीच्या हितसंबंधांचें संरक्षण आणि प्रतिनिधित्व करण्यासाठीं त्या त्या भागांत पृथक् संस्था असाव्यात, ही गोष्ट अनिवार्य आहे. किंबहुना, खुद्द महाराष्ट्र साहित्य-परिषदेच्या नेत्यांनींहि या पृथक्तेचें औचित्य आपल्याला पटलें असल्याचे प्रसंगीं स्पष्ट बोलून दाखविलेलें आहे. मुंबई, मध्यप्रदेश, हैद्राबाद आणि गोमंतक या ज्या चार राज्यांत आज महाराष्ट्र विभागला गेलेला आहे, त्यांतील परिस्थिति भिन्न आणि प्रश्नहि भिन्न आहेत; व त्या त्या राज्यांतील विशिष्ट परिस्थिति लक्षांत घेऊन ते ते प्रश्न सोडवून घेण्याचें काम त्या त्या राज्यांतील मराठी वाङ्मयाचे नेतेच अधिक जाणिवेनें आणि जबाबदारीनें करूं शकतील, हें उघड आहे. महाविदर्भ, मराठवाडा आणि गोमंतक या महाराष्ट्राच्या तीन भागांत ज्या तीन साहित्यसंस्था आज कार्य करीत आहेत, त्या याच कारणामुळें. किंबहुना, महाराष्ट्र साहित्यपरिषदेच्या पुणें येथील केंद्रीय कार्यालयापासून उभ्यापुऱ्या सवाशें मैलांच्या अंतरावर असलेल्या महामुंबईंत मुंबई मराठी साहित्यसंघ ही जी पृथक् संस्था निरनिराळ्या चळवळी स्वतंत्र रीतीनें करीत आहे, तिच्याहि त्या पृथक्तेचें मर्म झालें, तरी हेंच होय. या दृष्टीनें विदर्भ साहित्य-संघाचे पृथक् अस्तित्व हें महाराष्ट्र साहित्य-परिषदेच्या प्रतिष्ठेला बाधक नाहीं; तर उलट पूरक आणि पोषकच आहे; व परिषदेनें मध्यप्रदेशांतील आपला प्रतिनिधि म्हणूनच विदर्भ साहित्यसंघाकडे ममतेनें पाहून त्याला मार्गदर्शन केलें पाहिजे. म्हणून, महाराष्ट्राच्या पूर्व सीमेवर, जिथें हिंदीची आक्रमक लाट आज मराठीला धडक देत मागे रेटीत आहे, त्या नागपूर शहरांत विदर्भ साहित्यमंदिराची उभारणी होण्याचा सुयोग आल्याबद्दल मराठीच्या सर्व प्रामाणिक उपासकांना खरोखरी आनंदच वाटला पाहिजे.

विदर्भ साहित्यमंदिराची स्थापना

विदर्भ साहित्यसंघाच्या पृथक् अस्तित्वाची ही जी आवश्यकता मला वाटते, तिच्यामुळें त्याच्या कार्यासंबंधीच्याहि माझ्या कांहीं कल्पना निश्चित झालेल्या आहेत. म्हणून, गेल्या वर्षी ज्या वेळीं त्याच्या अध्यक्षपदाची जबाबदारी आपण मजवर सोपविली, त्या वेळी मी त्या कल्पना अंमलांत आणण्याचा निर्धार केला. सुदैवानें, संघांतील माझे ज्येष्ठ सहकारी, महाराष्ट्राचे मुक्तप्रज्ञ कादंबरीकार, श्री. बाबासाहेब देशपांडे आणि माझे मित्र, महाराष्ट्राचे थोर तत्वचिंतक, आचार्य दादा धर्माधिकारी यांच्या सहाय्यामुळे त्या कल्पना मूर्तावस्थेस येण्याचे सुचिन्ह दिसत आहे. या कल्पनांत विदर्भ साहित्यमंदिराची स्थापना ही अर्थातच मुख्य होय. नागपूरचा परिसर हा गेलीं हजार वर्षे महाराष्ट्राचें पूर्व-

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सीमेवरील केंद्र आहे, या ऐतिहासिक सत्याची साक्ष सीताबर्डीवर सापडलेला महाराष्ट्रकूटाचा स्तंभलेख देतो; व तेव्हांपासून भोसल्यांच्या काळापर्यंत या परिसरांत महाराष्ट्र संस्कृति आणि साहित्य या दोहोंचाहि परिपोष शतकानुशतकें होत आलेला आहे. मुकुंदराज आणि चक्रधर यांनी आपल्या संचारानें जी ही भूमि आठ शतकांपूर्वी पावन केली, त्याच या भूमीला विसाव्या शतकांत कोल्हटकर आणि दप्तरी यांनी आपल्या वास्तव्याने प्रभावित केलें. अशा या विदग्ध भूमींत विदर्भ साहित्यमंदिराची प्रतिष्ठापना होण्यांत महाराष्ट्र संस्कृतीच्या गौरवाची ग्वाही आहे. कारण, हे साहित्यमंदिर म्हणजे कांहीं केवळ एक इमारत किंवा मिळकत नाहीं; तर विदर्भ साहित्यसंघाच्या आजच्या कार्यकर्त्यांना पूर्व महाराष्ट्रांत जें मराठीचें बलशाली केंद्र निर्माण करावयाचें आहे, त्या त्यांच्या उज्ज्वल आकांक्षेचें हें मंदिर हा प्रारंभ आणि प्रतीक आहे. या मंदिराच्या रूपानें महाराष्ट्र संस्कृति आणि साहित्य यांच्या व्यासंगाचें पीठ मध्यप्रदेशाच्या राजधानींत आम्हाला उत्पन्न करावयाचें असून, या राज्यांतील साऱ्या मराठी साहित्यसंस्था त्याच्या कक्षेंत आणावयाच्या आहेत. विदर्भ साहित्यमंदिराच्या उभारणीला प्रत्येक महाराष्ट्रीय व्यक्तीनें किमान पक्ष एक रुपया तरी देऊन हातभार लावला पाहिजे, अशी जी हांक आह्मी या राज्यांतील तमाम मराठी जनतेला दिली आहे, ती याच कारणामुळें. मध्यप्रदेशांतील महाराष्ट्रीयांचे स्वभाषाप्रेम आणि साहित्याभिरुचि या दोहोंचें विदर्भ साहित्यमंदिर हे स्मारक आणि स्फूर्तिस्थान व्हावे, अशी आमची मनीषा आहे; व ती आपण तत्परतेनें पूर्ण कराल, याबद्दल मला तरी शंका नाही. विदर्भ ही वैदर्भी रीतीची जन्मभूमि. अखिल भारताच्या वाङमयांत आणि विज्ञानांत भर घालणारे श्रेष्ठ कवि आणि गणिति या प्राचीन भूमींत आज पर्यंत सतत उदयाला आलेले आहेत. त्या या मराठी वाङमयाच्या आदिभूमींत साहित्याच्या तौलनिक व्यासंगाच्या नव्या प्रणाली निर्माण करण्याचा नम्र प्रयत्न विदर्भ साहित्यमंदिराच्या रूपाने आह्मी करित आहोंत. महाराष्ट्राच्या सर्व भागांतील विद्वानानी या आमच्या प्रयत्नांत सहभागी होऊन आपल्या विचारप्रदानाने ही साहित्यसाधना सफल करावी, अशी माझी त्यांना प्रार्थना आहे.

महाराष्ट्राच्या अस्मितेचे विशेष

या सफलतेतच महाराष्ट्राच्या बुध्दियोगी परंपरेचे सार्थक आहे. सातपुडा आणि सह्याद्रि या शैलश्रेणीनी आपल्या वैभवाने समृध्द केलेल्या 'त्रिमहाराष्ट्रकां'तील विदर्भ, देश आणि कोकण या तिन्ही विभागांनीं आपआपल्या प्रकृतिनुसार, महाराष्ट्राची अस्मिता परिपुष्ट करून भारताची संस्कृति आणि इतिहास हीं दोन्ही आपल्या प्रतिभेने आणि पराक्रमाने समृध्द केलेलीं आहेत. भारतांतील इतर समाजांनीं आणि राष्ट्रकांनीं रामलीला आणि कृष्णलीला आर्ततेनें आळवून मधुर भक्तीचें वेड जनतेला लाविलें; व पारतंत्र्याच्या अवकाळांतहि भोळया भक्तिभावाचा वडिवार कमी होऊं दिला नाहीं. पण, महाराष्ट्राच्या अस्मितेचें प्रौढ लालित्य जसे वैदर्भी रीतीच्या विकासांत आणि कठोर शिल्प जसे गिरिकुहरांतील लेण्यांच्या भव्य कारागिरींत प्रकट झालें आहे, तशीच तिची स्वतंत्रप्रज्ञता भगवद्गीतेवरील अद्ययावत् भाष्यांत आणि स्वातंत्र्याकांक्षा हिंदवी स्वराज्याच्या स्थापनेंत आविर्भूत झालेली आहे. चक्रधर आणि ज्ञानेश्वर, तुकाराम आणि रामदास, ज्योतिबा फुले आणि विनोबाजी भावे ! —हीं इतिहासाच्या अनंत क्षितिजावर ध्रुवाप्रमाणें सदैव तळपणारीं उज्ज्वल नांवें

महाराष्ट्रीय अस्मितेच्या एकेका चित्कलेच्या प्रकर्षाचीं द्योतक आहेत. महाराष्ट्राची प्रकृति, संस्कृति आणि नियति या महानुभावांनी घडविली; व त्यांच्या जीवनज्योतींच्या प्रकाशांत जर आपण आपला मार्ग क्रमिला, तर, मला वाटते, आपण सर्व विरोधांवर मात करून महाराष्ट्राच्या आजच्या शकलांतून भारतीय संघराज्याचा मूर्तिमंत आधारच असा सामर्थ्यशाली संयुक्त महाराष्ट्र निर्माण करूं शकूं.

अपेक्षाभंगाबद्दल क्षमा करा

मित्र हो, साहित्याच्या व्यासपीठावरील माझें हे बहुतेक शेवटचेंच भाषण आहे. वैदर्भी रीतीच्या जन्मस्थानी भरलेल्या या साहित्यसोहळयांत मी वाङमयाची विदग्ध चर्चा करावी, अशी आपली अपेक्षा असणे अगदी स्वाभाविक आहे. पण माझा तो अधिकार नाहीं आणि आज त्या मनःस्थितींतहि मी नाहीं. नियतीने लेखणी ही माझी जीविकेची जन्मसाधना म्हणून माझ्या हातीं दिल्याकारणानेंच केवळ जरी मी या गौरवाला, आपल्या प्रेमामुळें, पात्र ठरलेलों असलों, तरी स्वतःच्या सर्व मर्यादा मी जाणून आहे. म्हणून, माझ्या पाठीमागून या अध्यक्षपदावर येणाऱ्या माझ्या कलाभिज्ञ प्रतिभाशाली भगिनी सौ. कुसुमताई देशपांडे यांच्यावर साहित्याच्या नव्या प्रणालींना चालना देण्याची आणि तरुण पिढीच्या अभिरुचीला वळण लावण्याची जबाबदारी सोपवून मी आपला निरोप घेतों. संयुक्त महाराष्ट्र हें माझें जीवनस्वप्न आहे; व गेल्या दीड वर्षांत माझ्या हातून जें काय काम झालें असेल, तें त्या स्वप्नाच्या सफलतेला स्वल्पांशानें जरी पोषक ठरलें, तरी आपण मला दिलेला हा बहुमान वाया गेला नाही, असें मी समजेन.

२५–४–५१
नागपूर

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

सद्‌गुणाचा विकास समाजांत व्हावा, सत्यस्वरूप परमात्म्याचा महिमा समाजांत वाढावा, याची ज्ञानेश्वरांस तळमळ होती. मराठी भाषा बोलणाऱ्यांवर त्यांचे हे अनंत उपकार आहेत. रेड्यावर मारलेल्या चाबकाचा वळ ज्ञानेश्वरांच्या पाठीवर उठला. भूतमात्राबद्दल असा त्यांना कळवळा होता. अशा कारुण्याने भरलेल्या हृदयांतून ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी प्रगट केली. ज्ञानेश्वरांची गोडगोड भाषा मला चाखावयास मिळाली याची मला धन्यता वाटते, कृतार्थता वाटते. धन्य ही मराठी भाषा, असें वाटतें ! याचा अर्थ इतर भाषांबद्दल यत्किंचित्‌हि उणेपणा माझ्या मनांत आहे असें समजूं नये. ज्ञानेश्वरांची गोड भाषा माझ्या तोंडांत बसावी म्हणून पुन्हा मला जन्म प्राप्त झाला तरी धन्यता वाटेल.

—विनोबा.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचे सभासद व्हा

★

विदर्भ साहित्यसंघाची शक्ति मराठी भाषिकांच्या संघटनेवर आधारलेली असल्याने प्रत्येक मराठी प्रेमी नागरिकाने विदर्भ साहित्य संघाचें सभासदत्त्व स्वीकारणें अवश्य आहे. सभासदत्त्वाची वर्गणी वार्षिक फक्त रु. ३ असून मराठीबद्दल आस्था बाळगणाऱ्या कुणालाहि संघाचें सभासद होतां येतें. सभासदत्त्वाचें वर्ष जानेवारी तें डिसेंबर असतें.

विदर्भ साहित्य संघाची मराठी साहित्याच्या दृष्टीने शक्ति वाढवा.

मुद्रक व प्रकाशक प. वि. बेलवलकर, व्यवस्थापक, हरिहरेश्वर प्रेस, महाल, नागपूर.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ